म. ग्रं. सं. ठाणें

विषय: भू-प्रवास

लेखक:

सन: १८८८

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव: भूगोल वि...

३४
सं.क.

भूगोल विद्या (१

भू प्रवास

म. ग्रं. सं. ठाणें
ग्रंथ भू-प्रवास
क्र. नं. ९६२.
स्था-१८८८

ळाखात्यांतील विद्यार्थ्यांकरितां

# भूगोलविद्या.

भाग १ ला,

## हिंदुस्थान.

हें पुस्तक ,

ले० कर्नल जी. ए. जेकब सु०, आर्मी स्कूल्स,

इलाखा मुंबई,

यांचे आज्ञेवरून

रामचंद्र विष्णु सहस्त्रबुद्धे पंडित,

मि० नॉर्मलस्कूल, इलाखा मुंबई,

यांनीं तयार केलें.

आवृत्ति तिसरी.

सन १८८८.

किंमत ७ आणे.

मराठी ग्रंथ सं[illegible]
ठाणे.

( लष्करी शाळाखात्यांतील विद्यार्थ्यांकरितां )

# भूगोलविद्या.

## भाग १ ला,

## हिंदुस्थान.

हें पुस्तक

ले० कर्नल जी. ए. जेकब सु०, आर्मी स्कूल्स,

इलाखा मुंबई,

यांचे आज्ञेवरून

रामचंद्र विष्णु सहस्रबुद्धे पंडित,

मि० नॉर्मलस्कूल, इला ा मुंबई,

ह्यांनीं तयार केलें.

आवृत्ति तिसरी.

सन १८८८.

किंमत ७ आणे.

हें पुस्तक

पुणें येथें " श्री शिवाजी " छापखान्यांत

छापिलें.

( ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या २५ व्या

आक्टाप्रमाणें नोंदिली आहे. )

# भूगोलशिक्षण.

शिक्षकांनीं विद्यार्थ्यांस भूगोल शिकविते वेळीं, नकाशा-पासून त्यांना सुमारें दोन हातांचे अंतरावर उभें करावें, व त्यांना पूर्व दिवशीं नेमून दिलेल्या धड्यांतलि पाळीपाळीनें प्रश्न करावे. ज्या मुलाची उत्तर देण्याची पाळी असेल, त्यानें नकाशाजवळ जाऊन एकदम तें स्थल दाखवावें. अशा रीतीनें तयार केलेला सर्व धडा संपूर्ण झाल्यावर, दुसरें दिव-साकरितां जो धडा नेमून द्यावयाचा असेल, त्यांतलि सर्व जागा शिक्षकानें स्वतः नकाशावर दाखवाव्या, म्हणजे मुलांचे नजरेपुढें त्या जागा राहून त्यांना धडा तयार करण्यास सुलभ पडेल. नंतर नकाशा बंद करून एका मुलाकडून मागील एखादे देशाचा नकाशा फळ्यावर काढावाचा, व त्यांत मुलां-कडून पाळीपाळीनें नद्या, सरोवरें, पर्वत, शहरें इत्यादि सर्व स्थळें भरवावीं. असा क्रम ठेविल्यानें हा विषय चित्तवेधक होईल व विद्यार्थ्यांस त्याची अभिरुचिही लागेल.

**दिशा**—सूर्य ज्या बाजूस उगवतो ती पूर्व दिशा, ज्या बाजूस मावळतो ती पश्चिम दिशा, पूर्व बाजूस तोंड करून उभें राहिलें असतां उजव्या हाताकडची ती दक्षिण दिशा व डावे हाताकडील ती उत्तर दिशा समजावी.

**उपदिशा**—पूर्व व दक्षिण दिशांमधील कोनास आग्नेयी दि-शा, दक्षिण व पश्चिम यांमध्यें नैर्ऋत्य, पश्चिम व उत्तर यांम-

वायव्य आणि उत्तर व पूर्व ह्या दिशांमध्यें ईशान्य दिशा आहे.

परंतु नकाशाकडे तोंड करून उभें राहिलें ह्मणजे आपल्या उजव्या हाताकडची जी बाजू ती नकाशाची पूर्व दिशा. यावरून नकाशावरील बाकीच्या दिशा जाणाव्या.

---

## नकाशावरील अक्षांश व रेखांश पाहण्याची रीति.

नकाशाच पूर्व व पश्चिम बाजूस अक्षांश, आणि उत्तर व दक्षिण बाजूस रेखांश मांडिलेले असतात.जर अक्षांस उत्तरेकडे वाढत गेले, तर ते विषुववृत्ताचे उतरेकडील आहेत, ह्मणून त्यांस उत्तर अक्षांश ह्मणावें; व दक्षिणेकडे वाढत गेले, तर त्यांस दक्षिण अक्षांश समजावें. जर रेखांश पूर्वेक॰ डे वाढत गेले, तर ते पहिले याम्योत्तर वृत्ताचे पूर्वेकडील आहेत, ह्मणून त्यांस पूर्व रेखांश ह्मणावें; व पश्चिमेकडे वाढत गेले असल्यास पश्चिम रेखांश समजावें. जसें:—नीमच शह॰ राचे २४–२७ उत्तर अक्षांश, व ७४–२८ पूर्व रेखांश आहेत. शिक्षकांनीं मुलांचे मनांमध्यें ह्या विषयाची माहिती पक्की करून देण्याकरितां त्यांस खालीं लिहिल्याप्रमाणें प्रश्न करावे.

२१–२५उत्तर अक्षांश व ७९–५०पूर्व रेखांशावर जागा कोणती आहे? नागपूरचे अक्षांश व रेखांश किती आहेत?

शा॰ त्रि॰ स॰.

# अनुक्रमणिका.


| | पृष्ठें. |
|---|---|
| पृथ्वीचा आकार व कारणें. .... .... .... | १ |
| भूगोलावरील कल्पित रेषा ( वृत्तें ) .... .... | २ |
| कटिबंधांतील उत्पन्न वगैरे .... .... .... | ५ |
| पृथ्वीचा पृष्ठभाग. .... .... .... .... | ६ |
| जमिनीचे भाग .... .... .... | ६ |
| पाण्याचे भाग .... .... .... .... | ७ |
| खंडें व महासागर. .... .... .... .... | ८ |


## हिंदुस्थान.


| | |
|---|---|
| सीमा, समुद्रकिनारा, द्वीपकल्प, भूशिरें .... .... | १ |
| बेटें .... .... .... .... .... | २ |
| पर्वत. .... .... .... .... .... .... | ३ |
| समुद्र, अखातें, खाड्या, सामुद्रधुन्या. .... .... | ६ |
| सरोवरें व नद्या. .... .... .... .... .... | ७ |
| नद्या व त्यांचे कांठचीं शहरें. .... .... .... | १० |
| हवा. .... .... .... .... .... | १ |
| उत्पन्न .... .... .... .... .... | १५ |
| धर्म. .... .... .... .... .... .... | १६ |


## हिंदुस्थानचें विशेष वर्णन.


| | |
|---|---|
| मुंबई इलाखा. .... .... .... .... .... | १७ |

पृष्ठें.

मुंबईबेट, सिंधप्रांत. .... .... .... २०

शिकारपूर जिल्हा .... .... .... २१

हैदराबाद व कराची जिल्हे .... .... २२

कच्छ .... .... .... .... .... .... २३

गुजराथ .... .... .... .... .... .... २४

अमदाबाद व खेडा जिल्हे .... .... .... २५

भडोच व सुरत व जिल्हे .... .... .... २६

पंचमहाल जिल्हा. .... .... .... .... २७

गुजराथेंतील संस्थानें व एजन्स्या.

गायकवाडचें राज्य व महीकांठा एजन्सी. .... २८

रेवाकांठा एजन्सी, पालनपूर एजन्सी.... .... .... २९

सुरत व पंचमहाल एजन्स्या, खंबायत संस्थान,.... ३०

कांठेवाड. .... .... .... .... .... ३१

महाराष्ट्रदेश .... .... .... .... .... ३२

खानदेश जिल्हा. खानदेश एजन्सी. नाशीक जिल्हा. ३३

अहमदनगर जिल्हा. .... .... .... .... ३४

पुणें जिल्हा. .... .... .... .... .... ३५

सातारा जिल्हा .... .... .... .... ३६

सोलापूर जिल्हा. .... .... .... .... ३७

दक्षिणमहाराष्ट्र व उत्तरकानडा.

कलादगी जिल्हा. .... .... .... .... ३७

| | पृष्ठें. |
|---|---|
| बेळगांव जिल्हा .... .... .... .... .... | ३८ |
| धारवाड जिल्हा. उत्तरकानडा. .... .... | ३९ |
| **सह्याद्रिचा पश्चिमभाग ( कोंकण. )** | |
| ठाणें जिल्हा. .... .... .... .... .... | ४० |
| कुलाबा जिल्हा. रत्नागिरी जिल्हा. .... .... | ४१ |
| **महाराष्ट्रांतील संस्थानें व जहागिरी.** | |
| अक्कलकोट संस्थान. सातारा जहागिरी. .... | ४२ |
| **दक्षिणमहाराष्ट्र.** | |
| कोल्हापूर संस्थान. .... .... .... .... | ४३ |
| सांगली, जमखिंडी इ०. सावनूर संस्थान. .... | ४४ |
| **सह्याद्रीचा पश्चिमभाग ( कोंकण. )** | |
| जव्हार संस्थान. .... .... .... .... | ४५ |
| हबशाण संस्थान. सावंतवाडी संस्थान. .... .... | ४५ |
| **मद्रास इलाखा.** ... .... ... .... .... | ४६ |
| सरकार्स. . .... .... .... .... .... | ४७ |
| कर्नाटक ( द्रविडदेश ) . .... .... .... | ४८ |
| मलबार ( मल्याळदेश ). .... .... .... | ५१ |
| **मद्रासचे लगत्याचीं संस्थानें.** | |
| त्रावणकोर ( तिरुणकोडू ) .... .... .... | ५२ |
| कोची, .... .... .... .... .... | ५३ |
| म्हैसूर आणि कुर्गप्रांत. पुदूकोट, मद्रास जमीनदाऱ्या. | ५४ |

पृष्ठें.

बंगाल इलाखा. .... .... .... .... .... ५६
दक्षिणेकडील प्रांतांतील शहरें. ... .... ५७
पश्चिमेकडील प्रांतांतील शहरें.... .... .... ५९
उत्तरेकडील प्रांतांतील शहरें व बहार प्रांत. .... ६०
ओरिसा. .... .... .... ... ... ६१
आसाम. .... .... .... .... .... .... ६२

बंगालच्या लगत्याचीं संस्थानें.

कुचबहार, सिक्कीम, मणिपूर व टिपरा. .... .... ६३
अयोध्या. .... .... .... .... .... .... ६४
वायव्येकडील प्रांत. .... .... .... .... ६५
बनारस आणि गोरखपूर. अलाहाबाद व झांशी. ६६
आग्रा विभाग. .... ...... .... .... ६७
मिरूत विभाग. रोहिलखंड विभाग. .... .... ६८

वायव्येकडील प्रांतांतील मुलूख.

कमाऊन व ब्रिटिशगरवाल. .... .... .... ६९
पंजाब इलाखा. .... ... .... .... .... ,,
लाहोर विभाग. रावळपिंडी. पेशावर. .... .... ७१
डेराइस्माईलखान. मुलतान. जालंदर.सतलज.हिस्सार. ७२
दिल्ली विभाग.... .... .... .... .... ७३

पंजाबांतील संस्थानें.

काश्मीर. .... .... .... .... .... .... ७३

 भू-५ ३८

| | पृष्ठें. |
|---|---|
| भावलपूर. पतियाला. डोंगरी संस्थानें. .... .... | ७४ |
| **राजपुताना** आणि **माळवा** ... .... .... .... | ७५ |
| शिंदेसरकारचें राज्य. ... .... .... .... | ७६ |
| होळकराचें राज्य, भोपाळ, बुंदेलखंड. ... .... | ७८ |
| रेवा .... .... .... .... .... .... | ७९ |
| **मध्यप्रांत** नागपूर .... .... .... .... .... | ८० |
| सागर व नर्मदेच्या कांठचा प्रांत .... .... .... | ८१ |
| वऱ्हाड .... .... .... .... ... ... | ८२ |

**मध्यप्रांतांतील संस्थानें.**

| | |
|---|---|
| निजामचें राज्य .... .... .... .... .... | ८२ |

**स्वतंत्र संस्थानें.**

| | |
|---|---|
| नेपाळ .... .... .... .... .... .... | ८४ |
| भूतान, **फ्रेंच सरकारचीं संस्थानें** .... .... .... | ८५ |
| **पोर्तुगीज सरकारचीं संस्थानें** .... .... .... ... | ८६ |

# हिंदुस्थानांतील आगगाडीचे रस्ते.

**धी ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.**—हा मुंबईंत बोरीबंदराजवळून निघून कल्याणापर्यंत गेल्यावर याचे दोन फांटे झाले आहेत. एक थळघटांतून भुसावळपर्यंत गेला आहे; व दुसरा बोरघाटांतून पुण्यावरून रायचूरपर्यंत गेला आहे. पहिला फांटा भुसावळपर्यंत गेल्यावर त्याचे पुनः दोन फांटे झाले आहेत. एक जबलपूरपर्यंत व दुसरा नागपूरपर्यंत.

**धी बांबे बडोदा ॲन्ड सेंट्रल इंडिया रेलवे**—हा मुंबईंत कुलाब्याजवळून निघून सुरत, बडोदें, अहमदाबाद ह्यांवरून वढवाणपर्यंत गेला आहे.

**धी दौंड मनमाड स्टेट रेलवे**—हा दौंडपासून अहमदनगर, येवलें ह्यांवरून मनमाडपर्यंत गेला आहे.

**धी भावनगर गोंडल स्टेट रेलवे.**—हा भावनगरपासून वढवाणपर्यंत गेला आहे.

**धी होळकर ॲन्ड शिंदा निमच स्टेट रेलवे.**—हा जबलपुराला जाणाऱ्या रस्त्यावरील खांडवा स्टेशनापासून महू, इंदूर, उज्जनी ह्यांवरून रतलामपर्यंत गेला आहे.

**धी खामगांव स्टेट रेलवे.**—हा नागपुराला जाणाऱ्या रस्त्यावरील जलम स्टेशनापासून खामगांवपर्यंत गेला आहे.

ग्रंथांक: १२५



**धी उमरावती स्टेट रेल्वे.**—हा नागपुराला जाणाऱ्या रस्त्यावरील बदनेरा स्टेशनापासून उमरावतीपर्यंत गेला आहे.

**धी वर्धाकोल स्टेट रेल्वे**—हा नागपुराला जाणाऱ्या रस्त्यावरील वर्धा स्टेशनापासून वरोरापर्यंत गेला आहे.

**धी निजाम स्टेट रेल्वे.**—हा रायचुराला जाणाऱ्या रस्त्यावरील वाडी स्टेशनापासून हैदराबादेवरून शिकंदराबाद पर्यंत गेला आहे.

**धी ईस्ट इंडिया रेल्वे.**—हा जबलपुरापासून अलाहाबाद पर्यंत गेल्यावर त्याचे दोन फांटे झाले आहेत. एक बक्तार-वरून कलकत्त्यास,व दुसरा कानपुरावरून दिल्लीपर्यंत जातो.

**धी सिंध पंजाब ॲन्ड दिल्ली रेल्वे.**—हा दिल्लीस जाणाऱ्या रस्त्यावरील गाझीबाद स्टेशनापासून अंबाला, लाहोर यांवरून मुलतानपर्यंत गेला आहे.

**धी इन्डस व्हॅली स्टेट रेल्वे.**—हा भावलपुरापासून सक्कर, रोरीवरून लाकीपर्यंत गेला आहे.

**धी सिंध रेल्वे.**—हा कोट्रीपासून कराचीपर्यंत गेला आहे.

**धी मद्रास रेल्वे**—हा रायचुरापासून मद्रासपर्यंत गेला आहे. नंतर मद्रासपासून बैपूरपर्यंत गेला आहे.

**धी पाटणा ॲन्ड गया स्टेट रेल्वे.**—हा कलकत्त्यास जाणाऱ्या रस्त्यावरील बंकीपूर स्टेशनापासून गयापर्यंत गेला आहे.

**धी तिरहूत स्टेट रेलवे.**—हा ईस्ट इंडियारेलवेवरील **बरा**-घाटपासून मुजफरपूरपर्यंत गेला आहे.

**धी नलहट्टी स्टेट रेलवे.**—हा कलकत्त्यास जाणाऱ्या रस्त्यावरील नलहट्टी स्टेशनापासून अजिमगंजपर्यंत गेला आहे.

**धी औध** (अयोध्या) **अँन्ड रोहिलखंड रेलवे.**—हा बनारसपासून फैजाबाद, लखनौ, बरेली यांजवरून मुरादाबाद पर्यंत गेला आहे.

**धी राजपुताना स्टेट रेलवे.**—ह्याचे दोन फांटे आहेत. एक आग्रयापासून भरतपूर, जयपूर, अजमीर ह्यांजवरून राजपूरपर्यंत, व दुसरा दिल्लीपासून अलवारवरून बांडिकुईपर्यंत.

**धी मथुरा हट्रास सेक्शन नॉर्थवेस्ट प्रॉव्हिन्सेस लाइट रेलवे**—हा हट्रासरोडपासून मथुरेपर्यंत गेला आहे.

**धी पंजाब नॉर्दर्न स्टेट रेलवे.**—हा लाहोरपासून झेलम वरून रतवालपर्यंत गेला आहे

**धी इन्डस व्हॅली स्टेट रेलवे.**—हा मुलतानपासून कोट्री-पर्यंत गेला आहे.

**धी साउथ इंडियन रेलवे.**—हा मद्रासपासून चिंगलपट, तंजावर, त्रिचनापल्ली, मदुरा यांजवरून तुतिकोरिनपर्यंत गेला आहे.

**धी वेस्टर्न राजपुताना स्टेट रेलवे**—हा अमदाबादपासून पालनपूरवरून माऊंट आबूरोडपर्यंत गेला आहे.

# भूगोलविद्या.

## भूगोलाचें सामान्य वर्णन.

पृथ्वीचा आकार वाटोळा आहे, परंतु उत्तर दक्षिण बाजूस, ज्यांना उत्तर, व दक्षिणध्रुव, अशी संज्ञा दिली आहे, तेथें ती थोडी चपटी आहे. तिचा पूर्वपश्चिम व्यास ७९२५ मैल व उत्तर दक्षिण व्यास ७८९९ मैल ह्मणजे पूर्वपश्चिम व्यासापेक्षां २६ मैल कमी आहे. तिच्या वाटोळेपणाविषयीं तीन स्वल्प प्रमाणें आहेत. तीं अशीं:—

( १ ) नावाडी लोकांनीं वारंवार पृथ्वीप्रदक्षिणा केल्या आहेत. त्या अशा कीं, कोणत्याही एकद्या ठिकाणाहून पूर्वेकडे किंवा पश्चिमेकडे नाळ लावून ती दिशा न बदलतां पुनः त्याच ठिकाणीं ते परत आले. गोलाकृतीचे जे अनेक प्रकार आहेत, त्यांतील जर पृथ्वीचा एकादा नसता तर असें येतां आलें नसतें.

( २ ) आपण जर एकाद्या उंच ठिकाणावर चढूं लागलों तर जसजसें, वर जावें तसतसा आपणांस आसमंतांतील पृष्ठभाग दिसूं लागतो ; तसेंच तारूं किनाऱ्याजवळ येऊं लागलें म्हणजे, प्रथम शिडें दिसतात, नंतर खालचा भाग दिसतो. पृथ्वी जर गोलाकार नसती तर असें झालें नसतें ; कारण

पृथ्वीचा फुगलेला भाग, आपली दृष्टि आणि गलबताचा अथवा दुसऱ्या पदार्थाचा खालचा भाग यांचे आड येतो.

(३) परंतु या दोहींपेक्षां चंद्रग्रहणाचें प्रमाण फारच उघड आहे. जेव्हां चंद्रग्रहण होतें तेव्हां पृथ्वी ही चंद्र आणि सूर्य यांजमध्यें येते; आणि तिची छाया चंद्रावर पडून तो काळा दिसूं लागतो, व तो काळा झालेला भाग नेहमीं वाटोळा असतो.

पृथ्वीला दोन गती आहेत. एक ती आपल्या आंसाभोंवतीं पश्चिमेकडून पूर्वेकडे दिवसांतून एकदां फिरते, व तशीच फिरत फिरत वर्षांतून एक वेळ सूर्यासभोंवतीं फिरते. पहिल्या गतीस **दैनंदिन** आणि दुसरीस **वार्षिकगति** असें ह्मणतात. पृथ्वीच्या वार्षिक गतीमुळें निरनिराळे ऋतु होतात. म्हणजे मुख्यत्वेंकरून थंडी आणि उष्णता यांच्यामध्यें फेरफार पडतो.

पृथ्वीच्या मध्य बिंदूतून एक रेषा उत्तर दक्षिण जाते अशी कल्पना करितात. त्या रेषेला आंस म्हणतात व आंसाचे दोहों शेवटांस **ध्रुव** म्हणतात. उत्तरेकडे तो **उत्तरध्रुव** व दक्षिणेकडे तो **दक्षिणध्रुव.** या दोन ध्रुवांपासून सारख्या अंतरावर पृथ्वीच्या पृष्ठभागामधून पूर्वपश्चिम जी एक काल्पित रेषा असते तिला **विषुववृत्त** अथवा **भूमध्यवृत्त** किंवा **मध्यरेषा** असें म्हणतात. हिच्या योगें पृथ्वीचे उत्तरगोलार्ध व दक्षिण-गोलार्ध असे दोन भाग होतात. विषुववृत्ताची लांबी २४८९९ मैल आहे. हें वृत्त खालच्या गिनी, सुमात्रा, सिंगापूर आणि ओ,

सेलीबीस, ग्यालापेगोजबेटें, इक्केडार, केटो आणि ब्राझील या स्थलांवरून जातें. याच्या योगें अटलांटिक व पासिफिक महासागरांचे दोन भाग झाले आहेत. त्यांस उत्तर अटलांटिक व उत्तर पासिफिक, आणि दक्षिण अटलांटिक व दक्षिण पासिफिक अशीं नांवें आहेत.

**रेखावृत्तें**—ध्रुवस्थानांशीं एकत्र होणाऱ्या, व अक्षवृत्तांवर लंबरूप अशा ज्या रेषा काढलेल्या असतात त्यांना **याम्योत्तरवृत्तें** किंवा **मध्यान्हरेषा** किंवा **रेखावृत्तें** ह्मणतात. ह्यांची लांबी २४८५६ मैल आहे.

**क्रांतिवृत्त.**—भूमध्यवृत्तास छेदून जाणारें कर्कवृत्तापासून मकरवृत्तापर्यंत जें एक तिर्कस वृत्त कल्पिलें आहे तें होय. ह्यावरून सूर्य फिरतोसा दिसतो. **भूमध्यवृत्त**, **रेखावृत्त**, आणि **क्रांतिवृत्त** हीं महत् वृत्तें आहेत.

**अयनवृत्तें.**—भूमध्यवृत्तापासून समांतरानें उत्तरेकडे २३½ अंशांवर एक, व दक्षिणेकडे २३½ अंशांवर एक, अशा दोन कल्पित रेषा आहेत, त्यांस अयनवृत्तें ह्मणतात. उत्तरेकडील अयनवृत्तास **कर्कवृत्त** व दक्षिणेकडील अयनवृत्तास **मकरवृत्त** अशीं नांवें आहेत.

**ध्रुववृत्तें.**—प्रत्येक ध्रुवापासून २३½ अंशांवर जें वृत्त कल्पिलें आहे तें होय. उत्तरेकडील वृत्तास **उत्तर ध्रुववृत्त** व दक्षिणेकडील वृत्तास **दक्षिणध्रुववृत्त** अशीं नांवें आहेत.

**लघुवृत्तें.**–( समांतर वृत्तें ) भूमध्यवृत्ताशीं समांतर जीं अन्यवृत्तें तीं होत. **अयनवृत्तें** व **ध्रुववृत्तें** हींही लघुवृत्तें होत.

**अक्षांश.**–एखाद्या जागेचे अक्षांश म्हणजे भूमध्यवृत्तापासून उत्तरेकडे किंवा दक्षिणेकडे जें अंतर तें,त्या जागेचे उत्तर किंवा दक्षिण अक्षांश होत. अतिशय अक्षांश ९० अंशपर्यंत भरतात. भूमध्यवृत्तापासून उत्तरेकडे उत्तर अक्षांश, व दक्षिणेकडे ते दक्षिण अक्षांश. भूमध्यवृत्तावरील जागेला अक्षांश नाहींत.

**रेखांश.**–कोणत्याही ठरविलेल्या मध्यान्ह रेषेपासून [पहिले याम्योत्तर वृत्तापासून ] पूर्वेकडे किंवा पश्चिमेकडे १८० अंशपर्यंत जें अंतर तें त्या जागेचे पूर्व किंवा पश्चिम रेखांश होत.

प्रत्येक वृत्ताचे ३६० अंश, वृत्तार्धाचे १८०, व वृत्तपादाचे ९० अंश आहेत. एका अंशाबरोबर ६० कला, व प्रत्येक कलेच्या ६० विकला होतात. एका अंशाबरोबर भूगोल शास्त्रीय मैल ६ व व्यवहारीक मैल ६९$\frac{1}{10}$

इंग्रज व कांहीं इतर लोक रेखांश, लंडन शहराजवळ **ग्रीनिच** येथें जी वेधशाळा आहे, तिजवरून जाणाऱ्या याम्योत्तरापासून पूर्वपश्चिम मोजितात. हिंदु ज्योतिषी लंकेवरून किंवा उज्जयनीवरून जाणाऱ्या रेषेपासून मोजितात. फ्रेंच पारिस शहरापासून मोजितात.

**कटिबंध**–कटिबंध पांच आहेत. कर्क आणि मकरवृत्त यांचेमधील प्रदेशास **उष्णकटिबंध** असें ह्मणतात. यामध्यें ४७ अंशांचा भाग येतो. **समशीतोष्ण कटिबंध** दोन आहेत,

त्यांतून कर्कवृत्तापासून उत्तरध्रुववृत्तापर्यंत एक ४३ अंश, व मकरवृत्तापासून दक्षिण ध्रुववृत्तापर्यंत दुसरा ४३ अंश आहे. शीतकटिबंध दोन आहेत त्यांतून एक उत्तर ध्रुववृत्तापासून उत्तरध्रुवापर्यंत २३½ अंश, व दुसरा दक्षिण ध्रुववृत्तापासून दक्षिण ध्रुवापर्यंत २३½ अंश आहे.

**उष्ण कटिबंधांतील उत्पन्न**—उत्तम प्रकारचीं फुलें, मोठमोठाले वृक्ष, भात, मका, केळीं, नारळ, चहा, बाजरी, रताळू, नारिंगें, लिंबें, अननस, फणस, अंजीर, द्राक्षें, आंबे, डाळिंब, बुंद, कापूस इ०. हत्ती, गेंडे, सिंह, वाघ, सुसर, साप, पोपट इत्यादि जनावरें. येथील लोकांचा रंग काळा, शरीरानें ठेंगणे, व बुद्धीनें ते फार मंद असतात.

**समशीतोष्ण कटिबंधांतील उत्पन्न** गहूं, बटाटे, कापूस, द्राक्षें, अंजीर, नारिंगें, गाई इत्यादि घोडे, गाढवें, बैल, उंट, अस्वल, लांडगे, वनमहिषी, सांबर, हरणें इत्यादि जनावरें. येथील लोकांचा वर्ण गोरा, शरीरानें बळवान, तसेच मेहनती, ज्ञानी व हुशार असतात.

**शीतकटिबंधांतील उत्पन्न**—कोणतेही प्रकारचें धान्य उत्पन्न होत नाहीं; परंतु तेथील लोक जमिनींत खत घालून उत्पन्न करितात. पांढरीं अस्वलें, एका प्रकारचीं हरणें व कुत्रे हीं जनावरें आढळतात मनुष्यें फार ठेंगणीं व अज्ञानी असतात.

## पृथ्वीचा पृष्ठभाग.

पृथ्वीच्या पृष्ठभागाचे **जमीन** व **पाणी** असे दोन मुख्य

गा आहेत. पृथ्वीचे पृष्ठभागाचें क्षेत्रफळ सुमारें १९ कोटी पासष्ट लक्ष चौरस मैल आहे. ह्यापैकीं ५,१५,०४,००० मैल जमीन आहे, व बाकीचा भाग समुद्रानें आच्छादिला आहे. ह्मणजे पृथ्वी चार भाग आहे, अशी कल्पना केली तर एक भाग जमीन व तीन भाग पाणी असें प्रमाण पडतें.

## जमिनीचे भाग.

१. **महाद्वीप**—जमिनीच्या ज्या मोठ्या भागास महासागराचा वेढा असून त्यांत अनेक देशाचा समावेश होतो त्या भागास **महाद्वीप** ह्मणतातः—जसें, आशियाखंड, यूरोपखंड आणि आफ्रिकाखंड. हीं तीन खंडें मिळून **प्राचीन महाद्वीप** झालें आहे. उत्तर अमेरिका व दक्षिण अमेरिका मिळून **अर्वाचीनमहाद्वीप** झालें आहे. या महाद्वीपाचा कोलंबसानें इ०स० १४९२ सालीं शोध लाविला.

२. **द्वीप किंवा बेट**—चोहोंकडून पाण्यानें वेष्टित जो जमिनीचा प्रदेश त्यास द्वीप ह्मणतात. जसें सिंहलद्वीप(सिलोन).

३. **द्वीपकल्प**—(बहुतेक बेट) बहुतकरून पाण्यानें वेष्टित जमिनीचे भागाला द्वीपकल्प ह्मणतात. जसें, विंध्याद्रीच्या दक्षिणेकडील हिंदुस्थानाचा भाग; काठेवाड इ०.

४. **संयोगभूमि** जमिनीचे दोन मोठ्या प्रदेशांस जोडणारा जो जमिनीचा अरुंद भाग त्यास संयोगभूमि ह्मणतात. जसें, क्राची संयोगभूमि, मलाया आणि सयाम यांचेमध्यें आहे.

५. **भूशलाका**—जमिनीचा भाग अरुंद होत होत पाण्यांत जातो त्या भागाला भूशिर किंवा भूशलाका ह्मणतात. जसें, रोमानिया मलायाचे दक्षिणेस आहे; कामोरीन, इ०,

६. **पर्वत व डोंगर**—पृथ्वीचे सपाटीवर जो मोठा उंचवटा असतो त्यास **डोंगर** ह्मणतात. असे पुष्कळ डोंगर फारच उंच असून एकास एक लागून असले तर त्यांस पर्वत असें ह्मणतात.

७. **उंचवट्याचें मैदान**—समुद्राचे सपाटीपेक्षां फार उंच जो जमिनीचे विस्ताराचा प्रदेश त्यास उंचवट्याचें मैदान ह्मणतात. जसें, ह्मैसूर देश.

## पाण्याचे भाग.

१. **समुद्र**—जमिनीचे लगत्यास जो महासागराचा भाग असतो, त्यास समुद्र ह्मणतात. याचे उलट **महाद्वीप.**

२. **सरोवर**—चोहोंकडून जमिनीनें वेष्टित जो पाण्याचा प्रदेश त्यास सरोवर ह्मणतात. जसें,चिलका. याचे उलट **द्वीप.**

३. **उपसागर**—सागराचा जो भाग मोठें वांकण घेऊन जमिनिवर गेलेला असतो त्यास उपसागर ह्मणतात. जसें,हिंदुस्थानचे दक्षिणेस बंगालचा उपसागर. याचे उलट **द्वीपकल्प.**

४. **अखात**—समुद्राचा भाग जमिनीवर लांब गेला असतो त्यास अखात ह्मणतात. जसें कच्छचें अखात.

५. **सामुद्रधुनी**—दोहोंकडून जमीन असून दोन समुद्रास

जोडणारा जो समुद्राचा अरुंद भाग त्यास सामुद्रधुनी किंवा संयोगीजल असें ह्मणतात. याचे उलट संयोगीभूमि.

६. **खाडी**-नदीचे मुखांतून समुद्राचे भरतीचें पाणी जेथ-पर्यंत जातें त्या भागास खाडी ह्मणतात. जसें, जैतापूरची खाडी, वसईची खाडी. याचे उलट **भूशलाका.**

७. **नदी**-डोंगर, उंच जमीन किंवा सरोवर यांतून नि-घालेला जो गोड पाण्याचा मोठा प्रवाह त्यास नदी ह्मणतात. जसें, सिंधु, गंगा.

## खंडें.

**आशिया, युरोप, आफ्रिका** आणि **अमेरिका** अशीं पृ-थ्वीचीं चार खंडें आहेत. **पासिफिक** महासागराच्या दक्षिण भागांतील जीं अनेक बेटें त्या सर्वांस **ओशियानिया** असें ह्मणतात, आणि तें पांचवें खंड असें मानितात.

## महासागर.

सर्व पृथ्वीवरील पाण्याचे पांच भाग केले आहेत. **उत्तर महासागर** उत्तरध्रुवाजवळ आहे. **दक्षिणमहासागर** दक्षिण ध्रुवाजवळ आहे. **आतलांतिक महासागर** युरोप व आफ्रिका यांच्या पश्चिमेस, आणि अमेरिकेच्या पूर्वेस आहे. **हिंदीमहा-सागर** आशिया खंडाच्या दक्षिणेस आहे. आणि **पासिफिक महासागर** अमेरिकेच्या पश्चिमेस व आशिया आणि आस्ट्रे-लिया यांच्या पूर्वेस आहे.

# हिंदुस्थान.

या देशाकडे आपणांस विशेष लक्ष दिलें पाहिजे. कारण हा आमचें राहण्याचें स्थान आहे. हिंदुस्थान हें आशिया खंडाचे दक्षिणभागीं एक मोठें द्वीपकल्प आहे.

**सीमा.**—उत्तरेस हिंदुकुश आणि हिमालयपर्वत. पू० ब्रह्मदेश आणि बंगालचा उपसागर. द० हिंदीमहासागर. प० हाला व सुलेमान पर्वत, आणि आरबी समुद्र. लांबी उ० दक्षिण १९०० मैल, व रुंदी १८०० मैल. क्षेत्रफळ १५८२१२० चौरस मैल, ह्मणजे सुमारें इंग्लंड आणि वेल्साचे क्षेत्रफळाचे २८ पट आहे. हा सर्व यूरोपखंडाचे तिसरे हिशाहून बराच मोठा आहे. लोकसंख्या सुमार २५ कोटी आहे.

**समुद्रकिनारा.**—पूर्वबाजूस **कारोमांडलचा किनारा** ह्मणतात; व नैर्ऋत्येकडील बाजूस **मलबारचा किनारा** ह्मणतात. पश्चिमेकडून पूर्वेकडे जमीन सखल होत गेली आहे, हें कारोमांडलच्या किनाऱ्यावर ज्या नद्या मिळतात त्यांवरून लक्षांत येतें. सर्व किनाऱ्याची लांबी ३५०० मैल आहे.

**द्वीपकल्प.**—काठेवाड हें द्वीपकल्प खंबायतचें अखात व कच्छचें अखात यांच्यामध्यें आहे.

**भूशिरें.**—दिव काठेवाड द्वीपकल्पाचे दक्षिणेस . .

कामेरोन हिंदुस्थानचे दक्षिणेस आहे. मौंझ सिंधप्रांतांत. जगत गुजराथचें टोंक. रामास गोंव्याचे दक्षिणेस. कालमीर हिंदुस्थानचे आग्नेयीस. पालमिरास कटक प्रांतांत आहे.

बेटें.–सिलोन हें हिंदीमहासागरांत हिंदुस्थानच्या दक्षिणेस आहे. हें बेट व हिंदुस्थान यांच्यामध्यें पाल्कची सामुद्रधुनी आहे. या सामुद्रधुनीची या ठिकाणीं रुंदी फक्त ९८ मैल आहे ह्या बेटाची लांबी २७१ मैल व अतिशय रुंदी १३७ मैल आहे. लोकसंख्या २४०६२९० आहे. हें आयर्लंदचे सहावे हिशाबरोबर आहे. येथील डोंगरांवर दाट अरण्य आहे. पेद्रोताल्लागेला नामक शिखराची उंची ८२८० फूट, व आदमचे शिखराची उंची ७४२० फूट आहे. ह्यांतील अतिशय मोठी नदी ह्मटली ह्मणजे माहुली गंगा, ही आदम्स पीकचे पूर्वेस उगम पावून उत्तर किनाऱ्यास मिळते, हिची लांबी १३० मैल आहे. कोलोंबो हें मुख्य राजधानीचें शहर पश्चिम किनाऱ्यावर आहे. गॉल हें उत्तम बंदर नैर्ऋत्य किनाऱ्यावर आहे. येथें मुंबई, कलकत्ता, चीन, यूरोप आणि आस्ट्रेलिया येथून आगबोटी व्यापाराकरितां लागतात. ट्रिंकोमाली नांवाचें बंदर माहुलीगंगेच्या मुखाशीं आहे. क्यांडी ही जुनी राजधानी, येथून कोलोंबोपर्यंत आगगाडीचा रस्ता आहे. ह्याशिवाय अनुराधापूर, कात्रगांव, मतुरा, कुरुनेगाले, जाफना इत्यादि शहरें आहेत. न्युरेलिया हें उत्तम हवेचें स्थान आहे.

मानारच्या आखातांत मोत्यें काढण्याचें काम चालतें. मुख्य उत्पन्न भात, नारळ, काफी, दालचिनी, साखर, तंबाखू आणि काळे मिरीं हें होय. अरण्यामध्यें हत्ती, चित्ते आणि आस्वलें सांपडतात. येथील सिंघालीज लोकांचा धर्म बौध व तामील लोकांचा हिंदु आहे. ह्या बेटाचें राज्य चालविण्याकरितां राणी सरकाराकडून एक गव्हरनर नेमिला जातो. पूर्वी येथीलच राजे राज्य करीत होते. सन १५१८ मध्यें हें बेट पोर्तुगीज लोकांनीं घेतलें, व त्यांपासून १६५६ सालीं दच लोकांनीं घेतलें व पुढें १८१५ पासून इंग्लिश लोकांचा पूर्ण आधिकार चालू झाला. **रामेश्वर** आणि **मनार बेटें**.—हीं सिलोन व हिंदुस्थान यांमध्यें आहेत. **मालदिव व लखदिव बेटें** ( लक्षद्वीप ).—" मलबार किन्याऱ्याजवळ हिंदीमहासागरांत आहेत. **अंदमान बेटें**.—हा द्वीपसमूह बंगाल समुद्राचे पूर्वभागीं २२६ मैलपर्यंत पसरला आहे. दक्षिण अंदमानचें बंदर फार चांगलें आहे. या ठिकाणीं मोठे अपराधी लोकांस पाठवितात. **निकोबार बेटें**.—हीं अंदमानचे दक्षिणभागीं आहेत; येथील हवा वाईट आहे. या ठिकाणीं मलाई लोकांची वस्ती आहे. मुंबई, साष्टी, घारापुरी, करंजे, इत्यादि बेटें पश्चिम किन्याऱ्यावर आहेत. **द्वारका** कांठेवाडचे पश्चिमेस, व **दीव** दक्षिणेस आहे. **परीम** नर्मदेच्या मुखाजवळ आहे, व **धंतुरिया** हें मध्यभागीं आहे.

**पर्वत**.—**हिमालय** पर्वतांची ओळ [ हिम+आलय म्हणजे

बर्फाचें स्थान, कारण ह्याचीं शिखरें नेहमीं बर्फमय असतात.] याची एकंदर लांबी १५०० मैल अथवा २२ रेखांश आहे. मध्यम प्रमाणानें रुंदी १५० मैल, उंची ४००० फूट पासून २९००० फूटपर्यंत. हे पर्वत वायव्य दिशेस सिंधुनदापासून पूर्वभागीं सांपू व ब्रह्मपुत्रा यांचे संगमापर्यंत पसरले आहेत. याचीं शिखरें अनेक आहेत, त्यांपैकीं एव्हरेस्तची उंची २९ हजार फूट; कांचनगंगाची उंची २८१५६ फूट; धवलागिरीची उंची २६८२६ फूट; नंदा देवी कमाऊन प्रांतात उंची २५७०० फूट; सळपू उंची २८२४२ फूट; चंबलारी भूतानमध्यें, उंची २३९२९ फूट. यांशिवाय गोसाइस्थान, कुनलस, जवाहीर, बद्रिनाथ, जननोत्री, राल्दंग, इत्यादि आहेत. या पर्वतांमध्यें अनेक सरोवरें आहेत. त्यांपैकीं काश्मीरमधील उलूर नामक सरोवर फार मोठें आहे. हिमालय पर्वतांतील १६ हजार फूट उंचीवरील सर्व रस्ते नोव्हेंबर महिन्यापासून मे महिन्यापर्यंत बर्फानें बंद होतात. २. सुलेमान पर्वत.—ही ओळ सिंधुनदाचे पश्चिमेस २९ अक्षांश पासून थेट काबूल नदीपर्यंत अथवा ३४ अक्षांशपर्यंत पसरली आहे. ह्या ओळीची लांबी उत्तर दक्षिण सुमारें ३५० मैल आहे. सर्वांहून उंच शिखर तख्त-इ-सुलेमान याची उंची ११३१७ फूट आहे. ह्या ओळीच्या उ० खैबर पर्वताची ओळ आहे. तीमध्यें खैबरपास नामें हिंदुस्थानांतून काबूलास जाण्याचा रस्ता आहे.

३. हाला.—ह्या नांवाची पर्वताची ओळ बलुचीस्थानचे पूर्वेस दक्षिणोत्तर गेली आहे. ४. पबपर्वत.—हालापर्वताचे दक्षिण सिमेवर आहे. ह्याची दक्षिणोत्तर लांबी सुमारें ९० मैल आहे. ५. सह्याद्रि.—ही ओळ कांहीं पश्चिम किनाऱ्यावर [पश्चिम घांट] व कांहीं पूर्व किनाऱ्यावर [पूर्व घांट] अशी पसरली आहे. ह्यांपैकीं पश्चिमेकडील ओळ फार उंच आहे. ही पश्चिम किनाऱ्याशीं ह्मणजे मुंबईपासून कन्याकुमारिकापर्यंत बहुतेक समांतर गेली आहे. लांबी सुमारें ८०० मैल आहे. हिची महाबळेश्वराजवळ उंची ४५४० फूट आहे. ११ अ॰ क्षांशांचे सुमारास ह्या ओळीस नीलगिरी नांवाचे पर्वत मिळतात. ह्या पर्वतामधील दोदाबेटा नामक शिखराची उंची ८७६० फूट आहे. पुढें दक्षिणेस सुमारें २५ मैल गेल्यावर पालघांटची खिंड लागते. या दरीचे दक्षिणेस ह्या ओळीची उंची कमी होत होत केपकामोरीनजवळ तिचा शेवट होतो. ६. विंध्या आणि सातपुडा.—हे पर्वत सह्याद्रीचे उत्तरेस आहेत; ह्या ओळीमधून नर्मदानदी वहाते. हे पूर्वपश्चिम गेले आहेत. त्यांची लांबी १५० पासून २०० मैलपर्यंत आहे. विंध्या पर्वताची ओळ खंबायतचे अखातापासून भागीरथी नदीचे आलीकडे सासरांव गांवापर्यंत गेली आहे. सातपुडा किंवा इंजाद्रि, विंध्याद्रिजवळच, आरंभापासून नर्मदा व तापी नद्यांमध्यें आहे. या ओळीवर बहुतकरून भिल्ल लोकांची वस्ती

आहे. ७. आरवलीपर्वत.—ह्या ओळीचा आरंभ खंबायतचे अखातापासून होऊन ईशान्य दिशेस दिल्ली शहराजवळ मांदवधीजवळ शेवट झाला आहे. या ओळीचे दक्षिण शेवटाजवळ आबू नामक शिखराची उंची सुमारें ५००० फूट आहे. ८. चितूरपर्वत.—हे उदेपूर शहराचे नैर्ऋत्येस आरवली पर्वताचे ओळीपासून फुटून त्याच ओळीचे समांतरानें चंबळा नदीचे पश्चिमेकडून आग्रा शहरचे दक्षिणेस बाणगंगा नदीपर्यंत गेले आहेत. ९. शिवालिक पहाड.—ही ओळ यमुना व भागीरथी ह्या नद्यांमधील प्रदेशाचे ईशान्यसीमेनें जाते. १०. किमूर डोंगर.—हे गंगा व यमुना ह्यांचे ईशान्येस आहेत, यांमध्यें लोखंड व कोळसे सांपडतात. ह्यांचे आग्नेयेस सिरगुजाचे डोंगर आहेत, त्यांत जंगल फार दाट असून, क्रूर श्वापदें राहतात.

**समुद्र, अखातें, खाड्या, सामुद्रधुन्या.**—**हिंदीमहासागर** हिंदुस्थानच्या दक्षिणेस आहे. हा महासागर व चिनई समुद्र यांचे मध्यें **मलाका, संडा** आणि **फ्लारोस** या सामुद्रधुन्या आहेत. **बंगालचा उपसागर** व **आरबीसमुद्र** हे याचे भाग आहेत. **मार्टाबानचे अखात** पेगू व तेनासरीम यांमध्यें आहे. **कच्छचें अखात** काठेवाडच्या वायव्येस, व **खंबायतचें अखात** आग्नेयेस आहे. **मानारचें** अखात व **पाल्कची** सामुद्रधुनी हीं सिलोन व हिंदुस्थान यांमध्यें आहेत. **पोम्बेनची** सामुद्रधुनी रामेश्वर व हिंदुस्थान यांमध्यें आहे.

**सरोवरें.**—**पालिकतचें** सरोवर मद्रासचे उत्तर किनाऱ्यावर आहे, ह्याची लांबी ३३ मैल व रुंदी ११ मैल आहे. **चिलका** सरोवर कटकचे दक्षिणेस ओरिसाचे किनाऱ्यावर आहे. त्याची लांबी ४२ मैल व रुंदी १५ मैल आहे. **सांबर** रजपुतान्यांत आरवली पर्वताचे उत्तर टोकास आहे. त्याची लांबी १२ मैल व रुंदी ६ मैल आहे. **उलूर, दल** आणि **मानसबल** हीं काश्मीरमध्यें आहेत. उलूरचें पाणी गोडें आहे. त्याची लांबी २१ मैल व रुंदी ९ मैल आहे. **मन्दर** सिंधप्रांतांत आहे. **लोणार** वऱ्हाड प्रांतांत आहे. **विहार** साष्टी बेटांत आहे.

**नद्या.**—( बंगालच्या उपसागरास मिळणाऱ्या )—१. **ब्रह्मपुत्रनद.**—हा हिमालयाचे उत्तरेस तिबेटामध्यें सिंधु आणि सतलज यांचे उगमाजवळच उगम पावतो. असामांतून वाहतांना ह्याला दिवांग व दिहोंग ह्या नद्या मिळतात. हा हिमालयाचे उत्तर सीमेनें १००० मैलपर्यंत पूर्ववाही होऊन पुढें ह्या पर्वताचे ओळीमधून दक्षिणेकडे वळला आहे, तेथें वायव्येकडून सुहानश्री नदी याला मिळते, हा बंगाल प्रांतांतून वहात असतां सुर्मा, बरक, आणि गोमती ह्या नद्या डावे तीरास व गददा, चंपामती, नीलकुमर आणि तिस्ता ह्या उजवे तिरास मिळतात. हा बंगालचे उपसागरांत तीन मुखांनीं मिळतो. त्यांचीं नांवें:—**मेगना** पूर्वभागीं, **कोनै** मध्यभागीं, व **गंगा** पश्चिमभागीं. ह्याची लांबी १८०० मैल आहे. २. **गंगा** किंवा

भागीरथी.–हिचा उगम हिमालयाचे दक्षिणेस गर्वाल प्रांतांत होतो, गंगोत्रीपर्यंत गेल्यावर ही हिमालयांतून हरिद्वाराचे ईशान्य दिशेनें बाहेर पडते. पुढें हिला अलकनंदा, जान्हवी, भागीरथी ह्या नद्या मिळतात. तेथून पुढल्या प्रवाहास गंगा असें नांव पडलें आहे. अलहाबादचे उत्तरेस हिला रामगंगा मिळते. पुढें हिमालय पर्वतांतील जमनोत्री शिखरांतून निघणारी यमुना नदी मिळते. ही ७८० मैलपर्यंत वाहून अलाहाबादेजवळ गंगेला मिळते. दक्षिणेकडून यमुनेला मिळणाऱ्या नद्यांपैकीं माळवा प्रांतांतून वाहणाऱ्या चंबला आणि बेत्वा ह्या नद्या मुख्य आहेत. काशीजवळ गंगेस गोमती नदी मिळते; पुढें कावून प्रांताचे उत्तरेकडून वाहणारी घोग्रा नदी मिळते. हिचा उगम ह्याच प्रांतांत होतो. पाटणाजवळ सोन (पुराणप्रसिद्ध शोणभद्र नद) दक्षिणेकडून गंगेला मिळतो हाजीपुराजवळ उत्तरेकडून गंडकी नदी मिळते. पुढें कौशिकी (कुशी) नामक नदी मिळते. याशिवाय हिला उत्तरेकडून मिळणाऱ्या नद्या.—राप्ती, भोगावती, महानंदा, तिस्ता, इत्यादि व दक्षिणेकडून तामसी, कर्मनाशा इ० आहेत. सुमारें उत्तर अक्षांश २४ व पूर्वरेखांश ८९ यांचेमध्यें ही ब्रह्मपुत्राला मिळते. पुढें कलकत्यावरून जाणारा हुगळी नामक फांटा फुटतो क्या पुढें ही अनेक मुखांनीं बंगालच्या उपसागरास मिळते. हिची एकंदर लांबी १५१९ मैल आहे. गंगानदीचे मुखापासून

१३३४ मैल ह्मणजे हरिद्वारपर्यंत व्यापारी गलबतें व आगबोटी जातात. गंगानदीचे कालवे वर्णन करण्यासारखे आहेत. ह्यांतील एक हरिद्वारापासून आणि घरावरून कानपूरपर्यंत गेला आहे. त्याची लांबी सुमारें ९०० मैल आहे.

३. गोदावरी नदी.—ही पश्चिम घांटाचे पूर्व उतरणीवर त्र्यंबकेश्वर येथून उगम पावते. हिला उजवे बाजूनें मुला आणि मांजरा ह्या नद्या मिळतात, व डावेकडून दुधना, वाईनगंगा, पाइनगंगा, आणि वर्धा ह्या नद्या मिळतात. नंतर ही सुमारें ९०० मैल वाहून बंगालच्या उपसागरास मिळते. हिचे मुखापासून १४३ मैलपर्यंत लहान लहान आगबोटी जातात. ४. महानदी.—ही मध्यप्रांतांतील छत्तीनगडाजवळचे डोंगरांत उगम पावून आग्नेयेकडून कटक शहराजवळ जाते, व त्या ठिकाणीं तिचे अनेक फांटे होऊन नंतर बंगालचे उपसागरास मिळते. हिची लांबी ५२० मैल आहे. ५. कृष्णानदी.—पश्चिम घांटांत महाबळेश्वराजवळ उगम पावते. पुढें आग्नेयेकडून वाहून बंगालचे उपसागरास मिळते. हिची लांबी ८०० मैल आहे हिला वेण्या, कोयना, वारणा, पंचगंगा, घटप्रभा, मलप्रभा, तुंगभद्रा, इत्यादि नद्या उजवे तिरानें, व भीमा, दिंडी, मुशी, इत्यादि नद्या डावे तिरानें मिळतात. ६. पेनार. (उत्तर)—ही म्हैसूर प्रांतांत चंद्रदुर्गामध्यें उगम पावून नेल्लोर शहराजवळ बंगालचे उपसागरास मिळते. हिची लांबी ३५५

## हिंदुस्थानचें सामान्य वर्णन.

[illegible] पन्नार (दक्षिण ).–हीहि म्हैसुरांत उगम पावून, पा[illegible] कडलूर यांचे दरम्यान बंगालचे उपसागरास मिळते. हिची लांबी २४९ मैल आहे. ७. **कावेरी.**–हिचा उगम पश्चिम घांटांत कुर्ग (कोडगु) देशांत झाला आहे. तेथून ही ४७२ मैलांवर जाऊन तंजावर प्रांतांत अनेक मुखांनीं बंगालचे उपसागरास मिळते. हिला कोलेरून, भवानी, हिनवती, वगैरे नद्या मिळतात. ८. **सुवर्णरेखा.**–हिचा उगम छोटा नागपुरांत आहे. लांबी ३०० मैल. ही बंगालचे उपसागरास मिळते. ९. **वैतरणी.**–हिचा उगम छोटा नागपुरांत आहे. ही पाल्मिरा भूशिराजवळ बंगालचे उपसागरास मिळते. हिची लांबी ४०० मैल आहे. १०. **ब्राह्मणी.**–हिचा उगम पाचामोऊ प्रांतांत आहे. हिची लांबी ४०० मैल, ही बंगालचे उपसागरास मिळते. [ आरबी समुद्र व हिंदीमहासागर यास मिळणाऱ्या नद्या ]. १. **सिंधुनद.**–हा तिबेटांत हिमालय पर्वताचे कैलास नांवाचे डोंगरापासून उत्पन्न झाला आहे. प्रथमतः ह्याचा प्रवाह वायव्येकडून आहे. नंतर ह्याला काश्मीरचे डोंगरांतून झसकर व द्रास, आणि काराकोरम मार्गांतून शयोक ह्या नद्या मिळतात. शयोक नदीचा संगम झाल्यावर ह्याला सिंधु असें नांव पडतें. अटक शहराचे उत्तरेस दरचे बाजूस ह्याला काबूल नदी मिळते व मिथुनकोटाजवळ पंचनद मिळतो. शिकारपुराजवळ ६० मैलांवर हिजपासून नारा

या नांवानें एक फांटा फुटतो, तो पुढें १२० मैलपर्यंत वहात जाऊन पुनः सहवान शहराजवळ ह्या नदाला येऊन मिळतो. सिंधूची लांबी १८०० मैल आहे. ह्याचे मुखापासून अटकपर्यंत, ह्मणजे ९४२ मैलपर्यंत, गलबतें जातात. हिंदुस्थानचे मैदानांत येण्यापूर्वी ह्याला सिंखाबाब व अबिसिंद हीं नांवें चालतात. ह्या नदीचे उजवे तिरास मिळणाऱ्या नद्यांचा हिंदुस्थानाशीं कांहीं संबंध नाहीं. डावे तिरास पंजाब देशांतील झेलम, चिनाब, रावी, घारा ऊर्फ सतलज आणि बयास ह्या नद्या मिळतात. **सतलजनदी.**—हिचा उगम तिबेटामध्यें मानस व रावण ह्या सरोवरांमध्यें आहे. हिला सिम्ला शहरा पलीकडे सोब्रान शहराजवळ ब्यास नदी मिळते. पुढें ही घारा नांवानें ३०० मैल जाते; ऊच शहराजवळ हिला चिनाब नदी मिळते. पुढें पंचनद या नांवानें मिथुनकोटाजवळ सिंधूस मिळते. **रावी.**—हिमालय पर्वतामध्यें उगम पावून ४२० मैलपर्यंत वाहून चिनाबचे डावे तिरास मिळते. **चिनाब.**—हिचा उगम लाहूलमध्यें होतो, वजिराबाद शहराजवळ हिचें पात्र दीड मैल रुंद व १४ फूट खोल आहे ६०५ मैल वाहून गेल्यावर ही झेलमला मिळते; पुढें ५० मैलांवर हिला रावी मिळते. मग ११० मैलपर्यंत हिला त्रिमाब नांव चालतें. **झेलम.**—हिचा उगम काश्मीरचे खिंडींतून आहे. हिला किशनगंगा उत्तरेकडून मिळते. पुढें डावे तिरास पिरपंजल नांवाची नदी मिळते. ओहि-

पासून चिनाबचे संगमापर्यंत गलबतें जातात. २. **नर्मदा.**— हिचा उगम गोंडवनांत अमरकंटक नांवाचे उंचवट्याचे प्रदेशांत महाल डोंगरामध्यें होतो. तेथून विंध्या व सातपुडा यांमधून वाहून खंबायतचे अखातास मिळते. लांबी ८०० मैल. गलबतें मुखापासून ३० मैळपर्यंत ह्मणजे भडोचपर्यंत जातात. ३. **तापी**—हिचा उगम सातपुड्यामध्यें बैतुल गांवाजवळ आहे. ही बहुतेक नर्मदेशीं समांतर वाहून सुरतेपासून २० मैलांवर खंबायतकडा अखातास मिळते; हिची लांबी ४४१ मैल आहे; व १७ मैळपर्यंत गलबतें चालतात. ४. **साबरमती**- राजपुतान्यांतील उदेपूर प्रांताचे डोंगरांत उगम पावून खंबायतचे अखातास मिळते. लांबी २०० मैळ आहे. ५. **मही**- हिचा उगम माळवा प्रांतांत आहे; ही खंबायतच्या अखातात मिळते. लांबी २५० मैळ आहे.

## नद्या व त्यांचे काठचीं शहरें.

१ **ब्रम्हपुत्रा.**—टेशुलंबु, लासा, जिकाजेस, विश्वनाथ, गोहाटी, डाका.

२ **गंगा.**—कलकत्ता, भागलपूर, मोंगीर, हाजीपूर, दिनापूर, पाटणा, गाजीपूर, बनारस, अलाहाबाद, रायबरेली, कानपूर, फरुकाबाद, बिजनौर, हरिद्वार, श्रीनगर

१. **घा मती.**-काटमंडू, मकानपूर, मुझफरपूर.

२. गोमती.—लखनौ, सुलतानपूर, ज्वानपूर.

३. यमुना.—हमीपूर, काल्पी, इटवा, आग्रा, मथुरा, दिल्ली, पानीपत, कर्नुल, सहारणपूर.

१. बटवा.—झांशी, चंदेरी, भेलसा.

४. रामगंगा.—बरेली, रामपूर, अलमोडा.

३. गोदावरी.—त्र्यंबक, नाशिक, कोंपरगांव, पुणतांबें, टोंकें, पैठण, राक्षसभुवन, गंगाखेड, नांदेड, चिनूर, मुंगापेट, राजमहेंद्रि.

१. पाइनगंगा.-मेकर, ओमेरकर, माहूर.

४. महानदी.—पंवळपूर, सोहानपूर, बोड, कटक.

५. कृष्णा.—कऱ्हाड, वाई, माहुली, सांगली, नरसोबा-ची वाडी, सातारा, मिरज, बेझवाडा, मच्छलीपटण.

१. मुशी.—हैदराबाद, गोलकोंडा, मलखेड.

२. भिमा.—पंढरपूर, कोरेगांव, तुळापूर, दौंड, नरसिंगपूर.

३. तुंगभद्रा.—बेदनूर, रायचूर, कनूल, हरिहर.

६. उत्तर पेन्नार.—कडपा, नेलोर.

७. दक्षिण पेन्नार.—बंगलोर, कडलोर.

८. कावेरी.—श्रीरंगपट्टण, म्हैसूर, त्रिचनापल्ली, तंजावर, कारीकल.

९. सिंधु.—लदाक, बलतिस्थान, इस्कार्दो, अटक, काला-

बाग, बक्कर, डेराइस्मायलखान, डेरागाझीखान, मिथुन-कोट, रोरी, लारखाना, सहवान, हाला, कोत्री, हैदराबाद, ठट्टा.

१. सतलज.–रामपूर, सिम्ला, लुधिआना, फेरोजपूर, खैरपूर, भावलपूर, अहमदपूर, ऊच.

२. ब्यास.–जलंधर, मुंडी, सुलतानपूर.

३. चिनाब.–शिम्री, जमू, वजिराबाद, रामनगर, मुलतान, मुजफरगर.

४ रावी.–पोथानकोट, अमृतसर, लाहोर.

५ झेलम.–झेलम, चिळीआनवाला, जलालपूर, शहापूर.

१० नर्मदा.–मंडला, जबलपूर, नरसिंहपूर, हुसंगाबाद, हिंदिया, नमौर, मंडलेश्वर, महेश्वर, बरवानी, भडोच, गुरा.

११. तापी.–बैतुल, आशिरगड, बऱ्हाणपूर, सुरत.

१. पूर्णा.–खोलापूर, इंदुलाबाद.

१२. साबरमती.–अहमदाबाद.

१३. मही.–खंबायत.

**हवा.**–उन्हाळा, हिंवाळा, आणि पावसाळा असे ऋतूंचे भाग करितात. हिंदुस्थानांतील अतिशय उष्ण प्रदेश ह्मटला ह्मणजे कारोमांडलचा किनारा आणि थर नांवाचे पश्चिमेकडील मोठें अरण्य हा होय. उत्तर हिंदुस्थानांतील डोंगरी प्रांतांतील हवा फार थंड आहे. उन्हाळ्यांत युरोपियन लोक आपापले

सोयीप्रमाणें ज्या ठिकाणीं हवा खाण्याकरितां जातात ती ठिकाणें:—**हिमालय पर्वतावरील**—लांडूर, खातु, मिसूरी, खटमंडू, इ०. **पंजाबांत**—सिमला, उंची ८०५५ फूट. **महाराष्ट्रांतील** महाबळेश्वर, उंची ४५४० फूट. पुरंदर, माथेरान, सिंहगड, अंजनीगड, सप्तशृंग इ०. **राजपुतान्यांत** आबू, उंची ५ हजार फूट. **कानड्यांत**—नीलगिरी, उंची ८७०० फूट.

**उत्पन्न—गहूं**—वायव्येकडील प्रांतांत, व पंजाबचे वरचे भागांत, परंतु मुख्यत्वेंकरून यांचे पीक लाहोर आणि मुलतान यांत फार चांगलें होतें. **भात**—हें सर्वत्र पिकवितात, कारण लोकांची उपजीविका यावरच चालते. **जवस**—नीलगिरीवर. कापूस—वायव्येकडील प्रांत, मध्यप्रांत, खासबंगाल्यांत सर्व ठिकाणीं, चितेगांव, आराकान, आणि पेगू देशांमध्यें. **नीळ** खासबंगालचे गंगा व हिमालयांतील उत्तरेकडील सर्द हवेच्या भागांत. **अफू**.—मध्य हिंदुस्थानांतील संस्थानांत. **चहा**.—आसाम व काचरमध्यें उत्तम प्रकारचा होतो. **खनिजपदार्थ**.—**लोखंड** आणि **कोळसे** बरद्वान व जबलपूरमध्यें आणि विशेषेंकरून वर्धा नदीच्या कांठीं चांदा शहराजवळ. **रुपें**—बंगालच्या अरण्यांत सांपडतें **सोनें**—तेनासरीम व पंजाबमधील नद्यांचे तासांत आणि मलबार किनाऱ्यावरही मिळतें. **हिरे, माणकें** वगैरे रत्नें—संबलपूर, व गोवळकोंड्यांत आणि मध्यप्रांतांतील विजापुरांत. **शेंदेलोण**—पंजाबांत मिळतें.

धर्म.–हिंदुस्थानांत हिंदुधर्माचें प्राबल्य फार आहे. ह्याशिवाय बौद्ध, जैन, शीख, मुसलमानी, यहुदी, आणि ख्रिस्ती हेही धर्म आहेत.

# हिंदुस्थानाचें विशेषवर्णन.

हिंदुस्थानाचे पुढें लिहिल्याप्रमाणें राजकीय विभाग करितात. १. ब्रिटिश सरकाराखालचे देश. २. ब्रिटिश सरकारचे आश्रयाखालचे देश. ३. स्वतंत्र संस्थानें. ४. ब्रिटिशखेरिज परकीय लोकांचीं राज्यें.

खुद्द ब्रिटिश सरकारचा जो हिंदुस्थानांत भाग आहे त्याचें क्षे०९९०९०० चौरस मैल आहे. ह्मणजे ग्रेटब्रिटनचे संयुक्त राज्याचे आठपट आहे. लोकसंख्या १९,१०,००,००० आहे

हिंदुस्थानचा राज्यकारभार पाहण्याकरितां विलायत सरकाराकडून व्हाइसराय गव्हर्नर जनरलची नेमणूक होते. त्याचे मदतीस कौन्सिलदार असतात.

१. मुंबई इलाखा.—गव्हरनरचे अमलाखालीं आहे.
२. मद्रास इलाखा.— ,, ,, ,,
३. बंगाल इलाखा.—लेफ्टनेंट गव्हरनरचे अमलाखालीं.
४. वायव्येकडील प्रांत.— ,, ,, ,,
५. पंजाब इलाखा.— ,, ,, ,,

६ आसाम.—चीफ कमिशनरचे अमलाखालीं.

७. आयोध्याप्रांत.— ,, ,, ,,

८. मध्यप्रांत — ,, ,, ,, ,,

ह्या सर्व अधिकाऱ्यांवर व्हाइसराय गव्हरनर जनरलचा ताबा आहे.

# मुंबई इलाखा.

सीमा—उ० पंजाब व राजपुताना, प० आरबी समुद्र, द० म्हैसूर व मद्रास इलाखा, पू० निजामचें राज्य, मध्यहिंदुस्थानांतील संस्थानें, व राजपुताना. लांबी १०५०मैल, व क्षेत्रफळ १८८१९९ चौरस मैल आहे. यांत मुंबई शहर, व सिंध, कच्छ, गुजराथ, महाराष्ट्र, आणि उत्तरकानडा हे प्रांत येतात. याचा समुद्र किनारा बराच लांब आहे, त्यांत जागजागीं कांहीं बंदरें आहेत, तीं दक्षिणेकडून उत्तरेकडे पुढें लिहिल्या क्रमानें आहेत. होनावर, कुमटा, कारवार, गोवें, मोचेमाड, वेंगुर्लें, मालवण, देवगड, विजयदुर्ग, रत्नागिरी, जयगड, अंजनवेल, दाभोळ, हर्णई, बाणकोट, चौल, मुंबई, वसई, दमण, सुरत, भडोच, घोघो, पोरबंदर, मांडवी कराची इ०, यांपैकीं मुंबई, कराची व कारवार हीं बंदरें फार सोयीचीं आहेत.

नद्या.—नर्मदा—भडोच जिल्ह्यांतून वाहून खंबायतचे आखातास मिळते. हिचा मंडला येथें एक ...

**तापी.**—खानदेश व सुरत यांतून वाहून खंबायतचे अखातीस मिळते. हिला खानदेशांत गिरणा नदी मिळते. **गोदावरी**— मुंगी पैठणाजवळ निजामचे राज्यांत शिरते. टोकयाजवळ हिला प्रवरा नदी मिळते, व प्रवरेला मुळा नदी मिळते. **कृष्णा**— सातारा व दक्षिण महाराष्ट्रांतून वाहते. हिला साताऱ्याजवळ वेणा, कऱ्हाडाजवळ कोयना, सांगलीजवळ वारणा, कुरुंदवाडाजवळ पंचगंगा, पुढें घटप्रभा, व त्या पुढें २० मैलांवर मलप्रभा ह्या नद्या मिळतात. गोकाक शहरीं घटप्रभेचा धबधबा बराच मोठा आहे. **भीमा.**—हिचा उगम भीमाशंकराच्या डोंगरांत होतो. ही पुणें, नगर, सोलापूर या जिल्ह्यांतून वाहून कृष्णेला मिळते. हिला सिना, निरा, मुळामुठा, इंद्रायणी आणि घोडनदी ह्या नद्या मिळतात. **तुंगभद्रा.**—दक्षिण महाराष्ट्रांत आहे. साबरमती, मही, कीम, आणि ढाढर.—या गुजराथ प्रांतांतून वाहतात. **सिंधु.**—सिंध देशांत वाहते. हिचा फुलेली नांवाचा फांटा हैदराबादचे उ० १२ मैलांवर फुटतो. पन्यारी, कलेरी, बघार आणि राता.—हे सिंधूचे आणखी फांटे आहेत.

**पर्वत**—मुख्य पर्वत सह्याद्रि व इंध्याद्रि ह्मणजे सातपुड्याचे डोंगर हे होत. सातपुडा खानदेशचे उ० आहे. खानदेशाचे द० चांदवडचे डोंगर, हे सह्याद्रीचे फांटे आहेत.

**क्षेत्रें**—द्वारका, सोरटीसोमनाथ, आबू, प्रभास, नाशिक, त्र्यंबक, सप्तशृंग, भीमाशंकर, आळंदी, देहु, गाणगापूर,

महाबळेश्वर, वांई, कऱ्हाड, माहुली, धोम, यवतेश्वर, नरसोबाची वाडी, करवीर, वज्रेश्वरी, कनकेश्वर, हरेश्वर, परशुराम, धोपेश्वर, गणपतिपुळे, पंढरपूर, आणि गोकर्ण महाबळेश्वर (कारवारांत) वगैरे.

**हवा**—महाराष्ट्रांतील हवा निरोगी आहे. खानदेश, गुजराथ आणि सिंध येथील हवा ऊष्ण आहे.

**उत्पन्न**—गहूं, तांदुळ, बाजरी, ज्वारी, हरबरा, सातु, मका, नाचणी, वरी, राळा, हीं होत. **सिंध**मध्यें कापूस व तंबाखू. **कच्छ**मध्यें कापूस, लोंकर, खारा मीठ. **गुजराथें**त कापूस, नीळ, कुसुंबा, मीठ, चंदन. **खंबायतें**त कापूस, अकू, मीठ. **कोंकणां**त तांदूळ, नारळ, सुपारी, मीठ. **देशां**त बाजरी, ज्वारी, भुइमूग, बटाटे, तंबाखू, मिरची. **कलादगी, बेळगांव,** व **धारवाड** यांमध्यें कुसुंबा, कापूस, मिरची, तंबाखू. **उत्तर-कानड्यां**त नारळ, सुपारी, वेलदोडे, मिरीं.

**कारागिरीचे जिन्नस**—येवलें, अमदाबाद, ठाणें, सुरत, ह्या ठिकाणीं रेशमी कापड, किनखाब, मश्रु, पितांबर, लुगडीं वगैरे साधें व जरतारी काम चांगलें होतें. अमदाबाद, जुन्नर, पुणें ह्या ठिकाणीं कागद करण्याचे कारखाने आहेत. पुणें शहरांत मातीचीं व लांकडाचीं चित्रें चांगलीं करितात. [illegible] कंत लांकडाचीं फळें वगैरे पदार्थ हुबेहूब [illegible]

## मुंबई बेट.

हें बेट सन १६६१ मध्यें पोर्तुगाल देशचे राजानें इंग्लंडचा दुसरा चार्लस राजा ह्यास आंदण दिलें. हें मुंबई इलाख्याचें मुख्य राजधानीचें शहर आहे. ह्याची लांबी ११ मैल व रुंदी ३ मैल आहे. ह्याचे अग्नेयभागीं अत्युत्तम बंदर आहे; त्याची सुमारें सात मैल रुंदी आहे, ह्यांतील घारापुरी नामक बेटामध्यें कोरीव लेणीं (पांडवकार्यें) आहेत. मुंबईपासून सुमारें १६ मैलांवर साष्टी बेटामध्यें विहाडचा तलाव आहे. हा व तुळशी ह्या दोन तलावांपासून मुंबईत गोडे पाण्याचा लोखंडी नळांनीं पुरवठा केला आहे. ताग्यांनीं व कापसाचीं वस्त्रें करणें, तीं रंगविणें, कागदीं छापविणें, व धातूचें काम करणें हीं मुख्यत्वेंकरून व्यापाराचीं कामें ह्या बेटांत होतात. आगगाड्या, तारायंत्र, धुराचे व विजेचे दिवे, टांकसाळ, गोदी, सुताच्या व पिठाच्या गिरण्या, इत्यादि अनेक कारखाने येथें आहेत. मुंबई इलाख्याचा गव्हरनर येथेंच राहतो. कुलाब्यास एक पाहण्यासारखें दीपगृह आहे.

## सिंधप्रांत.

ह्याला हिंदुस्थानांतील इजिप्त असें नांव
पेशावरचे अधिकाराखालीं आहे. ह्यामध्यें

खैरपूर* नांवाचें एक संस्थान आहे. सीमा.—सिंध प्रांताचे उ० बलुचिस्थान आणि पंजाब, पू० राजपुताना, दक्षिणेस कच्छचें रण, प० हालापर्वत, बलुचिस्थान, व आरबीसमुद्र, याचें क्षेत्रफळ ५४४०० चौरस मैल आहे. मुख्य उत्पन्न—तांदूळ, कापूस, तंबाखू, गहूं, मका, हीं आहेत. सन १८४३ सालीं हा प्रांत इंग्लिशांचे हातीं आला. याचे ५ जिल्हे आहेत. उ० शिकारपूर, द० हैदराबाद, प० कराची. सिंधप्रांताचे उत्तर सीमेवरील प्रांताला अप्पर सिंध फ्रंटिअर म्हणतात. याचें क्षेत्रफळ १९१२ चौरस मैल आहे. ह्यामध्यें ज्याकोबाबाद ऊर्फ खानगड नांवाचा गांव आहे. हैदराबाद जिल्ह्याचे पूर्वेस थर आणि पारकर हा जिल्हा येतो. ह्याचे मध्यभागीं थर नांवाचें मोठें अरण्य आहे ह्या जिल्ह्यांत उमरकोट, दिपली इसलामकोट इ० गांवें आहेत. ह्याचें क्षेत्रफळ १२७२९ चौरस मैल आहे.

**शिकारपूर जिल्हा.**—याचें क्षेत्रफळ ८८०९ चौरस मैल आहे. यांतील मुख्य शहर शिकारपूर, हें सिंधु नदाचे पश्चिमेस एका कालव्यावर आहे येथें व सक्कर या शहरीं व्यापार बराच चालतो. रोरी, शिकारपूरच्या ईशान्येस २० मैलांवर आहे. हें

---

* हें संस्थान मुरादखान यास अमिराशीं युद्ध झाल्यावर ब्रिटिश सरकारानें दिलें. याचें क्षेत्रफळ ५००० चौरस मैल आहे. यांतील मुख्य शहर खैरपूर हें सिंधुनदावर आहे.

बरेंच मोठें शहर आहे, व यांत मशिदी पुष्कळ आहेत. याचे पश्चिमेस सिंधूवर बक्कर येथें मोठा किल्ला आहे. लारखाना, शिकारपूरचे नैर्ऋत्येस ४० मैलांवर आहे. येथें रेशीम व कापूस यांचे कारखाने आहेत, व याकरितांच याची प्रसिद्धि आहे. ह्यांशिवाय नसिराबाद, मेहेर वगैरे दुसरीं शहरें आहेत. ह्या जिल्ह्याचे १७ तालुके आहेत.

**हैदराबाद जिल्हा.**—याचें क्षेत्रफळ ९६२५ चौरस मैल आहे. येथील जमीन मैदान असून तींत कालवे आहेत. हैदराबाद ही राजधानी सिंधूच्या पूर्वेस आहे. येथें हत्यारांचे कारखाने आहेत. रेशमी कापड, गालीचे, आणि सोन्यावर नकशीचें काम उत्तम होतें. याचे ईशान्येस ६ मैलांवर मियानी शहर आहे. या शहरीं सर चार्लस नेपिअर साहेबानें सिंधचे अमिराचा पराभव केला. हाला सिंधूच्या पूर्वेस हैदराबादेपासून २५ मैलांवर आहे. येथें मातीचीं भांडीं व लाखलोटे उत्तम प्रकारचे तयार होतात. ह्यांशिवाय शाहाबंदपूर, तारा, नगरपारकर असे १२ तालुके आहेत.

**कराची जिल्हा.**—ह्याचें क्षेत्रफळ १४०८९ चौरस मैल आहे. येथील मध्यभागची जमीन सुपीक आहे. कराची, हें ह्या जिल्ह्याचें मुख्य शहर आहे. सिंधप्रांतामध्यें हेंच मुख्य बंदर गांव आहे, व येथपर्यंत सिंध रेल्वे आहे. सन १८३९ मध्यें हें ब्रिटिश लोकांचे हस्तगत झालें. ठठ्ठा, हें बरेंच मोठें शहर

कराचीचे पूर्वेस ५० मैलांवर आहे. कोत्री, हें सिंधूचे पश्चिम तिरास हैदराबादेचे समोर आहे. येथून कराचीपर्यंत आगगाडीचा रस्ता आहे, व पंजाबामध्यें मुलतानपर्यंत आगबोटी जातात. कराची, साकराई, टट्टा, सेवान, घोरांबारी, कोटरी, मजदे, जोवी, मव्रबीज, कोहिस्तान, शाहबंदर, मीरपूर, बेतारा हीं तालुक्यांचीं गांवें आहेत.

## कच्छ.

हें राज्य सिंध प्रांताचे दक्षिणेस आहे. याचे उत्तरेस आणि पूर्वेस कच्छचें रण. द० कच्छचें अखात व कांठेवाड. प० आरबी समुद्र. याची पूर्व प०लांबी २०० मैल, व रुंदी ११० मैल, आणि क्षेत्रफळ ६५०० चौरस मैल आहे. या राज्यांत वारंवार भूकंप होतात. येथील जमीन रेतीयुक्त असून नापीक आहे; परंतु दक्षिणभागीं पिकाऊ आहे. येथें ज्वारी, बाजरी, कापूस, द्राक्षें, खरबुजें वगैरे धान्यें व फळें पिकतात. खनिज पदार्थांपैकीं तुरटी मात्र सांपडते. येथें घोडे, गाढवें चांगल्या जातीचीं होतात. जरीचें व सोन्यारुप्याचें काम करण्यामध्यें ह्या देशाची सर्वत्र प्रसिद्धि आहे. कच्छमधून नागमती, रूक्मावती, खारी आणि लुनी ह्या नद्या वाहतात. धार नांवाच्या डोंगराच्या दोन ओळी पूर्व पश्चिम गेल्या आहेत. राडवा हा भूजचे दक्षिणेस आहे. येथील अधिकाऱ्यास राव ह्मणतात. तो जाडेजा जातीचा रजपूत आहे. भूज येथें

पोलिटिकल एजंट असतो, व थोडीशी इंग्रज सरकारची फौजही असते. कच्छचें रण, हा एक विस्तीर्ण वालुकामय प्रदेश आहे. त्यांत पावसाळ्यांत पाणी सांचतें, आणि उन्हाळ्यांत तें सुकून त्याचे मिठाचे थर जमिनीवर बसतात.

शहरें–भूज हें मुख्य राजधानीचें शहर मध्यभागीं आहे, व त्यामध्यें एक उत्तम राजवाडा व मजबूत किल्ला आहे. मांडवी, भूजचे नैर्ऋत्येस ३० मैलांवर बंदर आहे. येथें बराच व्यापार चालतो. ह्या ठिकाणीं एक दीपगृह आहे. मुंद्रा दक्षिणभागीं, लखपट उत्तरभागीं, जखौ, आणि तूणा हीं बंदर गांवें आहेत. सुमरीद्रोह, भद्रेश्वर, केरा, कंथकोट ह्या ठिकाणीं कांहीं जैन धर्माचीं देवाल्यें आहेत. अंजर, कुना, तेरा, बचाऊ, बेरा, कोथरा, रापर, अबोई, नलिया हीं लहान लहान गांवें आहेत.

## गुजराथ.

सीमा–उ० राजपुताना; प० कच्छचें अखात; द० कोंकण; पूर्वेस मध्य हिंदुस्थानांतील संस्थानें, खानदेश व नाशिक जिल्हा ह्यामध्यें अबूचा पहाड, विंध्याद्रीचे तुटक डोंगर व राजपिंपळ्याचे डोंगर आहेत. नर्मदा, तापी, साबरमती आणि मही ह्या मुख्य नद्या आहेत. गुजराथ प्रांताला पूर्वी अर्बुदारण्य ह्मणत. गुजराथेतील ब्रिटिश सरकारचे खुद्द मालकीचा प्रांत

गायकवाडापासून मिळाला. त्याचे अहमदाबाद, खेडा, भडोच, सुरत, आणि पंचमहाल असे पांच जिल्हे करितात. पंचमहाल (कालोल, हालोल, गोधरा, दालोद, आणि दोहद) हे पांच महाल शिंदे सरकारचे असून ते इंग्रज सरकारचे वहिवाटीस आहेत.

अहमदाबाद—याचा उ० व प० भाग खेरीज करून बाकीचा सुपीक आहे. ह्यांतून साबरमती, वात्रक, मेश्वो, खारी वगैरे नद्या वाहतात. या प्रांताचें क्षेत्रफळ ३८४४ चौ० मैल आहे. अहमदाबाद हें ह्या जिल्ह्याचें मुख्य शहर साबरमतीचे कांठीं आहे. हें खंबायतचे आखातापासून ४० मैल, व मुंबई पासून २९० मैल आहे. येथें किनखाप, मश्रू, व रेशमी काम फार चांगलें होतें. धोलरा, घोघो, हीं बंदरें आहेत विरमगांव, धंधुका, धोळका, परांतिज, घोघो, सानंद आणि दसक्रोई हीं तालुक्यांचीं गांवें आहेत. धोलरापासून उत्तम प्रकारचा कापूस मुंबईंत रवाना होतो. पात्रीजवळ खाराघोडा ह्मणून एक गांव आहे. तेथें मिठाचा कारखाना आहे. अहमदाबाद प्रांत हा सन १८१७ मध्यें गायकवाडापासून मिळाला.

खेडा जिल्हा—हा अहमदाबाद व मही नदी यांचे दरम्यान आहे. ह्याचें क्षेत्रफळ १५६१ चौरस मैल आहे. येथील हवा रोगकारक आहे. साबरमती, मही, आणि महीचे फांटे वात्रक व मेश्वो, हे ह्या जिल्ह्यांतून वाहतात. लोकांचें शेतकी-कडे लक्ष्य फार आहे. खेडा हें या जिल्ह्याचें मुख्य शहर

अहमदाबादेपासून दक्षिणेस १९ मैलांवर व मुंबईपासून २६९ मैलांवर आहे. कापडवंज तालुक्यांत ग्लास व साबू करण्याचे कारखाने आहेत. बोरसाद तालुक्यांत एक किल्ला आहे. नाडियाद, ठासरा, मेहमदाबाद, मातर आणि आनंद हीं आणखी तालुक्यांचीं गांवें आहेत. नाडियाद येथें तंबाखू पिकतो. डाकूर येथें रणछोडजीचें देवालय व गोमतीकुंड आहे. आनंदपासून डाकूरपर्यंत रेल्वे गेली आहे.

**भडोच जिल्हा**—हा मही नदीच्या दक्षिणेस आहे. याचें क्षेत्रफळ १३६३ चौरस मैल आहे. ह्यामध्यें नर्मदा, मही आणि दक्षिणभागीं कीम ह्या नद्या वाहतात. भडोच, हें या जिल्ह्याचें मुख्य शहर खंबायतचे आखातापासून ३० मैलांवर नर्मदेच्या कांठीं आहे. हें कापसाचे व्यापाराकरितां प्रसिद्ध शहर आहे. भडोच, जंबुसर, अमोद, वागरा, आणि अंकलेश्वर हीं तालुक्यांचीं गांवें आहेत. भडोचमध्यें सुताच्या दोन गिरण्या आहेत. टंकारिया हें बंदरगांव आहे.

**सुरत जिल्हा**—हा उत्तर कोंकणापासून भडोचपर्यंत पसरला आहे. याचें क्षेत्रफळ १५९८ चौरस मैल आहे. येथील समुद्रकिनाऱ्यावर मासे मारण्याचें काम फार चालतें. दक्षिणेकडील भाग खेरीज करून बाकीचा सुपीक आहे. ह्या जिल्ह्यांतून तापी, कीम, मिंढोळा, पूर्णा, दमणगंगा आणि अंबिका ह्या नद्या वाहतात. सुरत हें ह्या जिल्ह्याचें मुख्य शहर

वें बंदर खंबायतचे अखातापासून २५मैलांवर तापी नदीच्या कांठीं आहे. इंग्लिशांनीं आपली पहिली वखार येथें १६१२ त स्थापिली. ओरपाड, चौऱ्यांसी, वलसाड, चिखली, मांडवी, जलालपूर, पार्डी, आणि बारडोली हीं तालुक्यांचीं गांवें आहेत. वलसाड व रांदेर हीं बंदरें आहेत.

**पंचमहाल जिल्हा**—पूर्वीं हे महाल रेवाकांठ्यांत मोडत होते, परंतु ते आतां एका कलेक्टरचे व्यवस्थेखालीं आहेत. याचें क्षेत्रफळ १७३१ चौरस मैल आहे. याचे रेवाकांठा एजन्सींतील देवगड बाऱ्या या संस्थानानें दोन भाग झाले आहेत. उत्तरेकडची कांहीं जमीन सुपीक आहे. ह्या जिल्ह्यांतून मही नदी वाहते. ह्यांत पावागडचे डोंगर आहेत. तेथील लोकांचा धंदा शेतकीचा आहे. ह्याचे गोधरा, कालोल आणि दोहद असे तीन तालुके आहेत.

# गुजराथेंतील संस्थानें.

या भागांत गायकवाडाचीं संस्थानें, व कांठेवाड यांचा समावेश केला आहे. ह्यांचे पूर्वभागांतून विंध्या पर्वत गेला आहे. नर्मदा व तापी ह्या मुख्य नद्या आहेत. ह्यांशिवाय बनास ह्या नांवाची नदी आबू डोंगरांत उत्पन्न होऊन नैर्ऋत्येकडे रणांत जाते. साबरमती व मही ह्या नद्या, व साबरमतीस मिळणाऱ्या सेरी, हातमती, मेश्वा, वात्रक, आणि खारी ह्या आहेत, ह्यांतील कांहीं संस्थानें इंग्लिशांस, व कांहीं गायकवाडास खंडणी दे-

तात, तरी हीं सर्व इंग्रज सरकारच्या आश्रयाखालीं आहेत.

गायकवाड सरकार—ह्या राज्याचें क्षेत्रफळ ८३९९ चौरस मैल आहे. हें राज्य सलग नाहीं. ह्याचा कांहीं भाग भडोच आणि खेडा, व पंचमहाल आणि रेवाकांटा यांमध्यें आहे. त्यांत बडोदें हें गायकवाड सरकारचें गादीचें स्थान आहे. हें मुंबईचे ईशान्येस २३० मैलांवर आहे. येथें बराच व्यापार चालतो. काठेवाडमधील भागांत अमरोली, व ओखामंडळ हे परगणे आहेत. त्यामध्यें द्वारका, कच्छीगड, मढी, धारी, अरंभडू, पोशीतरू, विणाकी इ० प्रसिद्ध महाल आहेत. महीकांठा व पालनपूर एजन्स्या ह्या खेडा व अहमदाबाद जिल्ह्यांमध्यें आहेत. ह्यामध्यें पट्टण, सिद्धपूर, कडी, मेसाना इ० महाल आहेत. हिंदुलोक मातृगया सिद्धपुरमध्यें करितात. सुरतमध्यें नौसरी, वल्लावी, गणदेवी, बालेश्वर, तेलारी इत्यादि प्रसिद्ध गांवें आहेत. खानदेश जिल्ह्यांतील वाजपूर तर्फ गायकवाड सरकारकडे आहे. इंग्रज सरकार तर्फे बडोदें येथें रेसिडेन्स व थोडी फौज असते.

महीकांठा एजन्सी.–[ महीचे कांठचा प्रांत ].–हा आबू पहाडाचे दक्षिणेस आहे. ह्याची लांबी ९० मैल व रुंदी ६० मैल, व क्षेत्रफळ ४००० चौरस मैल आहे. ह्याचे ६ विभाग आहेत ते—नानी मारवाड, रेवा, साबरकांठा, कटोसण, वात्रकी, आणि वात्रककांठा. ह्यामध्यें साबरमती, वात्रक, खारी, हाथमती

ह्या नद्यांचे प्रवाह आहेत. ह्यावर देखरेख करण्याकरितां इंग्रज सरकार तर्फे पोलिटिकल एजंट असतो तो ईदर संस्थानांतील सादरा शहरीं राहतो. सन १८४८ सालीं ब्रिटिश सरकारानें अहमदनगर तालुका जोधपूरचे महाराजांकडून ईदरचे हवालीं करविला ह्यांतील जहागिरदाराकडून खंडणी इंग्रज सरकार वसूल करून गायकवाड सरकाराला देतें. ईदर, दांटा, घोडासर, मानसा, मालपूर, मोहनपूर, आणि आमलिआरा हीं संस्थानें महीकांठा एजन्सींत येतात.

रेवाकांठा एजन्सी ( नर्मदेचे कांठचा प्रांत ).—ह्यामध्यें गुजराथचा पूर्वभाग येतो येथील जमीन डोंगराळ आहे.ह्यामध्यें नर्मदा, मही, विश्वामित्रे, पूर्णा, व ढाढर ह्या नद्यांचे प्रवाह आहेत. लांबी सुमारें १४० मैल, रुंदी ६० मैल व क्षेत्रफळ ४८७९ चौरस मैल आहे. ह्याचे ६ भाग आहेत ते—देवगडबारया, लुणावाडा, मेवासी संस्थानें, छोटा उदेपूर (मोहन), राजापिंपळा, आणि सोंथ बालासिनोर संस्थान हें मुसलमान राजाचे ताब्यांत आहे.नांदोद हें राजापिंपळा संस्थानचे राजधानीचें शहर आहे-छोटाउदेपूर म्हणून एक दुसरें संस्थान आहे. रेवाकांठ्यावर देखरेख करण्याकरितां पोलिटिकल एजंट असतो. तो बडोदें शहरीं राहतो. ह्यांतील जहागीरदारांकडील खंडणी इंग्रज सरकार वसूल करून गायकवाड सरकारास देतें.

पालनपूर एजन्सी.—हा मारवाड व सिरोही यांचे दक्षि-

णेस आहे. ह्याचें क्षेत्रफळ २७०० चौरस मैल आहे. मुख्य राजधानीचें शहर पालनपूर. हें बडोद्याचे वायव्येस १४० मैलांवर आहे. डीसा, पालनपूरचे पश्चिमेस २० मैलांवर आहे. येथें इंग्रज सरकारचे फौजेचें ठाणें आहे. राधनपूर हें बरेंच मोठें संस्थान आहे. शिवाय लहान लहान संस्थानें आहेत तीं-थराद, चारवट, सांतलपूर, देवदर, कांकरज, मोरवाडा, वारई, इ०. ह्यांवर देखरेख करण्याकरितां पोलिटिकल सुपरिंटेंडन्ट असतो. ह्यांतील जहागिरदारांकडील खंडणी इंग्रज सरकार वसूल करून गायकवाड सरकाराला देतें.

**सुरत एजन्सी.**—वासदा, धरमपूर आणि सचीन हीं संस्थानें सुरत एजन्सीमध्यें येतात. यांतील पहिलीं दोन रजपूत राजाचे, व तिसरें नबाबचे ( जंजिऱ्यामधील ) ताब्यांत आहे. ह्यांची व्यवस्था सुरतेचा कलेक्टर पाहतो.

**पंचमहाल एजन्सी**—नारुकोट ह्मणून जें एक लहानसें संस्थान आहे तें ह्या एजन्सीमध्यें येतें. क्षेत्रफळ १४३ चौरस मैल येथील राजा कोळी जातीचा आहे. तो पंचमहालचे कलेक्टरचे ताब्यांत आहे. येथें इमारतीयुक्त लांकडाचा व्यापार चालतो.

**खंबायतचें संस्थान**—ह्याचें क्षेत्रफळ ३५० चौरस मैल आहे. ह्याची व्यवस्था खेड्याचा कलेक्टर पाहतो. मोंगल घराण्यांतील नबाबाचे अमलाखालीं हें संस्थान आहे. मुख्य

शहर खंबायत, हें मही नदीचे कांठीं आहे. येथें सतरंज्या चांगल्या तयार होतात.

**कांठेवाड**.—कांठेवाड हें द्वीपकल्प गुजराथचे पश्चिमेस आहे गुजराथ व कांठेवाड ह्यांस सौराष्ट्र असें नांव होतें. ह्याचे उत्तरेस व वायव्येस रण व कच्छचें अखात. पूर्वेस खंबायतचें अखात व अहमदाबाद जिल्हा. दक्षिणेस व नैर्ऋत्येस आरबी समुद्र. ह्याची लांबी २०० मैल, व रुंदी १७५ मैल, आणि क्षेत्रफळ १९८५० चौरस मैल आहे.

ह्या द्वीपकल्पाच्या किनाऱ्यास पोरबंदर, नवानगर, जाफराबाद, घोघो वगैरे कांहीं बंदरें आहेत. घोघो बंदरगांव भडोचच्या पश्चिमेस ५० मैलांवर आहे घोडे, आणि तेल, गूळ, कापूस लोंकर हे पदार्थ व्यापाराकरितां मुंबईस पाठवितात. पोरबंदर येथें दगडांच्या प्रसिद्ध खाणी आहेत.

**पर्वत**.—गीर ह्या नांवाच्या डोंगराच्या दोन ओळी आहेत. जुनागडाजवळ गीरनार नांवाचे डोंगर आहेत.

**नद्या**—भादर, शेत्रंजी, व मच्छु ह्या नद्या ह्या द्वीपकल्पांतून वाहतात. बाजरी, ज्वारी, बरग, मका आणि गहूं हीं धान्यें विपुलतेनें पिकतात.

**लोक**—जाडेजा [ रजपूत ], काठे, वाघरे, आणि सिद्दी ह्या लोकांची वस्ती आहे. वाघरे लोक ओखामंडल प्रांतांत

आहेत, हे फार शूर आहेत. जंजिरा संस्थानचें हबशीचा जाफराबाद नांवाचा एक गांव ह्या देशांत आहे.

ह्या द्वीपकल्पाचे चार प्रांत करून, प्रत्येकावर एकएक पोलिटिकल एजंट आहे. प्रत्येक प्रांतामध्यें अनेक ठाकूर आहेत. हे प्रांत व त्यांतील संस्थानें पुढें लिहिल्याप्रमाणें आहेत.

| प्रांत. | संस्थानें. |
|---|---|
| **झालावाडा.**— | धांगद्रा, वांकनेर, वढवान, लिमडी, सायला. |
| **सोरठ.**— | जुनागड, बांटवा, जाफराबाद, पोरबंदर, कोडीनार, बिलका |
| **गोहेलवाडा.**— | लाठी, वाळा, पालिताना, भावनगर, महुवा. |
| **हालार.**— | राजकोट, ध्रोल, गोंडल, नवानगर, मोरवी, लालपूर. |

## महाराष्ट्र देश.

इसवी सन १८१८ मध्यें महाराष्ट्र प्रांत पेशव्यांपासून इंग्रज सरकारानें जिंकून घेतला. ह्या देशाचे सह्याद्रीनें स्वभावतःच दोन भाग होतात. ह्यांतील सह्याद्रीचे पूर्वेकडील भागास देश, व पश्चिमेकडील भागास कोंकण (परशुरामक्षेत्र) ह्मणतात. देशांतील मोठमोठ्या नद्यांचे प्रवाहानें तेथील जमीन सुपीक झाली आहे. कोंकणपट्टी सुरतेपासून गोंव्यापर्यंत पसरली आहे. या पट्टींतील जमीन सरासरी मानानें नापीक आहे असें ह्मटलें असतां चालेल.

सह्याद्रीचे पूर्वेकडील भागांत खानदेश, नाशिक

अहमदनगर, पुणें, सातारा, व सोलापूर, हे उत्तर महाराष्ट्रांत आणि कलादगी, बेळगांव व धारवाड हे दक्षिणमहाराष्ट्रांत जिल्हे आहेत. पश्चिमेकडील भागामध्यें ठाणें, कुलाबा, आणि रत्नागिरी हे जिल्हे आहेत.

खानदेश जिल्हा —हा सातपुडा आणि आजिंठ्याचे डोंगर यांमध्यें आहे. ह्याचें क्षेत्रफळ १०१६२ चौरस मैल आहे. तापी व तिला मिळणारी गिरणा ह्या नद्या ह्या जिल्ह्यांतून वाहतात येथें कापूस, ऊस, व तंबाखू हे जिन्नस विपुलतेनें होतात खानदेश हा प्रांत सन १८१८ मध्यें होळकरापासून मिळाला. धुळें हें ह्या जिल्ह्याचें मुख्य ठाणें व तालुक्याचा गांव मुंबईचे ईशान्येस १६५ मैलांवर आहे. अंमळनेर, येरंडोल, चाळीसगांव, पिंपळनेर, नंदुरबार, चोपडें, जामनेर, नसराबाद, विरदेल, शहाडें, शिरपूर, भुसावळ, तळोदें व पाचोरें हीं बरींच मोठीं शहरें त्या त्या नांवाचे तालुक्यांत आहेत.

खानदेश एजन्सीत डांगदेश, सुरगणतालुका, व मेवासी प्रांत [संवसंस्थान] असे तीन भाग करितात. हे खानदेशच्या कलेक्टरचे ताब्यांत आहेत. डांगदेश व सुरगण तालुका हे सह्याद्रीचे पश्चिमेस आहेत. आणि मेवासी प्रांत नर्मदा व तापी ह्या दोन नद्यांमध्यें आहे. डांगदेश व मेवासी प्रांत यांत भिल्ल लोकांची वस्ती आहे.

नाशिक जिल्हा.—हा जिल्हा अहमदनगरचे उत्तरेस व

खानदेशचे दक्षिणेस आहे. ह्याचें क्षेत्रफळ ८११६ चौरस मैल आहे. ह्या जिल्ह्यामधून चांदवडचे डोंगर गेले आहेत. ह्याचे बाजूनें गिरणा व गोदावरी ह्या नद्या वाहतात. मुख्य उत्पन्न ज्वारी बाजरी, नाचणी, भात, कापूस, आणि तंबाखु हें आहे. चांदवड, नांदगांव, बागलाण, दिंडोरी, मालेगांव, कळवण, नाशिक, पेठ, इगतपुरी, येवलें, सिन्नर आणि निफाड असे १२ तालुके आहेत. नाशिक हें ह्या जिल्ह्याचें मुख्य शहर मुंबईचे ईशान्येस ९० मैलांवर आहे. हें हिंदु लोकांचें पवित्र स्थान आहे. येथें पितळेचें काम फार चांगलें होतें. त्र्यंबकेश्वर हेंही प्रसिद्ध देवस्थान आहे. येवलें, व विंचूर हे बरेच मोठे गांव आहेत. येवलें येथें रेशमी काम फार चांगलें होतें. मालेगांव हें याच नांवाचें तालुक्यांत आहे. येथें एक किल्ला असून इंग्रज सरकारची थोडीशी फौज असते. **पेठ संस्थान** हें सह्याद्रीचे पश्चिम उतरणीवर आहे. हें वेगमच्या ताब्यांत आहे. ह्यावर नाशिकचे कलेक्टर देखरेख ठेवितात. नाशिक जिल्ह्यामध्यें बौद्ध धर्माचीं कांहीं देवालयें दृष्टोत्पत्तीस येतात.

**अहमदनगर जिल्हा.**—हा नाशिकचे दक्षिणेस आहे. ह्याचें क्षेत्रफळ ६४६७ चौरस मैल व लोकसंख्या ७७३९० आहे. ह्यामध्यें अकरा तालुके आहेत:—अकोलें, राहुरी, कोपरगांव, संगमनेर, नेवासें, जामखेड, शेवगांव, नगर, पारने-

श्रीगोंदें आणि कर्जत. अहमदनगर व विजापूर हे परगणे सन १८२२ मध्यें निजामाकडून मिळाले.

अहमदनगर हें ह्या जिल्ह्याचें मुख्य शहर सीना नदीचे कांठीं मुंबईचे पूर्वेस १०५ मैलांवर आहे हें पूर्वीं मुसल्मानी राज्याची राजधानी होतें. येथें जवळच एका डोंगरावर चांदबिबीचा महाल आहे. येथें एक भुइकोट किल्ला आहे. संगमनेर हें शहर याच नांवाचे तालुक्यांत प्रवरानदीचे कांठीं आहे. शिवाय पाथर्डी, खर्डे, भिंगार, सोनाई, पुणतांबें टोकें इ० मोठीं गांवें आहेत.

पुणें जिल्हा.–हा निरानदीचे उत्तरेस व अहमदनगरचे दक्षिणेस आहे. ह्याचें क्षेत्रफळ ४९८३ चौरस मैल व लोकसंख्या सुमारें ९०७२३५ आहे. भीमानदीचा उगम ह्या जिल्ह्यांत भीमाशंकर डोंगरावर होतो. तेथून आग्नेय दिशेनें ही पुणें, नगर, सोलापूर आणि सातारा ह्या जिल्ह्यांतून वहात जाते. मुळा व मुठा या दोन नद्यांचा संगम पुणें शहराजवळ होऊन पुढें ती नदी भीमेला मिळते. गहूं, ज्वारी, बाजरी, तूर, मूगमूग, नाचणी, उडीद हीं धान्यें पिकतात. हवेली, पुरंधर, भिमथडी, इंदापूर, जुन्नर, खेड, मावळ, आणि शिरूर असे आठ तालुके आहेत. व पौड, बारामती आणि घोडें हे तीन पेटे आहेत.

पुणें, हें हवेली तालुक्यांत या जिल्ह्याचें मुख्य ठाणें मुळा-

मुठा नदीचे संगमावर मुंबईचे आग्नेयेस ७१ मैलांवर आहे. हें शहर पूर्वी पेशव्यांचें गादीचें स्थान होतें. ह्या ठिकाणीं रेशीम व कलाबतूचें काम फार चांगलें होतें. खडकी, घोरपडी, आणि वानवडी या ठिकाणीं इंग्रज सरकारची फौज असते. जुन्नर येथें लुगडीं व सुदाचे कागद तयार होतात. सासवड पुरंदर तालुक्यांत; राहू पिंपळगांव भिमथडीमध्यें; बारामती इंदापूर तालुक्यांत, आणि खडकाळें मावळ तालुक्यांत आहे. पुणें शहराजवळ गणेशखिंडींत गव्हरनर साहेबाकरितां एक सरकारी बंगला आहे. चोहनशी व तळेगांव ( ढमढेरे व दाभाडे यांचें ) हीं बरींच मोठीं गांवें आहेत.

सातारा—हा जिल्हा पुणें जिल्ह्याचे दक्षिणेस आहे. याचें क्षेत्रफळ ४२७८ चौरस मैल व लोकसंख्या १०८०५३ आहे. कृष्णा नदी आग्नेय दिशेनें ह्या जिल्ह्यांतून वाहते. हिला सजऱ्या नजीक माहुली ( दक्षिण प्रयाग ) येथें वेण्णानदी मिळते. गहूं, ज्वारी, बाजरी, भात, हरभरे, तंबाखू, आणि भुईमूग यांची या जिल्ह्यांत लागवड करितात. ह्या जिल्ह्याचे जावळी, कोरेगांव, कऱ्हाड, खटाव, माण, सातारा, पाटण, खानापूर, तासगांव, वांई, आणि वाळवें हीं तालुक्यांचीं गांवें आहेत. महाबळेश्वरामधील माल्कमपेठ नांवाचें ठाणें ह्याच जिल्ह्यांत येतें.

सातारा, हें ह्या जिल्ह्याचें मुख्य स्थान पुण्याचे दक्षिणेस

६० मैलांवर आहे. याचे वायव्येस कृष्णा नदीचे उगमाजवळ महाबळेश्वर नांवाचा एक डोंगरी प्रांत आहे. जावळी तालुक्यांत मेढें; वाळव्यामध्यें अष्टें; खटावमध्यें वडूज; माणमध्यें दहिवडी; आणि खानापूर मध्यें विटें, या नांवाचीं प्रसिद्ध गांवें आहेत. रहिमतपूर, मालकमपेठ, उरण, नेर्ले, कालें, उं-ब्रज आणि निळोडी हेही बरेच मोठे गांव आहेत.

**सोलापूरजिल्हा**—हा साताऱ्याचे पूर्वेस आहे. ह्याचें क्षेत्रफळ ४४७३ चौरस मैल, व लोकसंख्या सुमारें ७१८२३१ आहे. भीमा व तिला मिळणारी सिनानदी यांचे प्रवाह ह्या जिल्ह्यांतून आहेत. गहूं, बाजरी, ज्वारी, हरभरे, भात, आणि कापूस यांचें पीक येतें. सोलापूर, पंढरपूर, करमाळें, बार्शी, माढें, सांगोलें, आणि माळशिरस असे सात तालुके आहेत.

सोलापूर हें ह्या जिल्ह्याचें मुख्य स्थान साताऱ्याचे पूर्वेस १२० मैलांवर आहे. येथें लुगडीं चांगलीं तयार होतात. बार्शी तालुक्यांत कापसाचा व्यापार चालतो. इतर तालुक्यांपेक्षां ह्यामध्यें पर्जन्य बराच पडून पीकही बरेंच येतें. पंढरपुरामध्यें श्रीविठोबाचें देवालय आहे. येथें प्रतिवर्षी आषाढी एकादशीला विठोबाचे दर्शनासाठीं यात्रा जमते.

## दक्षिणमहाराष्ट्रदेश, व उत्तरकानडा.

**कलादगी जिल्हा**—हा निजामचे राज्याचे पश्चिमेस आहे. ह्याचें क्षेत्रफळ ५६९१ चौरस मैल आहे, व लोकसंख्या

८१६०३७ आहे. भीमा, कृष्णा, व हिला मिळणाऱ्या कांहीं नद्या ह्या जिल्ह्यांतून वाहतात. गहूं, ज्वारी, हरभरें, कापूस, बाजरी, व खजुरीचीं झाडें यांचें उत्पन्न होतें. **बागलकोट, बदामी, हुनगुंद, मुद्देबिहाळ, बागेवाडी, इंडी, विजापूर** आणि **सिंदगी** असे आठ तालुके आहेत. ह्या जिल्ह्यामध्यें कृष्णा, घटप्रभा व मलप्रभा ह्या नद्या आहेत.

ह्या जिल्ह्याचें मुख्य शहर कालदगी नांवाचें आहे. गुळेदगुड, इलकल, गजेंद्रगड, तालीकोट, अमीनगड केरूर आणि मनगोळी हे प्रसिद्ध गांव आहेत. बदामी येथें एक भुईकोट किल्ला आहे.

**बेळगांव जिल्हा.** [ वेणुग्राम ]—हा कालादगी जिल्ह्याचें पश्चिमेस आहे. ह्याचें क्षेत्रफळ ४६९१ चौरस मैल व लोकसंख्या सुमारें ९३८७२० आहे. ह्या जिल्ह्यांतून कृष्णानदी वाहते. गहूं, ज्वारी, बाजरी, भात आणि कापूस यांचें पीक येतें. येथील रहिवासी मराठी व कर्नाटकी भाषा बोलतात. **बेळगांव, संपगांव चिकोडी, विडी, अथणी, गोकाक,** आणि **परसगड** असे सात तालुके आहेत.

बेळगांव, हें ह्या जिल्ह्याचें मुख्यस्थान विजयदुर्गाचे आग्नेयेस ९५ मैलांवर आहे. सवदत्ती शहर परसगड तालुक्यांत आहे निपाणी, डोंगल, संकेश्वर, मुरगोड, कितूर, सदलगी, मुनवळी, नंदगड, हुकेरी, यमकनमरडी आणि कोगनोळी हे प्रसिद्ध गांव आहेत.

**धारवाड जिल्हा.** हा जिल्हा म्हैसूरप्रांत व बेळगांव जिल्हा ह्यांमध्यें आहे. ह्याचें क्षेत्रफळ ४५६४ चौरस मैल व लोकसंख्या सुमारें ९८८०३७ आहे. सन १८१७ मध्यें हा प्रांत पेशव्यांपासून मिळाला. ह्या जिल्ह्याचे पूर्वेकडील जमीन सुपीक आहे. तुंगभद्रा आणि मलप्रभा ह्या नद्या ह्या जिल्ह्यांतून वाहतात. **धारवाड, कोड, बंकापूर, राणि-बेन्नूर, नवलगुंद, रोण, गदग, हानगल, हुबळी, कलघटगी,** आणि **करजगी** असे अकरा तालुके आहेत.

धारवाड, हें ह्या जिल्ह्याचें मुख्य शहर बेळगांवचे आग्नेयेस ४० मैलांवर आहे. हुबळी हें शहर कापड व रेशीम ह्यांचे व्यापाराकरितां प्रसिद्ध आहे. नरगुंद, बेटीगिरी, हेबळी, आणिगिरी, मुनगुंद, हावेरी, नरेगड, आणि कूर्तकोटी हे गांव आहेत. येथें बहुतेक वस्ती लिंगायत लोकांची आहे. ते कानडी भाषा बोलतात.

## उत्तरकानडा.

हा म्हैसूर व मद्रास इलाखा यांचे उत्तरेस आहे. यांचें क्षेत्रफळ ४२३५ चौरस मैल व लोकसंख्या ३९८४०६ आहे. वर्धा आणि शेरावती ह्या नद्या ह्या जिल्ह्यांतून वाहतात. गेरसापा जवळील शेरावती नदीचे धबधब्याची उंची ८९० फूट आहे. **कारवार, कुमठा, होनावर, सिद्दापूर, सिर्सी, यल्लापूर** आणि **सुपें** असे सात तालुके आहेत. हा प्रांत

टिपूसुलतानापासून सन १७९९ मध्यें मिळाला. शेतकी हा लोकांचा मुख्य धंदा आहे. नारळ, सुपारी, वेलदोडे, इत्यादि पदार्थ पुष्कळतेनें उत्पन्न होतात. होनावर, हें ह्या जिल्ह्याचें मुख्य ठाणें आहे. मुंबई व कराचीखेरीज करून कारवार हें बंदर गलबतें नांगरण्याकरितां फार सोईचें आहे. शिवाय गेरसापा, गोकर्ण, सिद्दापूर, यल्लापूर, भाटकल, हलीयाल, आणि अंकोलें हीं मोठीं शहरें आहेत. पूर्वीं उत्तरकानडा हा भाग मद्रास इलाख्यांत मोडत होता, परंतु सन १८६१ मध्यें मद्रास सरकारानें हा प्रांत मुंबई सरकारचे हवाली केला.

## सह्याद्रीचा पश्चिमभाग (कोंकण)

**ठाणें जिल्हा** [ उत्तर कोंकण ].—हा कुलाबा जिल्ह्याचे उत्तरेस व सुरत जिल्ह्याचे दक्षिणेस आहे. ह्याचें क्षेत्रफळ ४०८९.२ चौरस मैल, व लोकसंख्या ८४७४२४ आहे. ह्या जिल्ह्यामध्यें वसईची व दांतिवऱ्याची अशा दोन खाड्या आहेत. गांवामध्यें दारू काढण्याचें, व समुद्र किनाऱ्यावर मासे मारण्याचें काम पुष्कळ चालतें. डहाणू, माहीम, साष्टी, भिवंडी, वसई, कल्याण, पनवेल, मुरबाड, कर्जत, शहापूर, आणि वाडे असे अकरा तालुके आहेत.

ह्या जिल्ह्यांतील मुख्य शहर ठाणें, हें मुंबईचे उत्तरेस साष्टी बेटांत आहे. शिवाय वांद्रें, आगाशी, आणि उरण हीं बरींच मोठीं गांवें आहेत. पूर्व तालुक्यांत भाताचें उत्पन्न

फार आहे. वसई येथें पोर्तुगीज लोकांचे वेळचा मोडकळीस आलेला एक किल्ला आहे. आगाशी गांवामध्यें उत्तम प्रकारचीं सुकेळीं व उरणगांवीं मीठ तयार करितात.

**कुलाबा जिल्हा**.—हा रत्नागिरी जिल्ह्याचे उत्तरेस आहे. ह्याचें क्षेत्रफळ १४८२ चौरस मैल व लोकसंख्या सुमारें ३५०४०५ आहे. नागोठण्याची खाडी ह्या जिल्ह्याचे उत्तरेस आहे. चौलखाडी पश्चिमेस, व बाणकोटची खाडी दक्षिणेस आहे. ह्या सर्व खाड्यांतून भात व मासळी यांचा व्यापार पुष्कळ चालतो. **महाड, रेवदंडें, पेण, अलिबाग, आणि माणगांव** असे पांच तालुके आहेत.

अलीबाग हें ह्या जिल्ह्याचें मुख्य ठाणें आहे. पेण, व रेवदंडा, या दोन ठिकाणीं भाताचा मोठा व्यापार चालतो. कुलाबा प्रांत हा पूर्वी आंग्रे नांवाचे मराठी सरदाराचे मालकीचा होता.

**रत्नागिरी जिल्हा**.—हा सांवतवाडी व गोवें संस्थानाचे उत्तरेस आहे. ह्याचें क्षेत्रफळ ३७८९ चौरस मैल व लोकसंख्या १०१९१३६ आहे. ह्या जिल्ह्यांतील बंदर किनाऱ्यावर नारळाचें उत्पन्न होतें. जमीन एकंदरीचे मानानें खडकाळ असून लागवडीचे अगदीं निरोपयोगी आहे. पर्जन्यकाळीं मात्र भाताचें उत्पन्न होतें. **रत्नागिरी, दापोली, चिपळूण, खेड, संगमेश्वर, राजापूर, देवगड, आणि मालवण** असे आठ तालुके आहेत.

रत्नागिरी हें बंदर असून ह्या जिल्ह्याचें मुख्य ठाणें आहे. रत्नागिरी शहरचें हल्लींचें बंदर गलबतांना सोईचें नाहीं, परंतु मिऱ्याबंदराचा उपयोग केला असतां, तें बंदर मुंबई बंदराचे बरोबरीचें होईल असा सुधार आहे. वेंगुर्लें हें चांगलें बंदर आहे. ह्याचा मुंबईशीं व्यापार चालतो. राजापूर शहरीं बहुधा माघ महिन्यांतील शिवरात्रीचे सुमारास श्रीगंगेचें आगमन होतें. त्यावेळीं दूर दूरचे लोकांची स्नान करण्याकरितां मोठी यात्रा भरते. मालवण, बाणकोट, मुरुड, दाभोळ, अंजनवेल, गुहागर, कोतवडें, गणपती पुळे हे प्रसिद्ध गांव आहेत.

## महाराष्ट्रांतील संस्थानें व जहागिरी.

**अक्कलकोट संस्थान.**—हें सोलापूरचे आग्नेयेस २२ मै. अंतर आहे. हें संस्थान व कलादगी जिल्हा ह्यांचेमधून भीमा नदी वहाते. ह्याचें क्षेत्रफळ ४९८ चौरस मैल आहे. यांत ज्वारी, भात, गहूं, ऊंस, आणि हरभरे यांचें पीक येतें. हें संस्थान पूर्वी साताऱ्याच्या राजाच्या ताब्यांत होतें. परंतु तें आतां सोलापूर कलेक्टरचे हद्दींत आहे. येथील राजा भोंसल्याचे घराण्यांतला आहे.

**सातारा जहागिरी.**—औंद, भोर, फलटण, आणि जत ह्या जहागिरींचा साताऱ्याचा कलेक्टर हा ब्रिटिश सरकार तर्फे एजंट आहे. औंद जहागिरीचें क्षेत्रफळ सुमारें ३५० चौरस मैल आहे. ही जहागीर पंतप्रतिनिधी यांचे अमलाखालीं आहे. हे ब्राह्मण जातीचे आहेत. **भोरसंस्थान** हे साताऱ्याचे

वायव्येस पंतसचीवांचें आहे. ह्याचें क्षेत्रफळ ५०० चौरस मैल आहे. पंतसचीव हे ब्राह्मण जातीचे आहेत. या संस्थानांत भात, नाचणी, वरी वगैरे धान्यें पिकतात. **फलटणची** जहागीर भोर संस्थानचे ईशान्येस आहे. हिचें क्षेत्रफळ ४०० चौरस मैल आहे. ही जहागीर निंबाळकरांकडे चालू आहे. जत जाहगिरीचें क्षेत्रफळ ७०० चौरस मैल आहे ह्या ठिकाणीं लोखंड सांपडतें. ह्या जाहगिरीवर डफळ्यांचा अधिकार आहे.

## दक्षिण महाराष्ट्र.

**कोल्हापूर संस्थान**—ह्या संस्थानचे उत्तरेस व ईशान्येस सातारा जिल्हा, पूर्वेस व दक्षिणेस बेळगांव जिल्हा, व पश्चिमेस सह्याद्रि आणि रत्नागिरी जिल्हा आहे. याची लांबी आग्नेय वायव्य ९५ मैल, व रुंदी ६५ मैल आहे. क्षेत्रफळ ३१८४ चौरस मैल, व लोकसंख्या ८०२६९१आहे. ह्या संस्थानांतून कृष्णा व वारणा नद्या वाहतात. कृष्णानदी कोल्हापूर व दक्षिण महाराष्ट्र देशांतील जहागिरी यांमधील सीमा आहे, व वारणानदी हें संस्थान व सातारा यांमध्यें आहे. पंचगंगा वगैरे नद्यांचे लगत्याचा प्रांत सुपीक आहे. ज्वारी, भात, ऊस, व तंबाखू यांचें पीक विपुलतेनें होतें. वर सांगितलेल्या सीमांचे आंत महाराजांचे ताब्यांतील **विशाळगड, कागल, बावडें, व इचलकरंजी** ह्या जहागिरी आहेत. तोरगळ लागून एक

जहागीर ह्या सीमेचे बाहेर बेळगांवापलीकडे धारवाडच्या लगत्यास आहे. कोल्हापूर संस्थान शिवाजी महाराजांचे थाकट्या घराण्याकडे आहे. येथे इंग्रज सरकार तर्फे पोलिटिकल एजंट असतो. कोल्हापूर हें मुख्य राजधानीचें शहर मुंबईच आग्नेयेस १८० मैलांवर आहे. दुसरे प्रसिद्ध गांव मलकापूर, पन्हाळा, आलतें, शिरूळ, भूदरगड, आणि गडहिंग्लज हे आहेत.

**सांगली, जमखिंडी, मिरज, कुरुंदवाड, मुधोळ, आणि रामदुर्ग.**—मिरज, व कुरुंदवाड, या जहागिरीचे वडील घर व धाकटें घर असे दोन हिस्से झाले आहेत. ह्या सर्व जाहगिरींवर देखरेख कोल्हापूर येथील पोलिटिकल एजंट करितो. सांगली, जमखिंडी, मिरज, व कुरुंदवाड ह्या जहागिरी पटवर्धन नामक ब्राह्मणाचे ताब्यांत आहेत. रामदुर्ग ही भावे नामक ब्राह्मणाचे घराण्यांत आहे, व मुधोळ जाहगीर घोरपडे मराठ्यांची आहे. ह्यांस राजेसाहेब असा किताब आहे. ह्या सर्व जहागिरीमध्यें ज्वारी गहूं, हरभरे ह्यांचें पीक होतें.

**सावनूर संस्थान**—हें धारवाडचे पूर्वेस एका मुसलमान नवाबाचें आहे ह्याचें क्षेत्रफळ ६९ चौरस मैल आहे. ह्याची व्यवस्था धारवाडचे कलेक्टर पहातात. शेडबाळकर ह्या नांवाची एक जाहगीर आहे.

## सह्याद्रीचा पश्चिमभाग (कोंकण).

**जव्हार संस्थान.**—ह्याचे सभोंवतीं ठाणें जिल्हा आहे.

या संस्थानचें क्षेत्रफळ ५३४ चौरस मैल आहे. ख्यानहवेली, गंजाड, आणि मल्वाड हे तीन महाल आहेत. येथील हवा फार वाईट आहे. हें संस्थान कोळी राजाचे ताब्यांत आहे. याची व्यवस्था ठाण्याचे कलेक्टर पहातात जंगल फार आहे. भात, नाचणी, वरी, वगैरे धान्यांचें उत्पन्न होतें.

हबसाण उर्फ जंजिरा संस्थान.—हें कोंकणपट्टीत मुंबईचे दक्षिणेस आहे. याचें क्षेत्रफळ ३२४ चौ० मैल आहे. हें संस्थान सिद्दी राजाचे ताब्यांत आहे. त्यास नबाब ह्मणतात. ह्याचे पूर्वज दिल्लीच्या बादशहाचे आरमाराचे सरदार होते. जंजिरा हें या संस्थानचें मुख्य शहर आहे. येथें एक असिस्टंट पोलिटिकल एजंट असतो तो कुलाब्याचे कलेक्टरचे हुकुमानें काम करतो यांत नाचणी, भात, मीठ वगैरे उत्पन्न होतें.

काठेवाडांतील जाफराबाद शहरावर या नबाबाची मालकी आहे.

सांवतवाडी संस्थान.—हें संस्थान रत्नागिरी जिल्ह्याचे दक्षिणेस आहे. याची उत्तर दक्षिण लांबी सुमारें ५० मैल व रुंदी ३० मैल, आणि क्षेत्रफळ ८०० चौरस मैल आहे. हा देश अगदीं उंचनीच आहे येथें पाऊस फार पडतो. याचे कुडाळ, बांदे, आणि वाडी असे तीन महाल आहेत. तांदूळ, वरी, नाचणी, नारळ यांचा व्यापार पुष्कळ चालतो. येथें हरड्यांचेंही उत्पन्न होतें. हें संस्थान भोसले नामक सरदा-

राचे ताब्यांत आहे. त्यास सावंत असें ह्मणतात. सांवतवाडी येथें लांकडाचें रंगीत सामान चांगलें तयार होतें. इंग्रज सरकार तर्फे पोलिटिकल एजंट सांवतवाडी येथें राहतो.

☞ महाराष्ट्र देशांतील जहागिरदार पूर्वी सातारच्या राजाच्या ताब्यांत होते. व दक्षिण महाराष्ट्रांतील जहागीरदार पेशवे सरकारच्या ताब्यांत होते, परंतु त्यांचें राज्य इंग्रज सरकारास मिळाल्यावर, ते त्यांच्या ताब्यांत आले आहेत. हे सर्व जहागिरदार आपआपल्या जहागिरीची मुखत्यारीनें वहिवाट करितात; तरी जीव घेण्याजोगा, किंवा जन्मठेप देण्याजोगा कोणी अपराध केला असतां जहागिरदार व इंग्रज सरकाराकडील कामगार मिळून त्याची चौकशी करितात.

# मद्रास इलाखा.

सीमा.–उत्तरेस मुंबईइलाखा, निजामचा मुलूख; पूर्वेस व आग्नेयेस बंगालचा उपसागर; दक्षिणेस हिंदीमहासागर; आणि पश्चिमेस आरबीसमुद्र ह्याची लांबी ईशान्यनैर्ऋत्य सुमारें ९५० मैल व रुंदी पूर्वपश्चिम ४५० मैल आहे; व क्षेत्रफळ १३२००० चौरस मैल आहे. ह्या इलाख्याच्या किनाऱ्याची लांबी सुमारें १७०० मैल आहे. पश्चिम किनाऱ्यावर मुख्य बंदर गांव आहेत ते:—मंगळूर, कननूर, तेलीचरी, कालीकोट, बेपूर, पोनानी, कोची, आलिपल्ली आणि कैलोन [ कयनकुळम ], व पूर्व किनाऱ्यावर तुतीकोरीन, नागापट्टण, कारिकल त्रांकिबार, [ तळंगम्बडी ], पोर्तोनोवो, कडलूर, पोंडेचरी,

मद्रास, पुलिकत, नेलोर, मच्छलीपट्टण, विनागापट्टण, त्रिंबलीपट्टण, कलिंगापट्टण आणि गंजाम.

नद्या–ईशान्यभागीं ऋषिकुल्यानदी आहे.ही गंजामजवळ व वगसेधर,आणि नागुला ह्या कलिंगापट्टमजवळ बंगालचे उपसागरास मिळतात. शिवाय गोदावरी, कृष्णा, गंदलकामा, पेन्नार [ पिनायकिनी ], पलार [क्षीरनदी], दक्षिणपेन्नार (दक्षिणपिनायकिनी ), कावेरी, ह्या नद्या आहेत. ह्या नद्यांपासून कालवे काढून लांबवर नेले आहेत.

सरोवरें—कारोमांडलच्या किनाऱ्यावर चिल्का, कोलर, आणि पलिकत हीं सरोवरें आहेत. पश्चिम किनाऱ्यावर नद्या, नाले, ओहोळ यांचे पाण्यानें कांहीं सरोवरें झालीं आहेत. त्यांतील कोचीगांवाजवळ जें एक सरोवर आहे त्याची लांबी उत्तर दक्षिण सुमारें १२० मैल आहे. अशा सरोवरांस इंग्रजीत बॅकवाटर ह्मणतात.

पर्वत–पश्चिमघाट, व पूर्व किनाऱ्यावर कटक प्रांतांतून कुमारिका भूशिरापर्यंत पूर्वघाटाची ओळ गेली आहे. ह्या ओळी व त्यांस वायव्येकडून जोडणारी नीलगिरी नांवाच्या पर्वताची ओळ आहे.

सरकार्स [ तैलंगणाचा बहुतेक भाग ]हा प्रांत मद्रास इलाख्याचे ईशान्येस आहे. ह्याला पूर्वी उत्तर सरकार्स ह्मणत असत. हा प्रांत निजामाकडून १७६६ मध्यें मिळाला. ह्या

प्रांतांत तांदूळ, कापूस, ऊस, आणि तंबाखू यांचें पीक होतें. **गंजम** हा भाग कोरिंगा प्रांताचे दक्षिणेस आहे. आस्काशहरीं साखरेचे कारखाने आहेत. श्रीकाकोळ (चिकाकोल) हें गंजमचें मुख्य ठाणें याचे नैर्ऋत्येस १०० मैलांवर आहे. बऱ्हामपूर हें शहर गंजमचे नैर्ऋत्येस २० मैलांवर आहे, हें फौजेचें ठाणें आहे ह्या ठिकाणीं रेशमाचे कारखाने आहेत. गंजम शहर चिल्का सरोवराचे पश्चिमेस ऋषिकुल्या नदीचे कांठीं आहे रसेलकोंडा गंजमचे ईशान्येस ५० मैलांवर आहे. विजागापट्टण हें शहर गंजमपासून १६० मैलांवर बंदरगांव आहे येथें सांबराचे शिंगाच्या पेट्या, व नकशीदार काम उत्तम होतें विजयानगरम हें एका मोठ्या जमीनदारीचें मुख्य शहर विजागापट्टणपासून ३० मैलांवर आहे. राजमहेंद्री हें गोदावरीचे कांठचे प्रदेशाचें मुख्य शहर आहे. ह्या ठिकाणीं एक किल्ला आहे, व येथें गोदावरीचे पाण्यानें तंबाखू पिकवितात कोरिंगा गोदावरीचे मुखाशीं आहे. बिंबलीपट्टण येथें साखरेचे कारखाने आहेत मच्छलीपट्टण हें कृष्णा नदीचे मुखाशीं मद्रासचे ईशान्येस २३० मैलांवर आहे. ह्या ठिकाणीं कापसाचे मोठे कारखाने आहेत एलोर मच्छलीपट्टणच्या उत्तरेस ३५ मैलांवर आहे. येथें सतरंजा चांगल्या होतात. बेझवाडा कृष्णा नदीवर एक लहानसें शहर आहे.

**कर्नाटक.**[द्राविडदेश]—हा प्रांत कृष्णानदीपासून कामो-

वीनभूशिरापर्यंत पसरला आहे. कर्नाटकच्या नबाबापासून हा भाग सन १८०१ मध्यें मिळाला. किन्याऱ्यावरील जमीन रेतीयुक्त आहे; परंतु मध्यभाग फार सुपीक आहे. नेलोर हें पेन्नार नदीचे दक्षिणभागीं मद्रासपासून १०८ मैलांवर आहे. ऑंगोल हें गंदलकामा नदीच्या मुखाशीं नेलोरच्या उत्तरेस ८० मैलांवर आहे. ह्या ठिकाणीं फौज असते. अर्काट शहर मद्रासचे पश्चिमेस पालार नदीवर आहे. अर्काटचे पश्चिमेस १२ मैलांवर व्हेलोर शहर आहे. येथें एक मोठें देवालय आहे. अर्काटचे उत्तरेस २० मैलांवर चित्तूर नामक मोठें शहर आहे. आरनी हें अर्काटचे दक्षिणेस २९ मैलांवर आहे. याचे आग्नेयेस वांडीवाश शहर आहे. मद्रास हें मद्रास इलाख्याचे राजधानीचें शहर कारोमांडल किन्याऱ्यावर आहे. हें उत्तम बंदर नाहीं, तरी ह्या ठिकाणीं तराफेवरून व्यापार पुष्कळ चालतो. याचा व्यापार मुख्यत्वेंकरून ब्रिटन आणि अमेरिकेंतील युनायटेड स्टेट्स याशीं आहे. ह्या ठिकाणीं सन १६३९ मध्यें इंग्लिशांनीं सेंट जार्ज नामक किल्ला बांधिला. मद्रासचेजवळ सेंट टामस माउंटवर मद्रासचा तोफखाना आहे. पालार नदीवर मद्रासपासून ३५ मैलांवर चिंगलपट नांवाचें तटबंदी शहर आहे. कांजीव्हरम हें शहर मद्रासचे नैर्ऋत्येस ४५ मैलांवर आहे. येथें ब्राह्मण लोकांचें एक प्रसिद्ध देवस्थान आहे. येथें हजारों यात्रेकरू दरवर्षी जमतात. हें

चोला राजांचें प्राचीनकाळीं राजधानीचें शहर होतें. प्युलि-कट हें पूर्वी डच लोकांचें स्वाधीन होतें. हें मद्रासचे उत्तरेस २० मैलांवर आहे मद्रासचे वायव्येस १२० मैलांवर कडा-प्पा नामक मोठें शहर आहे. हें पूर्वी एका पठाण संस्थानाचें राजधानीचें शहर होतें. ह्या ठिकाणीं इंग्रजाची फौज असते. कर्नूल हें कडाप्पाचे वायव्येस १०० मैलांवर आहे. हेंही दक्षणी पठाण राजाचे राजधानीचें शहर सन१८३९ पर्यंत होतें. गुटी कर्नूलच्या नैर्ऋत्येस ७० मैलांवर तटबंदीचें शहर आहे कड्डलोर ही दक्षिण अर्काटची राजधानी दक्षिण पेन्नार नदीचे मुखाशीं मद्रासचे नैर्ऋत्येस १०० मैलांवर आहे. ह्याचे जवळ सेन्ट डेव्हीड किल्ला आहे. दक्षिणेस व्हेलार नदीचे मुखाशीं १० मैलांवर पोर्टोनोव्हो आहे. येथें लोखंड गाळण्याचा कारखाना आहे. उत्तरेस जिंजी नांवाचा एक प्रख्यात डोंगरी किल्ला आहे.आग्नेयभागीं चेलमब्रान ह्मणून एक देवस्थान आहे.तेथें हिंदुलोक यात्रेकरितां जातात. तंजावर मद्रा-सच्या नैर्ऋत्येस १६५मैलांवर आहे.हा फारच सुपीक प्रदेश कावेरी नदीचे एका फाट्यांवर आहे. तंजावरच्या पूर्वेस ४० मैलांवर नागापट्टण शहर आहे. येथें बराच व्यापार चालतो. हें पूर्वी डचलोकांचे स्वाधीन होतें. त्रांकिबार हें किनाऱ्यावरील शहर तंजावरच्या ईशान्येस ५० मैलांवर आहे. हें ब्रिटिश सरकारानें सन १८४५ सांत डचलोकांपासून विकत घेतलें.

तंजावरापासून पूर्वेस ५० मैलांवर नागोर येथें एक मोठा मनोरा आहे. त्रिचनापल्ली प्रांताचें मुख्य गांव त्रिचनापल्लीच आहे. हें कावेरी नदीचे दोन्ही तिरावर वसलें आहे.येथें तांदूळ, व कापूस ह्यांचें उत्तम पीक येतें. त्रिचनापल्लीचे दक्षिणेस ८० मैलांवर मधुरा प्रांत आहे. यामध्यें पुदुकोट ऊर्फ राजा तोंदिमान याचा मुलूख येतो. पुदुकोट संस्थानाची लांबी ४३ मैल व रुंदीही ४३ मैल आहे. मधुराचे वायव्येस दिंडिगल येथें एक डोंगरी किल्ला आहे. रामनाद ( रामनाथ ) मधुराचे आग्नेयेस वैगा नदीवर आहे. ह्या ठिकाणीं जाडेंभरडें कापड तयार होतें. तिणिवेल्ली व पाल्यंकोट यांमधून ताम्रपरणी नांवाची ल्हानशी नदी वहाते तिणिवेल्ली हें मधुराचे नैर्ऋत्येस ८५ मैलांवर आहे. पाल्यंकोट येथें मोठी फौज असते. मानारचे आखातामध्यें तुतीकोरीन बंदरांतून कापूस रवाना होतो. बल्लारी प्रांत हा निजामचें राज्य आणि हैसूर यांचे दरम्यान असून, मद्रासच्या वायव्येस २७० मैलांवर आहे. बल्लारी याच नांवाचें ह्या प्रांताचें मुख्य ठाणें आहे. येथें एक दगडी किल्ला आहे. या प्रांतांत तांबें सांपडतें.

**मलबार.** ( मल्याळ देश )—उत्तरेस कानडा आणि कुर्ग देश, पूर्वेस पश्चिमेकडील घांट, दक्षिणेस कोची आणि पश्चिमेस हिंदमिहासागर. हा प्रांत टिपूसुलतानापासून सन १७९२ मध्यें मिळाला. हा डोंगराळ देश आहे. ह्यांतील डोंगरी प्रदे-

शामध्यें इमारतीला योग्य असे वृक्ष होतात. ह्याचे घाटमाथ्या-वरील भागाला वायनाड असें ह्मणतात. ह्याचें मुख्य शहर कालिकोट येथून सागवान, काळें मिरीं, आणि नारळ परबं-दरीं रवाना होतात. सन १४९८मध्यें व्हासकोडीगामा, या नांवा-चा पोर्तुगालमधील राहणारा गृहस्थ हिंदुस्थानामध्यें ह्या ठिकाणीं प्रथमतःच आला. कालिकोटचे वायव्येस समुद्रकिनाऱ्यावर ९५ मैलांवर काननूर बंदर आहे. येथें निर्गतीचा व्यापार फार चालतो. तेलिचेरी हें बंदर गांव काननूरचे दक्षिणेस १० मैलांवर व माहीचे उत्तरेस ६ मैलांवर आहे. येथें वेलचा व चंदन यांचा व्यापार चालतो. बेपूर हेंही एक कालिकोटजवळ बरेंच मोठें बंदर आहे. येथें लोखंड गाळण्याचें काम चालतें. कोची हें ब्रिटिश मलबारमधील शहर बेपूरचे आग्नेयेस ८९ मैलांवर आहे ह्या ठिकाणीं गलबतें बांधण्याचें काम चालतें. कोइंमतूर बेपूरचे पूर्वेस ८० मैलांवर आहे, कोइंमतूरचे वाय-व्येस ३० मैलांवर उटाकमंड ह्मणून एक नीलगिरीमध्यें स्थान आहे. त्याची उंची ७३६१ फूट आहे. येथें युरोपियन लोक हवा खाण्याकारितां जातात. पालघांट पश्चिमघांटांत आहे.

## मद्रासच्या हमत्याचीं संस्थानें.

**त्रावणकोर** ( तिरुवणकोडु )-ह्याचे उत्तरेस कोची सं-स्थान व कोइंमतूर, पूर्वेस मदुरा व तिन्निवेल्ली, दक्षिणेस व

पश्चिमेस हिंदीमहासागर. ह्याचें क्षेत्रफळ ६६०० चौरस मैल आहे. ह्या संस्थानामध्यें पश्चिमेकडील घांटाची ओळ आहे, येथील हवेमध्यें ओलसरपणा फार आहे; परंतु एकंदरीनें पाहतां सुखावह आहे. ह्या संस्थानामध्यें तांदूळ फार पिकतात. शिवाय सुपारी, नारळ, सागुदाणे वगैरे जिन्नस होतात. रानामध्यें अनेक प्रकारचीं इमारतयुक्त झाडें होतात. त्रिवंदरम हें शहर ह्या संस्थानाची राजधानी आहे. हें कामोरीन भूशिरापासून वायव्येस ४० मैलांवर आहे. ह्या ठिकाणीं तारागृहाचें ऑफिस आहे, व शहराबाहेर एका टेंकाडावर एक वेधशाळा आहे आलीपह्री, त्रिवंदरमच्या उत्तरेस ८० मैलांवर मुख्य बंदरगांव आहे. कुइलोन (कायनकूलम) नामक शहर किनाऱ्यावर त्रिवंदरमचे उत्तरेस ३० मैलांवर आहे. ह्या ठिकाणीं व्यापार बराच चालतो. ह्याशिवाय अजुनेंग, ऐविका इत्यादि शहरें आहेत. हें संस्थान एका हिंदु राजाचे ताब्यांत आहे. त्यांस महाराज ह्मणतात.

कोची.—हें संस्थान मलबार प्रांताचे दक्षिणेस व त्रावणकोरच्या उत्तरेस आहे. ह्याचें क्षेत्रफळ १९८८ चौरस मैल आहे. हें एका हिंदु राजाचे ताब्यांत आहे. समुद्र व घाट ह्यांचे मधले प्रदेशांत भाताची लागवड करितात. मिरें, वेलदोडे, सुपारी, सुंठ, रताळू वगैरे उत्पन्न होतें. ब्रिटिश सरकाराकडे जें कोची बंदर आहे, त्यावरून याला कोची असें नांव पडलें आहे.

**त्रिचूर** हें ह्या संस्थानाचें मुख्य शहर किनाऱ्यावर आहे. शिवाय कांगनूर, चितूर, एदपल्ली वगैरे प्रसिद्ध गांवें आहेत.

**पुदूकोट.**—हें संस्थान त्रिचनापल्ली, तंजावर आणि मधुरा ह्या प्रांतामध्यें आहे.

**मद्रासचे लगतच्या जमीनदाऱ्या.**—जयपूर जमीनदारी ही बंगालमधील ओरिसा प्रांताचे जवळ आहे विजागापट्टण जिल्ह्यामध्यें विजयानगरम् जमीनदारी ; अर्काटमध्यें कालास्त्री आणि कावेतनगर जमीनदाऱ्या आहेत.

**म्हैसूर आणि कुर्गप्रांत.**

हा प्रांत एका चीफ कमिशनरच्या ताब्यांत आहे. ह्याची नेमणूक गव्हर्नर जनरल करितात. ह्याच्या उत्तरेस धारवाड, व कानडा हे जिल्हे; पूर्वेस कडाप्पा, अर्काट व सेलम हे जिल्हे, दक्षिणेस कोइंबतूर व मलबार हे प्रांत, आणि पश्चिमेस दक्षिण कानडा जिल्हा. ह्याची लांबी उत्तर दक्षिण २५० मैल व रुंदी २६८ मैल आहे. क्षेत्रफळ सुमारें ३०८८६ चौरस मैल व लोकसंख्या सुमारें साडेपन्नास लक्ष आहे. म्हैसुराचे चार भाग आहेत. त्यांचीं नांवें:—पूर्वभागीं **बेंगळूर**, दक्षिणेस **अष्टग्राम** ( खासम्हैसूर ), उत्तरेस व वायव्येस **चित्रदुर्ग** आणि **बेदनूर** (नगर). ह्या देशांत भोंवतालच्या घांटाशिवाय शिवगंगा नामक डोंगराची ओळ बेंगळूरचे ईशान्येस २५ मैलांवर आहे. तसेंच जागोजाग सुटे डोंगर सुळक्यासारखे आहेत, त्यांना दुर्ग ह्मण-

ताल. ह्या दुर्गांपैकीं नंदीदुर्ग व सुवर्णदुर्ग हे फार प्रसिद्ध आहेत. ह्याचे दोहों बाजूस पूर्व व **पश्चिम घाट** आहेत.

**नद्या**–कावेरी नदीला नैर्ऋत्येकडून लक्ष्मणतीर्थ व कुबानी आणि वायव्येकडून हेमवती, व उत्तरेकडून अर्कावती ह्या नद्या मिळतात. तुंग, व भद्रा ह्या नद्यांचा संगम हाल्लहोनूर येथें होऊन पुढें तुंगभद्रा नांवानें ती कृष्णा नदीला मिळते. तुंगभद्रेला हग्री ऊर्फ वेदवती नदी मिळते. पन्नार(पिनायकिनी) नामक दोन्ही नद्या ह्या प्रांताच्या कांहीं भागांतून वाहतात. येथील हवा प्रकृतीस मानणारी आहे. जमीन पिकाऊ असून तांदुळाचें पीक पुष्कळ येतें. नाचणी, वरग, मका, गहूं वगैरे धान्यें उत्पन्न होतात. कुसुंबा, अफू, तंबाखू आणि कापूस, मिरीं, बुंद, वेलदोडे ह्यांचेंही उत्पन्न होतें.

**शहरें–बेंगळूर** भागामध्यें बेंगळूर हें म्हैसूरचे ईशान्येस ८० मैलांवर तटबंदीचें शहर आहे. ह्या ठिकाणीं टिपूसुलतानाची कबर आहे. येथें कमिशनर रहातो ; व येथें एक पाहण्यासारखी बाग आहे.तीस लालबाग असें म्हणतात.कोलार या गांवीं हैदरअली जन्मला. **अष्टग्रामामध्यें**.–म्हैसूर हें राजधानीचें शहर आहे. येथें राजा रहातो. कावेरी नदीचे एका बेटामध्यें श्रीरंगपट्टण शहर म्हैसूरचे उत्तरेस सहा मैलांवर आहे. हें पूर्वी हैदराचे गादीचें स्थान होतें. **चित्रदुर्ग** भागामध्यें–तुमकूर व चित्रदुर्ग हीं शहरें आहेत. चित्रदुर्ग येथें एक

किल्ला आहे. नगरमंडी–शिमोगा, तुंगभद्रा नदीवर हरिहर, व पश्चिमभागीं नगर हीं शहरें आहेत. हरिहर हें शहर चित्रदुर्ग-पासून चाळीस मैलांवर आहे; व येथें फौजेचें ठाणें आहे. येथील लोकांची कानडी भाषा आहे.

कुर्ग–हा डोंगराळ प्रांत पूर्वी हैसूर येथील कमिशनरच्या ताब्यांत होता. परंतु सन १८३४ सालीं ब्रिटिश सरकारानें कुर्गचे राजास पदच्युत करून राज्यकारभार आपले हातीं घेतला. मरकारा हें मुख्य शहर हैसूरचे पश्चिमेस ६० मैलांवर आहे.

## बंगाल इलाखा.

सीमा–उत्तरेस नेपाळ, सिक्कीम, व भूतान हे प्रदेश; पूर्वेस मणिपूर व लुशै संस्थानें, आणि ब्रम्हदेश, दक्षिणेस बंगालचा उपसागर; पश्चिमेस मध्यप्रांत व वायव्येकडील प्रांत आहेत. याचें क्षेत्रफळ १७०००० चौ० मैल व लोकसंख्या ६½ कोटी आहे. याचे बंगाल, बहार, ओरिसा आणि छोटानागपूर असे चार प्रांत आहेत. बंगाल, व बहार हे प्रांत मोंगल सरकाराकडून सन १७६५ मध्यें मिळाले.

पर्वत–या इलाख्याचे पश्चिम व नैर्ऋत्य दिशांकडचे भागलपूर, मोनगड, रामगड, पालामौ व ओड्या देशाच्या उत्तरेकडील भाग हे डोंगराळ आहेत. त्यांतील डोंगरांचा विंध्याद्रीशीं कांहीं संबंध आहे. काचर, टिपरा, चितगांग ( इस्लामबाद )

ह्या नांवाचे डोंगर बंगालचे पूर्वेस आहेत. राजमहालचे डोंगर बहार प्रांताचे पूर्वेस आहेत.

**नद्या**–गंगा ( भागीरथी ) ही नदी गाजीपुराजवळ ह्या इलाख्यांत शिरते हिचे डावे तीरास चपरा शहराजवळ घोगरा नदी (शरयू), हाजीपुराजवळ गंडकी, मोंगीर शहराजवळ बागमतीनदी, भागलपुराजवळ कुशी ऊर्फ कौशिकी ह्या नद्या मिळतात, व उजवे तीरास पाटणा शहराजवळ सोनभद्र नद, व कर्मनाशा नदी ह्या मिळतात. पश्चिमेकडून भागीरथी वेगळी आहे. तीस हुगली असें ह्मणतात. ब्रह्मपुत्रनद गोवळपारा या नांवाचे गांवाजवळ या इलाख्यांत येतो. ह्यापासून कोनई नांवाचा फांटा फुटतो. महानदी ही कटक शहराजवळ ह्या इलाख्यांत प्रवेश करिते. ह्यांशिवाय दामुदा, रूपनारायण, ह्या नद्या हुगलीस मिळतात ; व सुवर्णरेखा, वैतरणी, आणि ब्रह्माणी ह्या नद्या ओरिसा प्रांतांतून बंगालच्या उपसागरास मिळतात. गंगा व ब्रह्मपुत्रनद ह्यांच्या मुखांजवळील प्रदेशास सुंदरबन ह्मणतात.

**उत्पन्न**–तांदूळ, नीळ साखर, अफू, तंबाखू, आणि कापूस, हे मुख्य उत्पन्नाचे पदार्थ आहेत. येथें तुतीच्या झाडांची रेशमाच्या किड्यांस खाण्याकरितां पुष्कळ लागवड करितात. बहार प्रांतांत निळीचें उत्पन्न फार होतें.

**दक्षिणेकडील प्रांतांतील शहरें** (हुगली नदीच्या पूर्व भागीं)–**कलकत्ता** हें हिंदुस्थानचें राजधानीचें शहर हुगली

नदीचे पूर्वतीरी समुद्रकिनाऱ्यापासून सुमारें शंभर मैलांवर आहे. सन १६८६मध्यें इंग्लिश लोकांनीं ह्या ठिकाणीं वसाहत केली. युरोपियन लोक ह्या शहरचे दक्षिणभागीं चौरंगीमध्यें राहतात. ह्या शहरापासून सुमारें पाव मैलावर वुइल्यम नांवाचा एक मजबूत किल्ला आहे. अलिपूर हें दक्षिणेस १ मैलांवर आहे ह्या ठिकाणीं बंगालचे लेफ्टेनेंट गव्हरनरचे कचेरीची जागा आहे. कलकत्याचे ईशान्यभागीं दमदम, व उत्तरेस १६ मैलांवर बरकपूर, ह्या दोन शहरीं फौजेचें ठाणें आहे. बरकपूरमध्यें गव्हरनर जनरलकरितां एक वाडा आहे. कृष्णनगर हें शहर नदिया जिल्ह्यामध्यें कलकत्याचे उत्तरेस ६० मैलांवर आहे. कलकत्याचे उत्तरेस ९६ मैलांवर भागीरथीचे कांठीं प्लासी नामक रणभूमि आहे. येथें लार्ड क्लाईव्ह साहेबानें बंगालचे सुभेदाराचा पराभव सन १७५७त केला. सुंदरबनचे उत्तरेस जसोर शहर आहे. या शहरामध्यें तापाची सांथ वारंवार येते. याचे दक्षिणभागीं मिठाचें उत्पन्न होतें. पबना जेसोरचे उत्तरेस कलकत्यापासून ११० मैलांवर आहे. गंगानदीचे मुखाशीं बकरगंज व बरीसाल हीं दोन शहरें बकरगंज नांवाचे जिल्ह्यामध्यें आहेत. ह्या जिल्ह्याचे उत्तरेस ढाका जलालपूर जिल्हा आहे. यामधून गंगा व ब्रह्मपुत्र नद वाहतात. पावसाळीं पूर येऊन ह्या जिल्ह्याचा बहुतेक भाग वाहून जातो. फरीदपूर हें याचें मुख्य शहर गंगेचे कांठीं

आहे. डाका जलालपूर व मेमा यांचेमध्यें डाका (खास)जिल्हा आहे. ह्याचे मध्यभागीं कलकत्याचे ईशान्येस १४०मैलांवर डाका नांवाचें शहर आहे. हें एकदां मुसलमानी राज्याचे राजधानीचें शहर होतें. टिपरा जिल्ह्याचे आग्नेयेस चित्तगांग जिल्हा आहे. हा फार डोंगराळ असून सुपीक आहे. इस्लामबाद हें ह्याचें मुख्य शहर चित्तगांग नदीवर आहे.

पश्चिमेकडील प्रांतांतील शहरें--( गंगानदीचे दक्षिणभागीं) —मुर्शिदाबाद हें शहर कलकत्याचे उत्तरेस १०९ मैलांवर भागीरथीचे कांठीं आहे. ह्यामध्यें रेशमाचे व कापसाचे कारखाने आहेत, व येथें सतरंज्या फार चांगल्या होतात. कासीमबझार, व बऱ्हामपूर हीं शहरें मुर्शिबादेजवळ आहेत. बऱ्हामपूर येथें फौजेचें ठाणें आहे. बर्द्धान (वर्धमान)भागाचे मुख्य शहर बर्द्धान,हें कलकत्याचे वायव्येस ६०मैलांवर दामुदा नदीचे कांठीं राजाचें रहाण्याचें स्थान आहे.बनकुरा हें शहर दामुदा नदीचे दक्षिण तीरावर आहे.ह्या ठिकाणीं कोळशाच्या खाणी व लोखंड सांपडतें. हुगली जिल्ह्यामध्यें हुगली मुख्य शहर हुगली नदीचे कांठीं आहे. चिनसुरा, चंद्रनगर,आणि श्रीरामपूर हीं शहरें ह्या जिल्ह्यांत आहेत. चिनसुरामध्यें एक विद्यालय आहे.हें शहर पूर्वी डच लोकांचे स्वाधीन होतें.चंद्रनगर हें फ्रान्सचे ताब्यांत आहे. श्रीरामपूर हें १८४४साली डेन्मार्कपासून विकत घेतलें. मुट्ला ( पोर्टक्यानिंग ) हें मुट्ला

नदीचे कांठीं कलकत्याचे आग्नेयेस ३० मैलांवर आहे. मेदिनीपूर हें बनकुराचे दक्षिणेस ७० मैलांवर आहे. ह्या ठिकाणीं मीठ तयार करितात.

**उत्तरेकडील प्रांतांतील शहरें—मैमनसिंग** जिल्ह्यामध्यें नसिराबाद हें मुख्य ठाणें आहे, हें ब्रम्हपुत्र नदाचे कांठीं डाक्का शहराचे उत्तरेस ६० मैलांवर आहे. ह्याचे वायव्येस **कुचबहार** संस्थान आहे. यापासून ८२ मैलांवर **दार्जलिंग** प्रांत आहे. हा समुद्रसपाटीपासून ७१६७ फूट उंच आहे; येथील हवा फार सुखावह आहे. हा प्रदेश सिक्कीमचे राजानें १८३६ सालीं इंग्लिश सरकारास दिला. कुचबहारचे दक्षिणेस रंगपूर नांव चें शहर आहे. यांतून तिस्तानदी वाहते. **बोगरा** जिल्ह्यामध्यें त्याच नांवाचें मुख्य शहर रंगपूरचे दक्षिणेस आहे. **माल्दा** जिल्ह्यामध्यें शिवगंज व माल्दा या नांवाचीं शहरें आहेत. अत्रिनदीवर दिनाजपूर नांवाचें शहर आहे. **पुरण्या** जिल्हा हा दिनाजपूरचे पश्चिमेस आहे. ह्यामध्यें क्रिसनगंज व बहादूरगंज हीं शहरें आहेत.

**बहारप्रांत**—हा नेपाळचे दक्षिणेस व मध्यप्रांताचे उत्तरेस आहे. ह्यांतून गंडकी, घोग्रा, आणि कुशी ह्या नद्या उत्तरेकडून, व सोनभद्र हा दक्षिणेकडून वाहतो. येथील जमीन फार पिकाऊ आहे. गंगानदीचे वायव्य दिशेनें **राजमहालचे** डोंगर आहेत. **पाटणा** जिल्हा कलकत्यापासून २८० मैलांवर

आहे. ह्यामध्यें नीळ, साखर, अफू व तांबूळ ह्यांचें उत्पन्न होतें. शाहाबाद जिल्ह्यामध्यें जगदीशपूर, सासाराम, बक्सार, व आरा हीं शहरें आहेत. बहार, गया, भागलपूर, तिरहूत, आणि सारून हे जिल्हे आहेत. गया फल्गू नदीवर पाटणाचे दक्षिणेस ६० मैलांवर आहे. येथें हिंदुलोक तीर्थविधीकरितां जातात. गया प्रांताला पूर्वी चंपकारण्य असें नांव होतें. गंगा नदीचे दक्षिणकिनाऱ्यावर मोंगेर जिल्हा आहे. येथें लोखंडी सामान उत्तम तऱ्हेचें तयार होतें. ह्या ठिकाणीं फौजेचें ठाणें आहे. पाटणामध्यें दिनापूर, तिरहूतमध्यें मुझफरपूर, व सारूनमध्यें चपरा हीं प्रसिद्ध शहरें आहेत. बंगालचे नैर्ऋत्येकडील सीमेवर छोटानागपूर, रामगड, लोहर्दगा, आणि सिंगभूम हीं जिल्ह्याचीं गांवें आहेत. छोटानागपूरमध्यें रांची व रामगडमध्यें हजारीबाग नांवाचीं शहरें आहेत. सिरगुजा संस्थान हें छोटानागपूरचे शेजारीं आहे.

ओरिसा—हा प्रांत बंगालच्या उपसागराच्या वायव्येस चिलका सरोवरापासून सुवर्णरेखा नदीपर्यंत पसरला आहे. ह्यामध्यें कटक, जगन्नाथपुरी, आणि बलेश्वर ( बलसोर ) हे जिल्हे आहेत. कटक शहर महानदीवर आहे. हें नागपूरचे भोंसल्यापासून १८०३ सालीं मिळालें. जगन्नाथ हें कटकपासून ४० मैलांवर आहे.

## आसाम.

हा प्रांत एका चीफ कमिशनरचे ताब्यांत बंगालचे ईशान्येस आहे. ह्याचें क्षेत्रफळ ५४०० चौ० मैल आहे. ह्यांतून ब्रह्मपुत्रनद वाहतो. ह्यामध्यें **नागा**, **जित्या**, **खाश्या** आणि **गारो** ह्या टेंकड्या आहेत. उत्तम प्रकारचा चहा, काफी, कापूस व साखर ह्या ठिकाणीं तयार होते. गोहाटी हें मुख्य शहर ब्रह्मपुत्रनदावर आहे. सिलहट हा जिल्हा खाश्या आणि टिप्रा ह्यांमध्यें आहे. ह्याचे दक्षिण व ईशान्येकडील भाग डोंगराळ आहेत. या जिल्ह्यांतून सुर्मा व बकरा नद्या वाहतात. सिलहट शहरीं फौजेचें ठाणें आहे. आसामचे सीमेवर ह्याच जिल्ह्याचें काचर मुख्य शहर कलकत्त्यापासून ३२० मैलांवर आहे ह्यामध्यें चहा, काफी, आणि तुतीचे झाडांची लागवड ब्रिटिश वसाहतदार करितात. ह्यामध्यें सिलचर, धर्मपूर, आणि दुदपानेल हीं शहरें आहेत. जित्यापूर (जयंतिपूर) हें सिलहट व गारो संस्थानें यांमधील प्रांताचें मुख्य शहर आहे. गोंवळपारा हें शहर **पूर्व व पश्चिमद्वार** नांवाचे प्रांतामध्यें आसामचे पश्चिमेस आहे. हे भूतानपासून जिंकून घेतलें. यामध्यें साखर, तंबाखू व कापूस यांचा व्यापार पुष्कळ चालतो. तेजपूर, दुरंग हीं शहरें ब्रह्मपुत्रनदाचे उजवे तिरास आहेत. लक्ष्मीपूर नांवाचें प्रसिद्ध शहर **नांगांग**चे ईशान्येस ९० मैलांवर आहे. आसाम प्रांत ब्रह्मदेशच्या राजापासून सन १८२६ त जिंकून घेतला.

## बंगालच्या लगत्याचीं संस्थानें.

**कुचबहार**—उत्तरेस सिकीम, पूर्वेस गोंवळपारा, दक्षिणेस व नैर्ऋत्येस रंगपूर. ह्याची लांबी ६० मैल व रुंदी ४० मैल आणि क्षेत्रफळ १३६४ चौ० मैल आहे. ह्याचे आग्नेय दिशेकडील भाग सुपीक आहे ह्यांत भात, गहूं, सातू, कापूस, तंबाखू ह्यांचीं पिकें येतात ह्यांतील मुख्य गांव बहार या नांवाचें आहे. **गारो, खाश्या, नागा** आणि **जिंत्या** या नांवाचीं डोंगरी संस्थानें आसाममध्यें आहेत. त्यांतील लोक कांहीं हिंदु व कांहीं ब्रह्मी आहेत

**सिकीम**—उत्तरेस व पूर्वेस तिबेट, आग्नेयेस भूतान, दक्षिणेस दार्जलिंग, पश्चिमेस नेपाळ. ह्याची लांबी ६६ मैल व रुंदी ५२ मैल आहे. क्षेत्रफळ १६७० चौरस मैल आहे. पूर्वी हा देश नेपाळ सरकाराकडे होता, परंतु तो आतां इंग्लिशसरकारानें स्वतंत्र करविला आहे. येथील लोक बौद्धधर्माचे आहेत. येथील राजा तमलुंग शहरीं राहतो. हें शहर तिस्ता नदीचे डावे तिरास आहे.

**मणिपूर व टिपरा**—ब्रह्मपुत्र व मेग्ना यांचे पूर्वेस टिपरा आहे. ह्यांत वुलाह नांवाचें मुख्य शहर आहे. ह्याचे पश्चिमेकडील भाग सुपीक आहे, परंतु पूर्वेकडील डोंगराळ आहे. मणिपूर संस्थानचें मणिपूर हेंच मुख्य शहर आहे. येथील जमीन पिकाऊ आहे. येथें पोलिटिकल एजंट असतो.

## अयोध्या प्रांत.

सीमा—उत्तरेस नेपाळ, पू० व प० वायव्येकडील प्रांत, ईशान्येस वायव्येकडील प्रांताचा अजीमगड, व जयानपूर जिल्हे आणि दक्षिणेस गंगानदी. ह्याची आग्नेय वायव्य लांबी २७० मैल व रुंदी १६० मैल, आणि क्षेत्रफळ २३,९३० चौरस मैल आहे. हा देश वायव्येकडील प्रांताला जोडलेला आहे; व **अलाहाबाद** शहर हें दोहींची मिळून राजधानी केली आहे. ह्या प्रांतांतून गंगा, रामगंगा, गरा ऊर्फ देव्हा, सै, गोमती, घोगरा, चौका, आणि रापती ह्या नद्यांचे प्रवाह बहुतेक वायव्येकडून आग्नेयेकडे जमिनीचे उतरतेपणामुळें गेले आहेत. रामगंगा नदीचा उगम कमाऊन प्रांतांत होऊन ती कनोज शहराजवळ भागीरथीला मिळते. गोमती, घोगरा, व रापती ह्याही भागिरथीला मिळतात. सै नांवाची नदी कमाऊन प्रांतांत उगम पावून, ती जौनपुराजवळ गोमतीला मिळते. भागिरथीचे डाव्या तिराची जमीन फार चांगली आहे. तांदूळ, गहूं, बाजरी, ज्वारी, ऊंस, तंबाखू आणि कापूस यांचें पीक येतें. व या ठिकाणीं साखर व अफू हीं तयार होतात. पूर्वी हें राष्ट्र श्रीरामचंद्रजीचा बाप दशरथ याचे गादीचें स्थान होतें. बारावे शतकाचे अखेरीस हें मुसलमान राजाचे हातीं आलें. सन १७६० मध्यें नवाबानें आपणास स्वतंत्र करून घेतलें. पुढें

१८५६ सालीं नबाबास पदच्युत करून राज्याची व्यवस्था इंग्रज सरकार पाहूं लागलें. आतां नबाबास सालीना १२ लक्ष रुपये पेनशन मिळतें. ह्या देशांत हिंदू व मुसलमान लोकांची वस्ती आहे. ते उर्दू भाषा बोलतात.

**शहरें**–मुख्य शहर लखनौ ( नैमिषारण्य ) हें गोमतीचे कांठीं आहे. अयोध्या हें पूर्वीचे राजधानीचें शहर घागरा नदीचे कांठीं लखनौचे पूर्वेस ७० मैलांवर आहे. येथें श्रीरामचंद्राचा जन्म झाला. रायबरेली सै नदीचे कांठीं लखनौपासून ४५ मैलांवर आहे. अयोध्येच्या नैर्ऋत्येस १५ मैलांवर फैजाबाद शहर आहे. येथें कापड व धातूंचे कारखाने आहेत. बरेच, शाहजादपूर, सितापूर इ० दुसरीं शहरें आहेत. **लखनौ**, **रायबरेली**, **फैजाबाद**, आणि **सितापूर** असे अयोध्याप्रांताचे चार भाग करितात.

## वायव्येकडील प्रांत.

**सीमा**–उ० हिमालयपर्वत; प० राजपुताना आणि यमुना नदी, द० रेवा, बुंदेलखंड आणि ग्वाल्हेर, आणि पू० बहार प्रांत. ह्याचें क्षेत्रफळ सुमारें १०५००० चौ०मैल आहे. ह्या प्रांतांतून गंगा व यमुना ह्या नद्यांचे प्रवाह आहेत. या दोन नद्यांमधील प्रदेशास दुआब ( अंतर्वेदी ) असें म्हणतात. हा फार सुपीक प्रदेश आहे. गंगेला मिळणाऱ्या अगर तिला ज्या मिळतात, त्यांत मिळणाऱ्या अनेक नद्या आहेत. आणि

गोरीगंगा, घोगरा, रामगंगा, गोमती, आणि राप्ती ह्या आहेत. बाजरी, ज्वारी, सातू, गहूं, ऊंस, कापूस, चहा, नीळ आणि अफू ह्यांचें फार पीक येतें. येथील लोकांची मुख्य भाषा उर्दू व हिंदी आहे. उत्तरेकडील व पश्चिमेकडील प्रांत हे, पण १८७७साली एकत्र करून त्यांस वायव्येकडील प्रांत असें नांव दिलें आहे.

**बनारस ऊर्फ काशी आणि गोरखपूर विभाग.**—बनारस हें पवित्र शहर गंगेच्या उत्तर तीरावर आहे. हें वैदिक विद्येचें मुख्य पीठ व शिवभक्तीचें मुख्य स्थान आहे. ह्या शहरापासून तीन मैलांवर शिक्रूल शहरांत युरोपियन लोक राहतात. गाजीपूर जिल्ह्यामध्यें गाजीपूर, व रेवती हीं शहरें आहेत. गाजीपूर येथें गुलाबपाणी फार चांगलें होतें. अजीमगड हें काशीपासून ६०मैलांवर आहे. याचे आग्नेयेस मऊ शहर आहे. काशीचे पश्चिमेस ३८मैलांवर मिरझापूर शहर आहे. येथें कापसाचे कारखाने आहेत. जवानपूर हें शहर गोमतीचे कांठीं काशीपासून ४०मैलांवर आहे. गाजीपुराचे उत्तरेस ८०मैलांवर राप्तीचे कांठीं **गोरखपूर** शहर आहे. येथील हवा रोगकारक आहे.

**अलाहाबाद व झांशी विभाग.**—अलाहाबाद (प्रयाग) हें राजधानीचें शहर गंगा व यमुना यांचे संगमावर (त्रिवेणीसंगम) अकबरबादशहानें वसविलें आहे. येथें एक मजबूत किल्ला आहे. येथें वायव्येकडील प्रांताचे लेफ्टनेनन्ट गव्हर्नर राहतात.

मातीचें व लोखंडी सामान ह्या ठिकाणीं पुष्कळ तयार होतें. हें शहर सन १७६५त इंग्लिशांनीं हस्तगत करून घेतलें. ह्या शिवाय दुसरे चार प्रयाग आहेत ते:-देवप्रयाग, नंदप्रयाग, कर्णप्रयाग, व माधवप्रयाग; हे हिमालयावर आहेत. दूआबा-मध्यें वायव्य दिशेस फत्तेपूर शहर आहे कानपूर हें शहर गंगानदीचे दक्षिण तीरावर अल्लाहाबादेचे वायव्येस १२०मैलां-वर आहे. येथें कातड्याचा व्यापार बराच चालतो. इ०सन १८५७मध्यें बंडवाल्यांनीं ह्या ठिकाणीं युरोपियन लोकांची क-त्तल उडविली, व शहराचाही पुष्कळ नाश केला.यमुनानदीचे दक्षिणेस ब्रिटिश बुंदेलखंडामध्यें **बांदा, जलौन, झांशी,** जैतपूर व चारखांश नांवाचे प्रसिद्ध प्रांत आहेत. झांशीचे राणीनें सन १८५७मध्यें स्टार किल्ल्यांत युरोपियन लो-कांची कत्तल उडविली झांशीमध्यें कापसाचा व्यापार चालतो. हमीरपूर हें शहर केन व यमुना यांच्या संगमावर आहे. कान-पूरचे नैर्ऋत्येस ४५मैलांवर यमुनेचे कांठीं काल्पी शहर आहे. येथें कागद करण्याचा कारखाना आहे.

**आग्राविभाग.**—आग्रा हें शहर अल्लाहाबादेचे वायव्येस २६०मैलांवर यमुनेचे कांठीं आहे. येथें पूर्वी मोंगल राष्ट्राची गादी होती. येथें ताजमहाल नांवाची एक अत्युत्कृष्ट इमारत आहे. तींत शाहजहान व त्याची राणी नूरजहान ह्यांचीं प्रेतें पुरलीं आहेत आग्रयाचे उत्तरेस ६ मैलांवर शिकंदरा नांवाचें

गांवांत अकबरबादशाहाची कबर आहे. ही इमारत ताजमहालचे खालोखाल आहे. कालीनदी व गंगा यांचे संगमाजवळ कनोज शहर आहे. यमुना नदीचे उत्तर तीरावर इटावा शहर आग्र्यापासून ७० मैलांवर आहे. आग्र्याचे पूर्वेस ६० मैलांवर मैनपुरी आहे. गंगा नदीजवळ फरूखाबाद शहर आहे. ह्या शहरची हवा आरोग्यकारक आहे. आग्र्याचे वायव्येस ३८ मैलांवर मथुरा शहर यमुनेच्या कांठीं आहे हें श्रीकृष्णाचें जन्मस्थान आहे. शिवाय फत्तेगड, वृंदावन, गोवर्धन, इत्यादि शहरें आहेत.

**मिरुतविभाग**—मिरुत शहर दिल्लीचे ईशान्येस ४२ मैलांवर काली नदीचे कांठीं आहे येथें फौजेचें ठाणें आहे. भागिरथी मैदानांत येते, तेथें हरिद्वार ( अट्टेनवन ) नांवाचा एक गांव सहारणपूरचे पूर्वेस ३९ मैलांवर आहे. हें प्रसिद्ध तीर्थ व क्षेत्र आहे. अलीगड मथुरेच्या ईशान्येस २८ मैलांवर आहे. ह्याचेजवळच कोयल नांवाचे शहर आहे. मिरुतच उत्तरेस ४० मैलांवर काली नदीचे कांठीं मुजफर नगर शहर आहे. सहारणपूर जिल्हा दिल्लीचे उत्तरेस ८० मैलांवर आहे. ह्यामध्यें देवबंद, रुडकी, ज्वालापूर हीं प्रसिद्ध शहरें आहेत. रुडकी येथें एक एन्जिनिअरिंग विद्यालय आहे. मिरुतपासून ३८ मैलांवर बिजनोर शहर आहे. येथें उंसाची लागवड पुष्कळ करितात.

**रोहिलखंड विभाग**—सन १७२०त अफगानांतील रोहिले लोकांनीं हा भाग जिंकून घेतला म्हणून यास रोहिलखंड असें

नांव पडलें आहे.यामध्यें शाहजहानपूर,बदाऊं,मुरादाबाद आणि बरेली हे जिल्हे आहेत,व यांचीं मुख्य शहरें त्या त्याच नांवाचीं आहेत.हा भाग १८०१ सालीं नबाबाकडून मिळाला.

## वायव्येकडील प्रांताखालील मुलूख.

कमाऊन, व ब्रिटिशगरवाल–हे डोंगरी प्रांत हिमालयामध्यें नेपाळच्या पश्चिमेस आहेत. कमाऊनमध्यें अलमोडा, नैनीताल आणि लोहुकोट हे मुख्य गांव आहेत; व नंदादेवी नांवाचें एक अति उंच शिखर आहे. येथील नद्यांचे तासांतून सोनें सांपडतें गरवाल प्रांतामध्यें टिरी हें मुख्य शहर आहे. शिवाय श्रीनगर, बद्रीनाथ, केदारनाथ, गंगोत्री, आणि जम्नोत्री हीं आहेत येथील हवा ऊष्ण आहे. देहरादून हरिद्वारचे वायव्येस आहे. त्यामध्यें राजपूर, कालसी, आणि मसूरी हीं मुख्य ठाणीं आहेत. रोहिलखंडामध्यें रामपूर हें प्रसिद्ध संस्थान आहे. ह्याशिवाय रेवा, झजर, बहादूरगड, व लोहारु हीं लहान संस्थानें आहेत. कमाऊन व देहरादून प्रांतामध्यें चहाची लागवड करितात.

## पंजाब इलाखा.

सीमा–उत्तरेस काश्मीर व काराकोरम पर्वत, पूर्वेस यमुनानदी, दक्षिणेस सिंध आणि राजपुताना, व पश्चिमेस सुलेमान पर्वत आहे. ह्याचें क्षेत्रफळ सुमारें १०१००० चौरस मैल

आहे ह्याचे ईशान्येकडील सीमेवर हिमालयपर्वताचा कांहीं भाग आहे. त्यांतील सिम्ला व सुबाथु या स्थळांमधील हवा फार चांगली आहे. पश्चिमेकडून पूर्वेकडे साल्टरेन्ज नांवाची एक डोंगराची ओळ आहे, तींत मीठ, तुरटी, सुरमा, आणि गंधक यांच्या खाणी आहेत. ह्या इलाख्यामध्यें पाऊस फार थोडा पडतो. तथापि ह्यांतील सतलज, बेआस, रावी, चिनाब, जेलम आणि सिंधुनद या प्रसिद्ध नद्यांतून कालवे काढून शेती करण्याची सोय झाली आहे. खास पंजाबामध्यें पांच दूआब (दोन नद्यांमधील प्रदेश) आहेत. त्यांचीं नांवें—जालंधर–सतलज व बेआस नद्यांमध्यें आहे. बारि–बेआस आणि रावी नद्यांमध्य आहे. रेचना–रावी आणि चिनाब नद्यांमध्यें आहे. जेच–चिनाब आणि जेलम नद्यांमध्यें आहे. सिंधसागर–जेलम आणि सिंधुमध्यें आहे. ह्या पांच दूआबांपैकीं सिंधसागर हा फार विस्तीर्ण आहे, परंतु वस्तीचे मानानें पाहिलें असतां बारी हा फार महत्वाचा आहे. ह्यांत लाहोर, अमृतसर आणि मुलतान हीं प्रसिद्ध शहरें आहेत. गहूं, बाली, तांदूळ, कापूस आणि नीळ हें मुख्य उत्पन्न आहे ह्या इलाख्यांतील लोकवस्तीपैकीं दोन तृतीयांश लोक मुसलमानी धर्माचे आहेत, व बाकीचे शीक व हिंदु धर्माचे आहेत. शीक धर्माचा स्थापक नानक नांवाचा पुरुष सन १४६९ सालीं

**लाहोर विभागांतील शहरें**-**लाहोर** हें पंजाबाचें मुख्य गादीचें स्थान आहे, व तें रावी नदीजवळ दिल्लीचे वायव्येस २७० मैलांवर आहे. येथें हत्यारें चांगली होतात. हें पूर्वी मोंगल राष्ट्राची राजधानी होतें, लाहोरचे ईशान्येस३५मैलांवर अमृतसर शहर आहे. ह्या शहरीं श्री विष्णुचें देवालय आहे. हीं दोन्हीं शहरें रेशिम व सुताचे कारखान्याकरितां प्रसिद्ध आहेत. **फेरोजपूर** सतलजचे पूर्व किनाऱ्यावर आहे. ह्याचे ईशान्येस २० मैलांवर **सोब्राओन** नांवाचें शहर आहे. ह्या शहरीं सन १८४६मध्यें ब्रिटिश सैन्यानें शीक लोकांचा पराभव केला.

**रावळपिंडी विभाग**-लाहोरचे वायव्येस १६० मैलांवर जेलम व सिंधु यांमध्यें **रावळपिंडी** शहर आहे. त्याचे आग्नेयेस ६० मैलांवर **जेलम** याच नांवाचे नदीचे पश्चिम किनाऱ्यावर आहे. **गुजराथ** हें तटबंदीचें शहर जेलमचे आग्नेयेस आहे. या ठिकाणीं सन१८४९साली शीख लोकांचा ब्रिटिश सैन्यानें पराभव केला. तेणेंकरून पंजाब प्रांत ब्रिटिश राज्यांत मिळाला. गुराजथचे नैर्ऋत्येस १०० मैलांवर जेलमनदीचे पूर्व किनाऱ्यावर **शाहापूर** नांवाचें एक शहर आहे. शिवाय **रोतास**, आणि **वजिराबाद** हीं शहरें आहेत.

**पेशावर विभाग**-**पेशावर** हें शहर अफगाणिस्थानाचे सरहद्दीवर समुद्रसपाटीपासून ११६५ फूट उंचीवर आहे. हें खैबरघाटा पासून १० मैलांवर आहे. येथें इंग्रज सरकारची

फौज असते.कोहात पेशावरचे दक्षिणेस २५ मैलांवर आहे. हजारा प्रांतामध्यें हारिपूर नांवाचें शहर पेशावरचे पूर्वेस ७२ मैलांवर आहे.

**डेराइस्माईलखान विभाग**-**डेराइस्माईलखान** नांवाचें शहर सिंधुनदाचे पश्चिम किनाऱ्यावर व्यापाराकरितां प्रसिद्ध आहे.

**मुलतान विभाग**-**मुलतान** हें शहर चिनाब नदीचे पूर्व-किनाऱ्यावर लाहोरचे नैर्ऋत्येस १८० मैलांवर आहे. येथें रेशमी व सुती वस्त्रें आणि शाला उत्तम प्रकारच्या होतात. **झंग** प्रांताचें मुख्य शहर **मुजफरगड** नांवाचें आहे. तें मुल-तानचे नैर्ऋत्येस २० मैलांवर आहे.

**जालंदर विभाग**-ह्या विभागामध्यें **जालंदर**, **हुशारपूर**, **नादान**, **कांगडा** इ० शहरें आहेत.

**सतलज विभाग**-**सिम्ला** हें शहर डोंगरी संस्थानामध्यें लाहोरचे पूर्वेस १६५ मैलांवर आहे.तेथील हवा फार चांगली आहे. अंबाला हें तटबंदी शहर सिम्ल्यापासून २५ मैलांवर आहे.**लुधिआना** हें शहर सतलज नदीचे डावे तीरावर आहे. ह्या ठिकाणीं शाली तयार होतात.

**हिस्सार विभाग**-**हिस्सार** शहर फेरोजशहा कालव्यावर दिल्लीचे वायव्येस १०० मैलांवर आहे. या शहराचे पूर्वेस २० मैलांवर **हनसी** शहर आहे. ह्या ठिकाणीं मिठाचा व्यापार चालतो.

**दिल्ली विभाग**—हा १८०३ साली शिंद्यापासून मिळाला. दिल्ली हें मुख्य शहर कलकत्त्याचे वायव्येस यमुना नदीचे पश्चिम कांठीं आहे हें तटबंदी शहर पूर्वी मोंगल राष्ट्राचें गादीचें स्थान होतें. ह्या ठिकाणीं सुती कापड, शाली, व जवाहीर यांचा व्यापार पुष्कळ चालतो. **सोनपत, पानपत, कर्नाळ** आणि **गुडगांव** हींही बरींच मोठीं शहरें आहेत.

## पंजाबांतील संस्थानें.

**काश्मीर**—ह्याचे उत्तरेस काराकोरम पर्वत, पूर्वेस तिबेट, दक्षिणेस व पश्चिमेस पंजाब; लांबी पूर्व पश्चिम सुमारें ३५० मैल व रुंदी २७० मैल आणि क्षेत्रफळ ७४,००० चौरस मैल आहे. लोकसंख्या सुमारें १५ लक्ष आहे हें राज्य सन १८४५ सात शीख लोकांपासून मिळालें; परंतु यांतील कांहीं भाग सन १८४६ साली इंग्रज सरकारानें **गुलाबसिंगास** दिला. काश्मीर (खास) देशाशिवाय गिल्जित, जामू, बल्ती (इस्कार्डो ह्मणजे लहान तिबेट), ल्दाक (मधलें तिबेट) आणि चांबा हे प्रांत या भागांत येतात. ल्दाकचें मुख्य शहर लेह हें सिंधुनदीवर आहे. खास काश्मीरमधून जेलमनदी वाहते. येथील हवा फार थंड आहे. गुलाबी अत्तर, शाली, वस्त्रें आणि कागद करण्यामध्यें काश्मीरची सर्व जगांत प्रसिद्धि आहे. गिल्जित विभागांतील लोक बहुतकरून शियापंथाचे मुसलमान आहेत. श्रीनगर (काश्मीर) हें राजधानीचें शहर जेलमनदीचे

दोहों कांठावर वसलें आहे. ह्याशिवाय इसलामाबाद, पामपुर, बिजबहार, शाहाबाद हे प्रसिद्ध गांव आहेत.

भावलपूर–हें संस्थान राजपुताना आणि घारानदी ( सतलज) ह्यांमध्यें आहे. ह्याची लांबी२९० मैल, व रुंदी १२० मैल, आणि क्षेत्रफळ २९,२०० चौरस मैल आहे ह्या संस्थानची बहुतेक जमीन नापीक आहे. घारानदीचे पूर्व किनाऱ्याची जमीन सुमारें १० मैलपर्यंत सुपीक आहे. तींत तांदूळ, गहूं, नीळ, ऊंस, कापूस, आणि खसखस ह्यांचें पीक येतें. येथें जट, बलूची, व हिंदु लोकांची वस्ती आहे ह्या संस्थानाचे मालकास खान म्हणतात. शिकारपूर येथील दाऊद नावाचा कोष्टी येथें पळून आला होता त्याचा पुत्र भावलखान ह्यानें हें शहर वसविलें. यावरून भावलपूर हें नांव पडलें आहे. भवलपूर अहमदपूर, ऊच, खानपूर इ० प्रसिद्ध शहरें आहेत.

पतियाळा–हें शीक लोकांचें मोठें संस्थान लुधिआनाचे दक्षिणेस सरहिंद प्रांतांत आहे ह्यांतील जमीन सुपीक आहे. दुसरीं सीक संस्थानें–झिंद, नभा, फरिदकोट आणि कालसिया हीं सतलज नदीचे दक्षिणेस सरहिंद प्रांतांत आहेत. ह्याशिवाय कपूरथळा नांवाचें एक शीक संस्थान आहे.

डोंगरी संस्थानें–चंबा हें यमुना नदीचे पूर्वभागीं आहे बुसाहीर व सिरमूर ही सतलज विभागांत आहेत. सबाथू हें सिमल्याचे दक्षिणेस आहे फासोली हें सुबाथूचे दक्षिणेस आहे.

सिम्ला, गुबाथू आणि कासौली हीं इंग्रज सरकारचीं आहेत.

## राजपुताना आणि माळवा.

**राजपुताना**—ह्याचे उत्तरेस पंजाब, पूर्वेस आग्राप्रांत व शिंद्याकडील प्रांत, द० गुजराथ प्रांत व पश्चिमेस सिंधप्रांत आहे. ह्याची पूर्व पश्चिम लांबी सुमारें ४२० व रुंदी सुमारें ४०० मैल आणि क्षेत्रफळ १,२६,००० चौरस मैल आहे. **अजमीर** हा प्रांत राजपुतान्यामध्यें मध्यभागीं इंग्लिशांकडील एका कमिशनरचे अधिकाराखालीं आहे. हा दौलतराव शिंद्यापासून इंग्लिशांना सन १८१८ मध्यें मिळाला. ह्यापासून ६ मैलांवर **पुष्कर** नामक एक क्षेत्र आहे. तेथें ब्रम्हदेवाची मूर्ति आहे. अजमीर, नसीराबाद, बीर, फत्तेगड इत्यादि मुख्य शहरें आहेत. नसीराबाद शहरीं मुंबई इलाख्यांतील फौजेचें ठाणें आहे. ह्या प्रांताचे बाजूनें अरवली पर्वताची ओळ गेली आहे. राजपुतान्याचे आग्नेयकडील भागांतून चंबळ नदी, व नैर्ऋत्येकडून लोणी नदी वाहते. ह्यांतील सांबर नांवाचे सरोवरांतून मिठाचें पुष्कळ उत्पन्न होतें. धान्य, तंबाखू, कापूस, आणि अफू यांचें उत्पन्न बरेंच मोठें आहे. ह्या राष्ट्रांत १८ स्वतंत्र संस्थानें आहेत. राजपुतान्यावर हिंदुस्थान सरकारची देखरेख असते.

**संस्थानें व शहरें**—जोधपूर हें नैर्ऋत्य भागांतील मारवाड नामक प्रसिद्ध संस्थानाचें मुख्य शहर लोणी नदीचे कांठीं आहे. येथें पोलिटिकल एजंट असतो. ह्या संस्थानांत मारवाडी

लोकांची वस्ती आहे. मारवाडी लोक उद्योगी असून सावकारी करण्याकरितां सर्व देशांत जाऊन राहतात. ह्या शहराचे दक्षिणेस शंभर मैलांवर आरवली पर्वतावर आबू नांवाचें शहर आहे. विकानेर या वालुकामय संस्थानांत रतनगड, राजगड, आणि विकानेर हीं शहरें आहेत. बुंदी व कोटा या दोन संस्थानांना हरावती हें नांव आहे. भरतपूर व धोलपूर हीं जाट लोकांचीं संस्थानें आहेत. जोधपूरचे वायव्येस १४० मैलांवर जेलसमीर नांवाचें संस्थान वाळवंटाचे मैदानांत आहे. जयपूर हें शहर याच नांवाचे संस्थानांत जोधपूरचे ईशान्येस १७० मैलांवर आहे. सांबर, रामपुरी, इत्यादि दुसरीं शहरें ह्या संस्थानांत आहेत मेवाड संस्थानांत उदेपूर, चितूर, वेदनूर हीं शहरें आहेत त्यांत उदेपूर हें गादीचें स्थान आहे. येथील राणा हा सर्व रजपूत लोकांचा मुख्य आहे असें मानितात रजपूत लोकांची शौर्याविषयीं फार प्रसिद्धि आहे. किसनगड, बन्सवाडा, प्रतापगड, डोंगरपूर, कोटली, अलवार आणि सिरोही हीं शहरें याच नांवाचे संस्थानांत आहेत. टोंक हें मुसलमानी संस्थान अजमीरचे पूर्वेस आहे.

शिंदेसरकारचें राज्य.—याचे ईशान्येस चंबळा नदी; पूर्वेस बुंदेलखंड, व सागरप्रांत; दक्षिणेस भोपाळ व धार हीं संस्थानें; आणि पश्चिमेस राजगड, झालावा, व कोटा संस्थानें आहेत. याचें क्षेत्रफळ सुमारें ३३,११९ चौरस मैल आहे. ह्या रा-

ज्यामध्यें तापी, नर्मदा, चंबळा व तिला मिळणाऱ्या क्षिप्रा, छोटीकाळी, सिंध आणि पर्बती ह्या नद्यांचे प्रवाहानें पाण्याचा पुरवठा पुष्कळ झाला आहे. परंतु हवा सरासरी मानानें रोगकारक आहे. माळवाप्रांत दक्षिणभागीं आहे. ह्यामध्यें अफूचें उत्पन्न फार होतें. बाहेर जावयाचा मुख्य पदार्थ अफू हाच होय. माळव्यामध्यें देवासें, रतलाम, जावरा, जबूव, अलिराजपूर इत्यादि संस्थानें आहेत. शिंदेसरकारच्या गादीचें मुख्य स्थान ग्वाल्हेर हें आग्र्याच्या दक्षिणेस ६५ मैलांवर आहे. ह्यामध्यें एक किल्ला आहे, तो सरह्यूरोज साहेबानें सन १८५८ सालीं सर करून घेतला. ह्या किल्ल्याचे खालीं लष्कर ह्मणून एक छावणी आहे, तेथें महाराज राहतात. नीमच ग्वाल्हेरचे नैर्ऋत्येस २५० मैलांवर इंग्लिशांचें शहर आहे. येथें त्यांची थोडी फौज असते. ग्वाल्हेरचे आग्नेयेस ७० मैलांवर झांशी शहर आहे. क्षिप्रा नदीवर ग्वाल्हेरचे नैर्ऋत्येस उज्जयनी (अवंती) शहर आहे येथूनच हिंदु जोतिषवेत्त्यांचें पहिलें याम्योत्तरवृत्त जातें. हें स्थल विक्रमादित्याचे गादीचें स्थान होतें भेलसा हें उज्जनीचे पूर्वेस १२० मैलांवर बटवा नदीचे कांठीं आहे, ह्या ठिकाणीं तंबाखू पुष्कळ पिकतो. ब्रऱ्हाणपूर येथें शेले, पागोटीं, शालू, बुटीदार रेशमी कापड उत्तम तयार होतें. चंदेरीमध्यें बारीक व उत्तम प्रकारचें सुती कापड पूर्वी होत असे. ह्या राज्याचा मूळ स्थापक राणोजी शिंदा हा बाळाजी

विश्वनाथ पेशवे ह्यांच्या पदरचा कोणी मराठा सरदार होता. तो १७५० सालचे सुमारास मरण पावला. ब्रिटिश सरकारचा रेसिडेन्ट येथील दरबारांत असतो.

**होळकराचें राज्य.**—हें राज्य नर्मदानदीचे दोन्हीं तिरास वसलें आहे. विंध्याद्रि आणि सातपुड्याची ओळ ह्या प्रांतांतून गेली आहे. नर्मदा नदी दक्षिणेकडील भागांतून वहात जाते, ह्याचें क्षेत्रफळ ८३१८ चौरस मैल आहे. **इंदूर** हें गादीचें स्थान नर्मदा नदीचे व विंध्याद्रीचे उत्तरेस आहे. येथें गव्हरनर जनरलचा एजन्ट रहातो. तो शिंदे, होळकर, भोपाळ, बुंदेलखंड, रेवा इत्यादि ७१ संस्थानांवर देखरेख करितो. **महू**, इंदूरचे नैर्ऋत्येस १५ मैलांवर आहे. येथें इंग्रज सरकारचे फौजेची छावणी आहे. हें समुद्राचे सपाटीपासून २००० फूट उंच आहे. ह्याशिवाय मंडलेश्वर, रामपुरा, भानपुरा, मेहदपूर, पिटलाद, अहिवास वगैरे प्रसिद्ध गांव आहेत. इंदूरचे राज्याची स्थापना मल्हारराव होळकरानें केली. ह्या राज्यांत फार करून भिल्ल लोकांची वस्ती आहे.

**भोपाळचें राज्य**—हें राज्य शिंद्याचे प्रांत व नर्मदा नदी यांमध्यें आहे. यांतून विंध्या पर्वताची ओळ जाते. **भोपाळ** हें ह्या राज्याचे गादीचें स्थान इंदूरचे ईशान्येस ११० मैलांवर बटवा नदीचे एका कांठ्यावर आहे. येथें नबाब राहतो.

**बुंदेलखंड**-याचे उत्तरेस यमुना नदी, पूर्वेस रेवा, दक्षि-

णस सागर व नर्मदेच्या कांठचा प्रांत, आणि पश्चिमेस ग्वाल्हेर आहे. ह्याची लांबी आग्नेय वायव्य सुमारें २०० मैल, रुंदी १५५ मैल, व क्षेत्रफळ १८,०९९ चौरस मैल आहे. ह्या राष्ट्राचे उत्तरेकडील भाग हमीरपूर व बांदा प्रांत धरून वायव्येकडील प्रांताकडे आहे. हा भाग सन १८०२ मध्यें पेशव्यांपासून इंग्लिशांस मिळाला. बटवा व तिला मिळणाऱ्या धासन् आणि वरमा; व केन नदी व तिचे उर्मिल आणि चंद्रावळ या नांवाचे फांटे ह्या मुख्य नद्या ह्या देशांतून वाहतात. यमुना, व सिंध नद्या सीमेसमीपें वाहत जातात. येथील हवेंत उष्णता फार आहे.

ह्या राष्ट्रांतील मुख्य संस्थानें व जहागिरी येणेंप्रमाणें आहेतः—तेहरी, ऊर्चा, पन्ना, अजेगड, छत्रपूर, बिजापूर, गौरिहार, लोगासा, अलीपूर, सम्तर, चिरकारी, जसो, दतिया, आणि गिरवली. पन्ना संस्थानाची हिऱ्याकरितां प्रसिद्धि आहे. जागजागीं दगडी कोळशाच्या खाणी सांपडतात. तेहरी संस्थानाचा राजा हा बुंदेलखंडांत मुख्य मानितात.

**रेवा.**—हा अलाहाबाद व मिरझापूर प्रांत ह्यांचे दक्षिणेस व सागर आणि नर्मदा नदीचे कांठचे प्रांताचे उत्तरेस आहे, ह्याचे मध्य भागांतून सोननदी ईशान्य दिशेनें वाहात जाते. येथें रजपूत लोकांची वस्ती फार आहे. ह्यांतील मुख्य शहर रेवा हें कैमूर डोंगराचे ईशान्येस आहे.

## मध्यप्रांत

हें नांव नागपूर, व सागर आणि नर्मदानदीचे कांठचा प्रांत, यांस सन १८६१ सालीं दिलें आहे. ह्याचे उत्तरेस शिंद्याचा मुलूख, बुंदेलखंड, रेवा, आणि बंगाल इलाखा; पूर्वेस मद्रास व बंगाल इलाखा; दक्षिणेस निजामचें राज्य, व मद्रास इलाखा; आणि पश्चिमेस मुंबई इलाखा आहे. ह्याची उत्तर दक्षिण लांबी सुमारें ३६८ मैल व रुंदी २७८ मैल, आणि क्षेत्रफळ ७६,४३२ चौरस मैल आहे ह्या प्रांताचे उत्तरेकडील भाग डोंगराळ आहेत. वायव्य दिशेकडून सातपुड्याचे पूर्व दिशेस महानदी, वायव्येस नर्मदा, व दक्षिणेस वाईनगंगा ह्या नद्या आहेत. कापूस, तांदूळ, गहूं मका, साखर आणि नीळ या जिनसांचे उत्पन्न विषयीं ह्या प्रांताची फार प्रसिद्धि आहे. हा प्रांत एका चीफ कमिशनराचे ताब्यांत आहे.

**नागपूर.**—नागपूर प्रांत हा तेथील मराठी राजकुळाचा निर्वंश झाल्यावर सन १८५३ सालीं इंग्लिशांचे हातीं आला. ह्याचे उत्तरेस सागर आणि नर्मदेचे कांठचा प्रांत, व पश्चिमेस निजामचें राज्य आहे. ह्या भागाचें मुख्य शहर **नागपूर**, हें नागनदीचे कांठीं वायव्य दिशेस आहे. नागपूरचे ईशान्येस ९ मैलांवर कामती नांवचें शहर आहे, येथें सरकारी फौज असते. रतनपूर शहर नागपूरचे ईशान्येस २०५ मैलांवर महाल डोंगराचे पूर्व उतरणीवर आहे. संभळपूर हा प्रांत महा नदीचे

कांठीं आहे. हा १८१८ मध्यें वऱ्हाडचे राजाकडून मिळाला. ह्याचे आसपास तांदूळ, गहूं, आणि ऊंस ह्यांची लागवड होते; व फार मौल्यवान हिरे सांपडतात. विराडगड नागपूरचे आग्नेयेस ८० मैलांवर वाईनगंगा नदीचे कांठीं आहे. चंदा, चंदवाडा, बंदारा आणि रायपूर हे जिल्ह्याचे गांव आहेत. उमराईत, हिंगणघांट, रामटेक, पोहनी, आणि अंबोरा, वगैरे प्रसिद्ध गांव आहेत. रायपूर जिल्ह्यांत कांकेर संस्थान आहे.

**सागर व नर्मदेच्या कांठचा प्रांत.**—हा विभाग मध्य प्रांताचे अगदीं ईशान्य टोंकास आहे. हा सन १८१८त इंग्लिशांस वऱ्हाडचे राजाकडून मिळाला ह्यांतून नर्मदा नदी वाहते. सागर हें शहर नागपूरचे उत्तरेस विंध्यापर्वताचे पूर्व उतरणीवर आहे. जबलपूर, नागपूरचे ईशान्येस १५० मैलांवर आहे. ह्या शहरीं थग लोकांचे मुलांकरितां उद्योगोत्तेजनशाळा स्थापिली आहे. ह्या ठिकाणीं कोळशाच्या खाणी सांपडतात. नागपूरचे वायव्येस १२० मैलांवर नर्मदा नदीचे कांठीं हुसंगाबाद शहर आहे. हें फार सुपीक स्थळ आहे. बस्तार (जगदलापूर) हें इंद्रावती नदीवर आहे. येथें एक किल्ला आहे जयपूर हें शहर बस्तारपासून ३५ मैलांवर आहे. सेंवूल नागपूरचे वायव्येस ९० मैलांवर आहे. ह्या ठिकाणीं एक किल्ला आहे. नर्मदा नदीचे दक्षिण तीरावर हिंदिया नांवाचें शहर आहे येथेंही एक किल्ला आहे.

वऱ्हाड—हा प्रांत, (ब्रिटिश सरकारची फौज निजाम सरकाराकडे चाकरीस आहे तिच्या खर्चाबद्दल)निजाम सरकारानें ब्रिटिश सरकारास सन १८५३ त दिला आहे. ह्याचे उत्तरेत सातपुड्याचे डोंगर, पूर्वेस नागपूर, दक्षिणेस निजामचा मुलूख, व पश्चिमेस खानदेश. ह्यांतून पूर्णानदी वाहते, ह्मणून ह्या प्रांतांत पाण्याचा पुरवठा फार चांगला आहे. ह्याचे उमरावती, एलिचपूर, वणी, अकोला, बुलठाणा, आणि वासीम असे सहा जिल्हे आहेत. येथील मुख्य उत्पन्न कापूस आहे. उमरावती हें मुख्य शहर नागपुरापासून ८० मैलांवर आहे. येथें कापसाचा पुष्कळ व्यापार चालतो. असई व आरगांव हे गांव उमरावतीचे नैर्ऋत्येस आहेत. येथें जनरल वेल्सलीनें सन १८०३ सालीं मराठ्यांबरोबर लढाया मारिल्या. एलिचपूर उमरावतीपासून ३५मैलांवर आहे. हें पूर्वीचें राजधानीचें शहर आहे. शिवाय अकोलें, कारिंजा, खोलापूर, बालापूर, जाफराबाद वगैरे प्रसिद्ध शहरें आहेत. ह्या प्रांतांत गावलगड नांवाचा एक डोंगरी विकट किल्ला आहे.

## मध्यप्रांतांतील संस्थानें.

**निजामचें राज्य**—ह्या राष्ट्राचे ईशान्य दिशेस मध्यप्रांत, दक्षिणेस मद्रास इलाखा, आणि पश्चिमेस मुंबई इलाखा आहे. ह्याचें क्षेत्रफळ ९५,३३७ चौरस मैल, व लोकसंख्या सुमारें एक कोटी सहा लक्ष आहे ह्याचे उत्तरभागीं गोदावरी व तिला

मिळणाऱ्या पूर्णा, दूध्ना, व मांजरा ह्या नद्या आहेत. मध्यभागीं मुशी नदी, व दक्षिणेकडे कृष्णा व तिला मिळणारी भीमा ह्या नद्यांचे प्रवाह आहेत. प्राणहिता (वर्धा व तिला मिळणाऱ्या पाइनगंगा ह्या नद्या मिळून झालेली एक नदी) ही नदी कुलेश्वर गांवाजवळ गोदावरी नदीला मिळते. बल्लारी व कर्नूल हे जिल्हे, व निजामचें राज्य यांचेमध्यें तुंगभद्रानदी आग्नेय दिशेस कृष्णा नदीला मिळते. ह्या सर्व नद्यांचे प्रवाह पूर्वेकडे असून ह्या बंगालच्या उपसागरास मिळतात. येथील हवा आरोग्यकारक आहे. जमिनींत पीक उत्तम येतें. मुख्य धान्यें तांदूळ, गहूं, बाजरी, ज्वारी, नाचणी, कडधान्यें, वगैरे आहेत. व्यापारासाठीं कापूस, नीळ, ऊंस ह्यांची लागवड फार करितात. तैलंग लोकांची वस्ती पूर्वभागीं आहे. मराठे हे बहुतकरून पश्चिमेकडील भागांत, व गोंडलोक ईशान्येकडील भागांत राहतात. ह्या राज्याचे हैदराबाद, औरंगाबाद, बेदर आणि वऱ्हाड असे चार सुभे आहेत.

ह्या राष्ट्राचे मुख्य राजधानीचें शहर हैदराबाद हें तटबंदी असून मुशी नदीचे कांठीं आहे. येथें रेशमाचे कारखाने आहेत. ह्या शहरीं ब्रिटिश सरकारचा रेसिडेंट राहतो. नांदेड हें शहर हैदराबादचे वायव्येस गोदावरी नदीचे कांठीं १५० मैलांवर आहे. हें शीक लोकांचें पवित्र स्थान आहे. हैदराबादचे पश्चिमेस ६ मैलांवर गोंवळकोंडें नांवाचें मोडकळीस आ-

लेलें एक शहर आहे. शिकंदराबाद व बोलारम या शहरीं सरकारचे फौजेची छावणी आहे. हैदराबादचे ईशान्येस ८८ मैलांवर वारंगूळ शहर आहे. हें तेलिंगण राष्ट्राचें राजधानीचें शहर होतें. बेदर हें मांजरानदीचे कांठीं आहे. येथें पानदानें, हुक्के, वगैरे जिन्नस तयार होतात. हैदराबादचे वायव्येस २७० मैलांवर दुधनानदीचे कांठीं औरंगाबाद शहर आहे. हें मोंगल बादशाहांपैकीं शेवटचा बादशहा जो औरंगजेब याचे आवडीचें शहर होतें. या शहरचे वायव्येस १० मैलांवर दौलताबाद शहर आहे. येथें एक डोंगरी किल्ला आहे. एलोर हें शहर औरंगाबादेपासून २० मैलांवर आहे. येथील कोरीव लेणीं [पांडवकृत्यें] जगप्रसिद्ध आहेत. जालने हें औरंगाबादचे पूर्वेस आहे. येथें फौजेची छावणी आहे. हैदराबादचे पश्चिमेस गुलबर्गा नांवाचे शहरांतील कबरा फार प्रसिद्ध आहेत. निर्मळ, चिनूर, कम्मामत, इवरकोंडें वगैरे दुसरीं शहरें आहेत.]

## स्वतंत्र संस्थानें.

**नेपाळ.**—ह्याचे उत्तरेस तिबेट; पूर्वेस सिकीम; दक्षिणेस वायव्येकडील प्रांत, अयोध्या आणि बंगाल; व पश्चिमेस कमाऊन प्रांत आहे. ह्याची लांबी ५०० मैल, रुंदी १०० पासून १२५ मैल व क्षेत्रफळ सुमारें ५४,००० चौरस मैल आहे. ह्या देशाचे मुरंग, चयनपूर, मकानी, खातंग, नेपाळ (खास), गुरखा, खाची, आणि माल्लीभूम असे भाग करितात.

गंडकी, त्रिशूलगंगा, कौशिकी इत्यादि नद्यांचे प्रवाह दक्षिण दिशेनें गेले आहेत. तांदूळ, गहूं व इमारतीयुक्त लांकडें यांचें उत्पन्न फार होतें. लोखंड, तांबें व शिसें ह्यांच्या खाणी सांपडतात. ह्या देशाचा व्यापार बंगाल व तिबेट देशाशीं फार करून होतो. काटमांडू हें राजधानीचें शहर बिशनमतीनदीचे कांठीं पाटणाचे उत्तरेस १५० मैलांवर आहे. तेथें ब्रिटिश सरकारचा रेसिडेन्ट राहतो. ललीतपट्टण, गुरखा, आणि मकुवातपूर इत्यादि प्रसिद्ध गांवें आहेत.

**भूतान**—हा सिकीमदेशाचे पूर्वेस आहे. ह्याची लांबी २८० मैल व रुंदी ६० पासून १२० मैलपर्यंत, व क्षेत्रफळ सुमारें एकोणीस हजार चौरस मैल आहे. ह्याचे ईशान्यभागीं चंव-लारी नांवाचें शिखर आहे. येथील लोकांना भुते हें नांव आहे. यांचा बौद्ध धर्म आहे. धर्मराजा ( लामा ) हा पुनाखा शहरीं राहतो. ह्याचे नैर्ऋत्येस २० मैलांवर तासेसूदन शहर आहे. येथें देवराजा ( राज्यकर्ता ) राहतो.

## फ्रेंच सरकारचीं संस्थानें.

**बंगाल इलाख्यामध्यें**—**चंद्रनगर** हें सुपीक संस्थान कलक-त्त्याचे उत्तरेस २० मैलांवर हुगली नदीचे उजवे तीरावर आहे. **यानान** संस्थान कोरिंगा व गोदावरी नद्यांमध्यें आहे. ह्याचें क्षेत्र-फळ सुमारें १२ चौरस मैल आहे. **मद्रास इलाख्यामध्यें**—पुदुच्चेरी हें संस्थान कारोमांडल किनाऱ्यावर मद्रासचे दक्षिणेस

९० मैलांवर आहे. याचे पुदूचेरी (खास), वालानोर, आणि बहूर असे भाग करितात. ह्याचें क्षेत्रफळ सुमारें १०७ चौरस मैल आहे. ह्याचे दक्षिणेस ७० मैलांवर कावेरी नदीचे एका फांट्यावर कारिकल नांवाचें एक संस्थान आहे. ह्याचें क्षेत्रफळ सुमारें ६३ चौरस मैल आहे. माही हें संस्थान नीलगिरी डोंगराचे पायथ्याशीं मलबार किनाऱ्यावर आहे.

## पोर्तुगीज सरकारचीं संस्थानें.

**गोमांतक** हें संस्थान सांवतवाडीचे दक्षिणेस आहे. ह्याची लांबी ६२ मैल, रुंदी ४० मैल आणि क्षेत्रफळ १०६४ चौरस मैल आहे. ह्यामध्यें मुख्य उत्पन्न तांदूळ, मिरें, नारळ, मीठ इत्यादि आहे. गोवें शहर मुंबईचे दक्षिणेस २६० मैलांवर आहे. **पनगांव** (पंजीम, नवें गोवें) हें जुनें गोवें व समुद्र यांचेमध्यें आहे. **दमान**—हें तटबंदी संस्थान उत्तर कोंकणांत मुंबईचे उत्तरेस १०० मैलांवर दमान गंगेच्या मुखाशीं आहे. ह्याची लांबी १० मैल, व रुंदी ९ मैल आहे. हें संस्थान सन १५५८ सालीं पोर्तुगीज लोकांनीं मिळविलें. **दिव**—हें संस्थान कांठेवाड द्वीपकल्पाचे दक्षिण किनाऱ्यावर एक बेट आहे. ह्याची लांबी ७ मैल व रुंदी सुमारें दीड दोन मैल आहे. हें बेट इ० स० १५१५ मध्यें पोर्तुगीज लोकांनीं मिळविलें.

समाप्त.